शनिवार । ७ मे १९७७
७५ पैसे

# माणूस

## मुक्तसंगो नहंवादी



सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस

# डोले पीक सर्वदूर ऽऽ..
# सुख समृद्धी भरपूर..

ऐका हो ऐका ... ऽऽऽ ...
पिकं भरघोस होणार ...
अन् डोलू लागणार ....
व्हय, व्हय – आणि आपणही नाचणार
पण कवा ?
पिकांना लागणारी खते भरपूर
प्रमाणात मिळतील तवा.
खते – मग ती जमिनीतून देण्याची असोत
अथवा पिकावर फवारण्याची असोत – भरपूर
प्रमाणात द्या. त्या साठी जर आर्थिक
सहाय्याची जरुरी असेल तर आमच्या
जवळच्या शाखेस भेट द्या.



**बँक ऑफ महाराष्ट्र**

११७७, बुधवार पेठ, पुणे ४११००२.

*जेथे अर्थसहाय्याची खरी जरूरी। तेथे 'बँक ऑफ महाराष्ट्र' लावी हजेरी।*

PRAJAKTA

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळा–अंक एकूणपन्नासावा
७ मे १९७७
मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
◻
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◻
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे, हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◻
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◻
दूरध्वनी : ४३४५९
◻


सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांच्या पुणे भेटीनिमित्त....

# मार्तंड जे तापहीन

प्रा. शरद वाघ

कारागृहात गीतेचा खूप अभ्यास झाला. प्रांतसंघचालक बाबाराव भिडे यांनी प्रत्येक अध्यायातील निवडक श्लोक निवडून ते सर्वांना हाताने लिहून काढण्यास सांगितले. त्यासाठी प्रत्येकाला एक स्वतंत्र वही दिली होती. डॉ. वसंतराव राहूरकर (पुणे), प्रा. नाना पाटणकर (सांगली), श्री. चितळे (मिरज), रघुवीर क्षीरसागर (पुणे) अशी मंडळी गीतेवर रसाळ प्रवचने करीत. रणक्षेत्रावर लिहिलेला गीताग्रंथ हुकूमशाहीविरुद्ध लढत असलेल्या आम्हा कार्यकर्त्यांना चिरंतन स्फूर्ती देई. एके प्रसंगी आदर्श कार्यकर्ता कोणता याबाबत नाना पाटणकर विचार मांडत होते. अठराव्या अध्यायात आदर्श नेत्याचे उत्कृष्ट विवेचन आहे.

> मुक्तसंगो ऽ नहंवादी धृत्युत्साहसमन्वितः
> सिद्ध्योर्नि र्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते । १८·२६ ।

जो निःसंग आणि निर्लेप आहे, ज्याच्या ठिकाणी अहंकार नाही, जो धैर्यवान आहे, ज्याच्या मनात आकांक्षा आणि उत्साह आहे, तसेच जो कर्माच्या सिद्धीने वा असिद्धीने किंवा लाभहानीने विचलित होत नाही त्यालाच सात्त्विक कार्यकर्ता म्हटले आहे.

सात्त्विक, राजस आणि तामस अशा तीन प्रकारचे नेतृत्व गीतेत सांगितले आहे. त्याची लक्षणेही दिली आहेत. ज्ञानेश्वर माऊलींनी त्यावर रसाळ भाष्य केले आहे. कारागृहात आणि बाहेरही विविध क्षेत्रांत आणि संस्थांत राजस व तामस नेतृत्वाची खूप उदाहरणे दिसतात. सात्त्विक नेतृत्व हे भारतीय परंपरेतील श्रेष्ठ नेतृत्व होय.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वैशिष्टय हे की, त्याचे नेतृत्व हे नेहमी, गीतेत सांगितल्याप्रमाणे 'सात्त्विकच' राहिले आहे. डॉ. हेडगेवार, पूजनीय गुरुजी आणि बाळासाहेब देवरस ही भारतीयांनी पाहिलेली याची चालतीबोलती उदाहरणे आहेत.

प्रा. ग. प्र. प्रधान मनोहर साप्ताहिकात बाळासाहेबांसंबंधी आठवणी सांगताना लिहितात, 'राजकारणात दीर्घकाल वावरताना

माझा असा अनुभव आहे की, 'ज्या व्यक्ती एखादी संस्था वा संघटना यांच्या प्रमुखपदी असतात त्यांना त्यांच्या सामर्थ्याची जाणीव असते, आणि ही जाणीव त्यांच्या वागण्यातून व बोलण्यातून सतत व्यक्त होते. श्री. देवरस हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या देशव्यापी संघटनेचे प्रमुख आहेत. असे असताना त्यांच्याशी बोलताना, चर्चा करताना वा अन्य वेळीही त्यांच्या स्थानाची जाणीव त्यांनी कधी दिली असे मला आठवत नाही.'

प्रधानसरांप्रमाणेच तुरुंगातील सगळ्यांचा हाच अनुभव आहे. सत्याग्रहींमध्ये सासवडचे स्वातंत्र्यसैनिक श्री. जाधव हे एक होते. धोतर, एक पांढरा डगला व डोई पांढरे पागोटे, वयाने थोडे अधिक पण डोळ्यात तेज असे हे गृहस्थ माझ्याकडे आले आणि म्हणाले, देवरससाहेबांना भेटायचे आहे. मी हसून म्हटले, 'सोपे काम आहे. एकदम त्यांच्या खोलीवर जायचे आणि स्वतःचा परिचय करून द्यायचा. एकटे जायला ते बिचकतच होते. पण नंतर बाळासाहेबांच्या खोलीतून भेटून बाहेर येताना मला आनंदाने म्हणाले, 'अहो एवढा मोठा माणूस मला या म्हणाला, बसायला खुर्ची दिली, माझी सगळी चौकशी केली, खाण्यास फळे दिली. फार मोठा माणूस आहे.' त्यानंतर ते किती तरी वेळा बाळासाहेबांना भेटून गेले. कोणत्याही पक्षाचा लहानमोठा कार्यकर्ता सुटला की, तो बाळासाहेबांना भेटून जाई आणि बाळासाहेब त्याला निरोप देण्यासाठी दारापर्यंत जात. एकदा प्रातःस्मरणाच्या प्रार्थनेसाठी सतरंजी घालायला मला उशीर झाला. माझी धावपळ पाहून ते स्वतः पुढे आले आणि सतरंजा अंथरू लागले. पेपरवाचनाच्या गडबडीत मोठ्या चुल्यावर आंघोळीसाठी ठेवलेले पाणी तापतेय की नाही इकडे कोणाचे लक्ष नसे. कधी कधी चूल नीट पेटत नसे. अशा वेळी बाळासाहेब स्वतः चुलीतली लाकडे नीट करीत व झडपण्याने त्याला वारा घालून जाळ लावीत. जेवताना अगर चहाचे वेळी जर कोणी दिसले नाही तर, लगेच त्याची चौकशी करत. धुळे जेलमधून नवापूरच्या एका कार्यकर्त्याचे कळकळीचे एक पत्र त्यांना आले. या कार्यकर्त्याच्या मुलीचे लग्न ठरले होते आणि मधेच हा कार्यकर्ता मिसाखाली पकडला गेला होता.लग्नाच्या तयारीसाठी पैसे उभे करण्याच्या त्याच्या साऱ्या योजना फसल्या. त्याचा स्वतःचाच धंदा धोक्यात आला. पैशाअभावी लग्न मोडण्याच्या बेतात आले. लग्न मोडणे इष्ट नव्हते. त्याने सरळ बाळासाहेबांना पत्र टाकले. बाळासाहेबांनी येरवड्यातील धुळ्याचे कार्यकर्ते धरम चोरडिया यांना बोलावून घेतले. सगळी चौकशी केली व म्हणाले, 'अजून काही संघाला इतके वाईट दिवस आले नाहीत. याची गरज भागली पाहिजे.' आणि त्या कार्यकर्त्याची गरज भागवली गेली.

एक वेगळं गमतीचं उदाहरण सांगण्यासारखं आहे. धुळे जेलमध्ये येरवड्याहून जे स्थानबद्ध गेले त्यांत, सत्यनारायण म्हणून एक तरुण कार्यकर्ता होता. त्याच जेलमध्ये नाशिक तुरुंगातून आलेला माधव बापट हा तरुण स्वयंसेवक होता. माधव बापटला नाशिकहून बाबाराव भिडे यांचे पत्र आले. त्याचा त्याला इतका आनंद झाला की, तो सत्यनारायणला म्हणाला की, 'बघ मला नाशिकहून प्रांतसंघचालकांच्या हातचे पत्र आले. तुला कुठे?' मग सत्यनारायणने सरसंघचालक बाळासाहेब देवरसांनाच पत्र टाकलं आणि त्यात स्पष्ट खुलासा केला की, माधव बापट मला चिडवतोय व उगीच टुरटुर करतोय. तेव्हा मला तुमच्या हस्ताक्षरातले पत्र पाठवा. आणि बाळासाहेबांनी स्वतः त्याला लगेच पत्र लिहून टाकले.

भाषणापेक्षा चर्चा अधिक उपयुक्त असते. विचारांची खरी देवाणघेवाण चर्चेतच होते. प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमातून खूप गोष्टी समजून घेता येतात. बाळासाहेबांचा भाषणापेक्षा चर्चेवर भर जास्त. मला चर्चात्मक कार्यक्रम अधिक आवडतो असं ते म्हणत. ते गमतीने सांगत की, भाषणे प्रोफेसरांनी झोडावीत. कोणताही विषय असो. प्राध्यापकांचे भाषण तयार. मी चांगले कपडे घातले अथवा कार्यक्रमाच्या थोडा आधी निघालो की ते म्हणत, 'काम वाच, आज भाषण दिसतंय.'

अशा अनेक चर्चा आत रंगल्या. उद्बोधक झाल्या. त्यातील त्यांनी मांडलेले काही विचार असे आहेत.

**महाराष्ट्राचे काम जुने. केरळचे त्या मानाने नवे. असे असूनही केरळचे काम अधिक का वाढले ?**

एखाद्या ठिकाणचे काम का वाढते, एखादी व्यक्ती वा गट एकदम काम का करू लागतो, मधेच थांबतो असे का व्हावे, याचा खरं म्हणजे अभ्यास व्हायला हवा. मला एक कार्यकर्ता माहीत आहे. शहरात कॉलेजमध्ये गेल्यावर शाखेत अनियमित झाला. पण सुटीत आपल्या गावी आला रे आला की, लगेच अर्धी चड्डी घालून, दंड घेऊन गावच्या शाखेवर जाई व जोमाने काम करी.

केरळमध्ये काय झालं. प्रथम कोळी संघात आले. त्यांचे जीवन म्हणजे अपार कष्ट. सदैव संकटांशी सामना. तेच गुण कार्यकर्त्यांच्या अंगी आले. महाराष्ट्रात प्रथम वकील, डॉक्टर, शिक्षक संघात आले. त्यांचा बौद्धिकाकडे जास्त कल. त्यामुळे बहुजनसमाज थोडा दूर राहिला.

**इलेक्शनच्या काळात इंदिराजींनी संघ व जनसंघ यांवरच प्रखर हल्ला का चढविला ?**

मला वाटते त्याची कारणे दोन असावीत. एक, होऊ घातलेल्या जनता पक्षात फूट पाडावी, संघ–जनसंघ वर्चस्व गाजविलं तर इतर पक्ष नामशेष होतील अशी हवा निर्माण करून घटक पक्षांत अविश्वास निर्माण करावा.

दुसरा हेतू, हे पक्ष जातीय आहेत असं सांगून मुसलमान व ख्रिश्चन यांची एक गठ्ठा मते मिळावीत.

आणीबाणीपासून काही फायदे झाले का ?

आपल्या सामर्थ्याची परीक्षा झाली. जनतेने फार मोठी साहानुभूती दाखवली. आपल्याही लक्षात आलं की, आपलाही 'बेस जरा ब्रॉड' असावा.

अस्पृश्यता निवारणाबद्दल काय ?

अस्पृश्यतेचे उच्चाटन तर व्हायलाच पाहिजे. संघाच्या आचारविचारांत कोठेही अस्पृश्यतेला थारा नाही. केवळ आंदोलनाने हा प्रश्न सुटणार नाही. संघाचा असा एक खास मार्ग आहे. एक गोष्ट तर कबुल केलीच पाहिजे की, याबाबतीत संघास पुरेसं यश मिळालं नाही.

संघात बदल संभवनीय आहे का ?

संघाबद्दल बरेच अपसमज आहेत. ते सगळे प्रयत्नपूर्वक दूर केले पाहिजेत. सर्वांत महत्त्वाची मोठी गोष्ट म्हणजे प्रार्थना. पूर्वी ती मराठीत होती. त्यातही बदल करून ती संस्कृतमधून केली. योग्य कालमानानुसार सर्वांच्या विचारविनिमयाने बदल होऊ शकतो. तसे बदल संघाने केले आहेत.

संघस्वयंसेवकांनी कोणती गोष्ट लक्षात ठेवावी ?

सगळ्यांना बरोबरीने घेऊन काम करावे. मी श्रेष्ठ तो कनिष्ठ हा भाव नसावा. आमच्या लहानपणी एक कविता होती. Mountain and Squirrel. They had a quarrel. पर्वत खारीला म्हणाला, तू लहान. मी शिरावर जंगल धारण करतो. त्यावर खार म्हणाली की, मग एखादे फळ तोडून दाखव.

खरं म्हणजे आपआपल्या परीने दोघेही श्रेष्ठ. एखादा शाखा चांगली घेईल, तर एखादा सभा नीट चालवेल. आपल्याला सगळे हवेत.

काहीजण असे असतात की, काहीही केले तरी, त्यांचे समाधान होत नाही. कॉलेजमधील पुस्तकात आम्हाला एक निबंध होता. –Napoleon had not been defeated नेपोलियनचा पराभव झाला नसता तर ? तर त्याने शहररचना, उद्यान सौंदर्य, कायदे इत्यादि विषयी खूप कार्य केले असते. जर संघाने सत्याग्रहात भाग घेतला नसता तर, असेच केले असते तर, तसेच केले नसते तर, अशांचे समाधान करणे अवघड जाते.

पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या स्मृतीदिनानिमित्त ते म्हणाले की; ते एक आदर्श नेता होते. तोच आदर्श नेता की जो, अनुयायांच्या एक दोन पाऊलेच पुढे असतो.

माझ्या घडणीचे सारे श्रेय डॉक्टर हेडगेवारांना आहे. डॉक्टरांचा सर्वांत मोठा गुण म्हणजे त्यांचे 'संस्थात्मक मन' 'Institutional Mind'. 'माझे मत, माझे असे म्हणणे, मला असे वाटते' हा आग्रह ते कधीच धरत नसत. विचारविनिमय खूप होई. एकमत होईपर्यंत बैठका चालत. सर्वबाजूने विचार होई. डॉक्टरांनी कधीही कोणतीही गोष्ट कोणावर लादली नाही.

केवळ विचार दिला म्हणजे भागले असे नव्हे तर, आचार करणारी माणसे उभी केली पाहिजेत. डॉक्टर हेडगेवार, श्रीगुरुजींसारखी सहस्रावधी माणसे उभी केली पाहिजेत.

कारागृहातील सर्व पक्षांच्या भिन्न भिन्न कार्यकर्त्यांनी त्यांच्याशी विचारविनिमय केला आहे. प्रत्येक संघस्वयंसेवकाचा त्यांच्याशी व्यक्तिगत परिचय झाला आहे.

त्यांचे इंग्रजी वाचन खूप आहे. मोठमोठ्या पुस्तकांबरोबर रीडर्स डायजेस्ट आणि नॅशनल जिऑग्राफी हेही ते मोठ्या आवडीने वाचीत. दुपारी ते कधीच झोपत नसत. त्यांची कोणतीही बैठक कधीही कंटाळवाणी होत नसे. अनेक विनोदी समर्पक गोष्टी सांगून ते सभेत मोकळेपणा व चैतन्य निर्माण करीत. अंधेरी यार्डमधील लोकांनी सकाळच्या व दुपारच्या चहानंतर होणाऱ्या विविध विषयांवरच्या त्यांच्या खुसखुशीत गप्पा मनसोक्त ऐकल्या आहेत. त्यावर एक स्वतंत्र लेखच लिहावा लागेल.

ते अतिशय काटेकोरपणे पथ्ये पाळीत. सकाळी नियमित आसने व संध्याकाळी नियमित फिरणे या त्यांच्या दिनक्रमात कधी खंड पडला नाही. तुरुंगातील अडचणींना सुद्धा हासत सामोरे जायचे. एकदा त्यांचा एक दुसरा दात काढायचे ठरले. पंढरपूरचे प्रख्यात दाताचे डॉक्टर मोहोळकर आतच होते. त्यांनी दात काढण्याची सर्व सिद्धता केली. त्यावेळी बाळासाहेब म्हणाले, "या बघ, दात काढतेवेळी मी बघा कसे गंमतीदार चेहरे करतो." बारीकसारीक गोष्टींतही त्यांच्याकडून खूप शिकण्यासारखे असे.

हे सारं पाहिलं की, मला एका इंग्लीश कवीच्या ओळी आठवतात.

His lines are philosophy
his ideas soulpture
He builds with dreams
and teaches with silence. □

पॅपिलॉन
पॅपिलॉन
लेखक । हेन्री शॅरीयर
अनुवाद । रवींद्र गुर्जर
किंमत । पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# 'जनता' विहीर

**पुणे–मुंबई रस्त्यावर असलेल्या नायगाव येथे हरिजनांसाठी एक विहीर खोदण्याचा उपक्रम 'भूमिपुत्र प्रतिष्ठान'तर्फे श्री. आबा करमरकर यांनी सुरू केला आहे. पुढील पत्रव्यवहारावरून या उपक्रमाची थोडी फार कल्पना येऊ शकेल.**

नायगाव ता. २०।१२।७६

प्रिय श्री. ग. मा.

स. न. वि. वि.

काल आपले बोलणे झाल्याप्रमाणे श्री. बिंदुमाधव यांना येथील हरिजन विहिरी-संबंधी पाठविलेले पत्र–नक्कल–सोबत पाठ-वीत आहे.

मी आताच सकाळी हरिजन वस्तीवर जाऊन आलो. तेथील एक तरुण आम्ही काल पुण्याला आणला होता. त्याला ससूनमध्ये दाखल केला असेल. त्या मुलाची काळजी त्याची वस्ती करीत होती. त्यांना त्यांच्या एकनाथच्या प्रकृतीची माहिती द्यायला मी गेलो होतो. तेव्हाच तेथे विहीर खणण्याचे काम आम्ही सुरू केले आहे. तेही पाहिले. तेथील लोकांचा उत्साह चांगला आहे. तुम्ही मंडळी येत आहात हे आश्वासन मी त्यांना दिले आहे. तेव्हा तुम्ही केव्हा येणार आहात ते ठरवून मला कळवावे. येथे हे काम करा-यचे आहे व होण्यासारखे आहे.

—आबा करमरकर

प्रिय बिंदुमाधव जोशी

सप्रेम नमस्कार वि. वि.

(१) रविवार ता. १०।१२ रोजी नाय-गाव येथे तुम्ही व सूर्यकांत पाठक यांची अचानकपणे भेट होण्याचा योग आला. त्यावेळी बोलता बोलता सहजपणे हरिजनांची विहीर तयार करण्यासंबंधी बोलणे निघाले आणि आपण ते काम सुरू करूया असे तुम्ही सुचविले. आता विहीर खोद-ण्याचे काम सुरू करायची अगदी योग्य वेळ आलेली आहे. ह्या हरिजनांच्या विहिरीसंबंधी अगदी थोडक्यात पार्श्वभूमी देतो.

(२) २ जून १९७६ ला मी इंद्रायणी विद्या-मंदिराच्या कृषि तंत्र केन्द्राचे काम पाहू लागलो. ह्या कामात इंद्रायणी कॉलेजचे ६ विद्यार्थी व आमचे २–३ कार्यकर्ते माझ्या-बरोबर आहेत. येथील शेती उत्पादनाच्या कार्यक्रमाबरोबर नायगाव गावातील प्रश्न समजून घ्यायला आम्ही सुरुवात केली. लोकांना भेटलो. त्यांचेजवळ बोललो. त्यांची दुःखे काय आहेत ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या समस्या, प्रश्न समजावून घेतले. हळूहळू गावातील मंडळींशी आमचा संवाद सुरू झाला. त्यातून आम्हाला काही महत्त्वाची वाटणारी माहिती उपलब्ध झाली ती थोड-क्यात अशी–

(३) गावात ९०–९५ कुटुंबे आहेत. बहुतेकांजवळ जमीन आहे. पण भातशेती जमीन तीन चार एकरांपेक्षा जास्त नाही. म्हणण्यासारखी जास्त जमीन असलेली घरे फारच थोडी आहेत. परंतु कुटुंबे मोठी आहेत. एकत्र कुटुंब पद्धती आहे. त्यामुळे २०–२५ माणसे घरी खायला आहेत. भातशेती सोडली तर वरकस, निकृष्ट दर्जाची बरकस गवती जमीन थोडी थोडी आहे. पाणी पावसाळ्यात असते तेवढेच. फेब्रुवारीनंतर शेतीला तर नाहीच पण जनावरांना पाणी पिण्याची पंचाईत आहे. त्यामुळे भातशेतीत निघेल तेवढेच उत्पन्न. काही 'गव्हाळी' जमिनीत ज्वारी व गहू ऑक्टोबरमध्ये पेरतात.

वळवांचे पाऊस पडले तर, एकरी एखादे पोते उत्पन्न येते न येते. एकूण गरिबी फार आहे, परंतु उपासमार नाही. कारण आजू-बाजूला कारखाने, रेल्वे वगैरे ठिकाणी एखादा दुसरा माणूस नोकरीला असतो. थोडा थोडा दुधाचा धंदा आहे. पण बहुतेक सर्व पाणी घालून, परंपरागत चालू असते. त्यामुळे शास्त्रीय ज्ञानाचे वावडे आहे. लोक धार्मिक आहेत. गावात दोन तरुण मंडळे आहेत. हरिजन वस्ती गावापासून दूर आहे. तेथे सम्राट अशोक तरुण मंडळ आहे. ढोल, लेझीम व केव्हा केव्हा भजन ह्यांशिवाय फारसा तरुण मंडळाला कार्यक्रम नाही. गावापासून ३–४ फर्लांगावर पाण्याची विहीर आहे. तीत फारसे पाणी नसते. गाव थोडासा उंच जागेवर गावठाणात वसविलेला आहे. ह्या गावातील विहिरीवर पाणी भरायला हरिजन जात नाहीत. गावामध्ये भांडणे नकोत म्हणून जात नाहीत. शिवाय ती विहीर त्यांना लांबही पडते आणि पाणीही कमी असते. हरिजन व इतर गावकरी यात जातीय तेढ नाही.

बाजूलाच २ कि. मी. अंतरावर कामशेत हे व्यापारी केन्द्र आहे. तेथे भातगिरण्या आहेत, दुकानदार व सावकार आहेत. गावचा सर्व माल किंमती पाहून सावकार मंडळीच घेत असतात. त्यामुळे उत्पादक गरीबच राहतो. असा हा इतर सर्व गावांप्रमाणेच अस-णारा नायगाव आपली लहानसहान भांडणे, लहान लहान तणाव व तेढी, गरिबी, रूढी, परंपरा, औदासीन्य वगैरे नेहमीच जडता मजबूत करणारी वैशिष्ट्यांची जपणूक करीत जीवन जगत आहे.

ह्या गावाचे जोमदार अभिसरण सुरू करण्यासाठी काय करायला हवे आहे ह्याचा अंदाज घेतला आहे. त्यात रोजगार हमी योजना, पाझर तलाव, योजनापूर्वक पाण्याच्या मार्गाची आखणी, शेतीपीक कार्यक्रम, धान्य कोठार योजना, शास्त्रीय दूध उत्पादन व पशुसंवर्धन, तरुण मंडळाचे एकत्रीकरण व नवा शास्त्रीय विचार, महिलांचे संघटन, वगैरे गोष्टी करता येण्यासारख्या आहेत व

करायला हव्या आहेत हे आमच्या लक्षात आले आहे. पण हे सर्व काम आम्ही त्या मंडळींकरता करायचे नाही, तर त्यांचे बरोबर करायचे आहे हे अगदी स्पष्ट केले आहे. तसेच आपले दुःख एकेकटयाने सहन करीत न बसता एकत्र येऊन ते दुःख काय आहे, कशामुळे आहे हे समजून घेऊन सर्वांनी मिळून त्यावर ईलाज शोधून काढायचा आहे. हे त्यांना सांगत आहोत. प्रत्यक्ष कामातून ह्याची अनुभूती यावी अशी कल्पना आहे.

अशा प्रत्यक्ष कामांपैकीच हरिजनांची विहीर हे एक महत्त्वाचे काम आहे. हरिजनवाडयात १२–१४ कुटुंबे आहेत. १४–१५ तरुण मुले आहेत. त्यांचेजवळ विहिरीबद्दल ४–५ वेळा बोलणे झाले आहे. डिसेंबर महिन्यात कामाला सुरुवात करायची असे आम्ही जुलै ऑगस्ट महिन्यात नक्की केले होते. काल ती तरुण मंडळी येऊन मला भेटली आणि रविवार ता. १९–१२ पासून विहीर खणण्याच्या कामाला सुरुवात करायचे योजले आहे. ह्या विहिरीचे कामी आपल्या युवक महामंडळाचे साहाय्य आम्हाला मिळाल्यास मे महिन्यापूर्वी हरिजनांची विहीर पूर्ण करण्याचा मानस आहे.

कळावे.

आपला

**–आबा करमरकर**

मु. दिंडोशी. गोरेगाव पूर्व

मुंबई नं. ६३

ता. २२–४–७७

प्रिय श्री. माजगावकर,

सप्रेम नमस्कार वि. वि.

नायगावला जी हरिजनांची विहीर खणण्याचे काम चालले आहे त्या अनुषंगाने एक पत्र तेथील मंडळींना मी पाठविले. ते छापायला द्यावे असे वाचणारांचा सल्ला पडला. म्हणून माणूसमध्ये छापण्यासाठी सोबत पाठवीत आहे.

सुरुवातीला पार्श्वभूमी पुन्हा थोडक्यात लिहिली आहे.

**–आबा**

[नायगाव गावात आम्ही ग्रामीण पुनर्रचनेच्या दृष्टीने गेले ८–१० महिन्यापासून काम करीत आहोत. हरिजन वस्ती नायगाव गावापासून २ फर्लांग अंतरावर डोंगरावर आहे. त्याला आम्ही आता डोंगरीपाडा म्हणतो. तेथे १२ घरे आहेत. प्रत्येक घरात तीन चार १६ ते २० वर्षांपुढील तरुण मुले आहेत. म्हणजे घरे बारा असली तरी ३०।३५ कुटुंबे तेथे आहेत. आपसांत भरपूर भांडणे होती. दारू भरपूर होती. गरिबी तर आहेच. आरोग्य–त्याचा पत्ताच नव्हता. खरजेने सर्व पोरे भरलेली होती. पिसवा व ढेकूण ह्या शोषितांचे शोषण अव्याहत करीत आहेत. एकूण जसे आपले भारतीय खेडयाचे चित्र असते तसेच हेही आहे. सर्व समाजाला व्यापून उरलेले जेवढे प्रश्न आज समस्या म्हणून आहेत त्या सर्व येथेही आहेत.

ग्रामीण पुनर्रचनेचे काम करीत असताना आर्थिक, सामाजिक व राजकीय ह्या तीनही स्तरांवर एकाचवेळी, एकाच वेगाने काम करण्याचा आमचा आग्रह असतो. कोठून तरी कामाला सुरुवात करावी लागते. आम्ही पाण्याच्या विहिरीपासून सुरुवात केली. पूर्वी खणलेली विहीर होती. हरिजनांनी श्रमदानाने दोन तीन महिने काम केले. ग्रामायनची तरुण मुले दर रविवारी येऊन त्यांच्या श्रमात सामील होत होती. आता विहिरीने बराच आकार घेतलेला आहे. ह्या विहिरीभोवती सर्व विकासाचे काम गुंफण्याचा विचार आहे. त्या दृष्टीने त्या मंडळींना मी एक पत्र पाठविले. ते खाली देत आहे. ]

दिंडोशी. ता. २६।३।७७

प्रिय मारुती ओहोळ व हरिजनवस्तीवरील रहिवाशी, सर्व तरुण मुले, स्त्रिया व सर्वांस–

सप्रेम नमस्कार वि. वि.

मी ता. १७।३।७७ ला संध्याकाळी तुमच्या विहिरीवर काम चालले आहे तेथे आलो होतो. तुम्हा मंडळींशी बोलणे झाले. त्यानंतर दररोज संध्याकाळी आपण भेटत होतो. विहिरीच्या कामासंबंधी बोलत होतो. ता. २०।३।७७ ला मी विहिरीवर आलो, त्यावेळी डोंगरीपाडयावरची तुम्ही तमाम जनता विहिरीच्या कामावर तुटून पडला होतात. एकत्र, एकजुटीने काम करण्याचा तुमचा जोष पाहून माझ्या मनात ह्या तुमच्या विहिरीसंबंधी बरेच विचार येत आहेत. ते लिहून कळवावे म्हणून हे पत्र पाठवीत आहे.

ह्या आपल्या नव्या विहिरीला आपण "जनता" विहीर हे नाव द्यायचे का? ह्याबद्दल तुम्ही मंडळींनी विचार करावा. ते नाव तुम्ही ठरवायचे आहे. मी नाही. मी फक्त सुचविले आहे.

ह्याशिवाय आणखीही तुमच्याजवळ मला बोलायचे आहे. आता मध्य सरकारात जनता पक्ष अधिकारावर आला आहे. ह्याचा अर्थ काय ? हा अर्थ आपण समजून घेतला पाहिजे. तुम्ही मंडळी म्हणाल की, आमचा राजकारणाशी काय संबंध ? इतके दिवस कदाचित नसेलही. पण आता तुम्ही विहीर खणायला घेतली आहे. तुम्हीच ती खणणार आहात. तुम्हीच ती बांधणार आहात. तुम्हीच तिचे पाणी वापरणार आहात. तुम्हीच तिचे पाणी नायगावच्या इतर रहिवाश्यांना वापरायला देणार आहात. थोडक्यात तुम्ही ही जनतेची विहीर तयार करीत आहात.

तसेच तुम्ही आणखीही बरेच काही करणार आहात. ह्या विहिरीच्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी करणार आहात. म्हणजे मग ते स्वच्छ कसे राहील ते तुम्ही पाहणार आहात. कोणालाही ते घाण करू देणार नाही. ते पाणी रोज कपडे धुण्यासाठी वापरणार आहात. रोज सर्वांना आंघोळ करायला मिळावी म्हणूनही वापरणार आहात. म्हणजे तेथील सांडपाणी विहिरीचे पाणी खराब करणार नाही हे तुम्ही पहाणार आहात. अगदी अलीकडेच कुसुमने तुमच्या लहान मुलांना आठवडयातून दोन वेळा आंघोळी घालण्याची सोय केली तेव्हा मुलांना केवढा आनंद झाला होता ! तो आनंद आता तुम्ही पाहणार आहात. आंघोळी करून मुले स्वच्छ झाली की, पाडयावरची खरूज तुम्ही दूर करणार आहात. पिसवा, ढेकूण घालविणार आहात. म्हणजे काय ? तुम्ही मानवी जीवन जगणार आहात.

ह्या विहिरीच्या पाण्याचा उपयोग जसा पिण्याकरता करणार आहात तसाच तुमच्या शेतीकरिताही करणार आहात पावसाळयात केव्हा केव्हा १५–२० दिवस पाऊस दडी मारतो तेव्हा हे पाणी वापरणार आहात. गेल्या वर्षी १ महिना पाऊस नव्हता. तेव्हा

राब सुकून गेले होते. शेतात लावणीला पाणी नव्हते. अशा वेळी तुम्ही ह्या पाण्याचा उपयोग करणार आहात. आणि असा उपयोग तुम्हा सर्वांच्या जमिनीकरिता करणार आहात. भातशेतीनंतर एखादे ज्वारी किंवा गव्हाचे पीकही तुम्ही त्या पाण्यावर घेणार आहात.

म्हणजे काय होते आहे ते पहा. आपली एक विहीर. तिचे नाव जनता. ती एकटयाची नाही. सर्वांची. फक्त हरिजनाची नाही. सर्व जनतेची. आणि आपली रोगराई घालविण्याकरिता आपली शेती पिकविण्याकरिता. म्हणजे आपल्याला जास्त धान्य देण्याकरिता. आपली गरिबी कमी करण्याकरिता.

आणि हे सर्व कोण करणार? हे सर्व काम तुम्ही सर्वजण करणार आहात. तुमच्यातील म्हातारे करणार. बाया करणार. तरुण मुले, मुली करणार. लहान मुले, मुली करणार. दुसरा कोणी येऊन, दुसरा कोणी तरी बाहेरचा माणूस येऊन हे करणार नाही. तर तुम्हीच, तुम्ही स्वतःच हे सर्व करणार आहात.

याचा अर्थ काय? तुमच्यामध्ये तुमचे प्रश्न सोडविण्याची शक्ती आहे. तुमच्या अडचणी दूर करण्याची शक्ती आहे. तुमच्यावरचा अन्याय दूर करण्याची शक्ती आहे. सर्वांना न्याय देण्याची शक्ती आहे. फक्त जरूर आहे ती ह्या शक्तीच्या जाणीवेची. ती शक्ती तर तुम्ही एकत्र काम करून आता चांगली समजून घेतली आहे. तुम्ही सर्वांनी एकत्र होऊन हे काम सुरू केलेत म्हणून तर हे सर्व दिसू लागले. हे एकटयाचे काम नाही. आणि गरिबांचे तर एकटयाने काहीच चालत नाही. श्रीमंतांचे एखादेवेळी चालेल. म्हणून गरिबांनी एकत्र यायला हवे. आपले प्रश्न, आपले दुःख समजून घ्यायला हवे. ते एकत्र बोलायला हवे. एकत्र विचार करून ते दूर कसे करायचे हे ठरवायला हवे. आणि त्याप्रमाणे करायला हवे. आपल्यातलाच कोणी वेडावाकडा वागू लागला तर त्याला समजावून योग्य मार्गावर आणायला हवे.

सरकार तरी दुसरे काय करते! सर्व हेच काम सरकारने करायचे असते. आणि आता नवे जनता सरकार जेव्हा अधिकारावर आले तेव्हा जयप्रकाशांनी काय सांगितले? माहीत आहे तुम्हाला?

राज्यसत्ता आणि लोकसत्ता परस्पर सहकार्याने कार्य करतील याची जनता पक्ष सरकारने हमी द्यावी असे आवाहन लोकनायक श्री. जयप्रकाश नारायण यांनी केले आहे.

नेतेपदी निवड झालेले श्री. मुरारजी देसाई जयप्रकाशजींच्या बाजूलाच बसलेले होते. त्यांनी लागलीच जयप्रकाशजींच्या सूचनेप्रमाणे राज्यसत्ता व लोकसत्ता निकट सहकार्याने कार्य करतील असे आश्वासन दिले.

आता राज्यसत्ता तयार आहे. लोकसत्ता तयार व्हायला हवी आहे. ती सत्ता तर आता तुमच्याच हातात आहे. ही लोकसत्ता तयार करण्याचा प्रयत्न तुम्ही करायला हवा. तो तुम्ही केलात तर, तुम्हीच सरकार आहात हे तुमच्या लक्षात येईल.

तुमची विहीर ही आपण १५।५।७७ पूर्वी बांधून घेणार आहोत. त्याकरिता जरूर ती रक्कम देणगीरूपाने आपण गोळा करीत आहोत. हे काम होईल अशी खात्री आहे. विहीर कशी बांधली जाईल याची चिंता नाही. तुम्ही फक्त काम कसे करायचे ह्याची चिंता करा. आगे बढो! जोरात काम करा. आम्ही तुमच्याबरोबर आहोत.

कळावे.

आपला

—आबा


ग्रामीण आंदोलनांचा मागोवा घेणारे पुस्तक

# श्रीग्रामायन

( दुसरी आवृत्ती : प्रकाशनाच्या वाटेवर )

श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव । पुणे ३०

मूल्य : पंधरा रुपये

# अवती–भवती

शरद कृष्णन्

## □ पुन्हा एकदा रणधुमाळी

नऊ राज्यांच्या मंत्र्यांनी–आपआपल्या राज्याच्या विधान सभा बरखास्त करण्याची विनंती राज्यपालांना करून मतदारांना सामोरे जावे, अशी विनंती करणारे पत्र केंद्रिय गृहमंत्र्यांनी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना लिहिल्यानंतर स्वाभाविकपणे आधीच कोलमडून पडलेला काँग्रेसपक्ष हादरून गेला. गृहमंत्र्यांच्या या विनंतीवजा हुकुमाबद्दल देशभर प्रतिसाद उमटले. आणि वातावरण पूर्ण खुले असल्याने मनमोकळ्या प्रतिक्रिया नोंदल्या गेल्या. संबंधित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांपैकी चार राज्यांच्या मुख्य मंत्र्यांनी न्यायालयाकडे धाव घेतली. आणि न्यायालयामध्ये चार दिवस या विषयावर भरपूर खल झाल्यावर सर्वोच्च न्यायालयाने हा अर्ज फेटाळून लावला. आणि केंद्रिय मंत्रिमंडळाने लगोलग या नऊ राज्यांच्या विधान सभांचे विसर्जन करण्याची शिफारस राष्ट्रपतींना केली. निवडणुकांचा सारीपाट पुन्हा एकदा मांडला जाणार असल्याने आता पुन्हा तयारी युद्धाची.

लोकसभेच्या निवडणुकांच्या निकालामुळे काँग्रेसपक्ष इतका जबर हादरून गेला आहे की, केंद्रिय गृहमंत्र्यांनी विधानसभा निवडणुकांचे डमरू वाजवण्यास प्रारंभ करताच आधीच गर्भगळीत झालेल्या या पक्षाला कापरे भरले आहे. पडझड मागे ढकलून–आणि झालेल्या निवडणुकीच्या पराभवाची चिकित्सा करण्याचे निमित्त करून चिखलफेक करण्यापेक्षा येणाऱ्या निवडणुकांना सामोरे कसे जायचे हाच खरा प्रश्न काँग्रससमोर आहे. म्हणजेच येऊ घातलेले ए. आय. सी. सी. चे अधिवेशन हे निवडणूक तयारीची जुळवाजुळव करण्यासाठीच खर्ची घालावे लागणार आहे.केवळ काँग्रेसच्याच बाबतीत हे होणार आहे असे नाही, तर जनता पक्ष आणि लोकशाहीवादी काँग्रेस यांनाही लोकसभेच्या निवडणुकांमुळे आलेला शीण बाजूला ठेवून, पुन्हा एकदा जनतेसमोर यावे लागणार आहे.

चार प्रमुख पक्षांच्या विलिनीकरणातून अस्तित्वात येत असलेल्या या पक्षाला मंत्रिमंडळ बनवणे जड जाईल, घटक पक्षामध्ये लाथाळ्या होतील, या काँग्रेसच्या मनामधील कल्पना हवेत विरून गेल्या आहेत. जनता पक्षाचे सरकार सुस्थिर होत आहे, आणि पूर्ण कालखंडासाठी ते व्यवस्थित शासन देणार आहे, एवढा विश्वास पहिल्या दोन महिन्यांत निश्चितपणे निर्माण झाला आहे. बेजबाबदार विधाने करण्याची प्रवृत्ती मागे पडली असून सर्व मंत्री जबाबदारीने आपआपल्या मंत्रालयाचे कामकाज पाहत आहेत, असे दृश्य दिसत आहे. रशियाचे परराष्ट्रमंत्री, गोमिको यांची स्नेहयात्रा यशस्वी ठरली आहे. नवीन परराष्ट्र मंत्र्यांनी आपण काकणभर सरसच आहोत, याची प्रचीती आणून दिली आहे. माहिती व नभोवाणी मंत्री एल्. के. अडवानी यांनीही मंत्रालयाचे नवीन धोरण स्पष्ट केले असून, भीतीचे वातावरण नाहीसे करण्यात यश मिळवले आहे. या सगळ्या गोष्टींचा फायदा जनता पक्षाला विधान सभांच्या निवडणुकांमुळे मिळणे अपरिहार्य आहे. केंद्रिय गृहमंत्र्यांनी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विधान सभा विसर्जनाबाबत जे पत्र लिहिले होते, त्यामध्ये असे स्पष्ट नमूद केले होते की, विधान सभा विसर्जनाचा आपला सल्ला मानला तर, काळजीवाहू सरकार म्हणून तुमच्या सरकारला काम करता येईल. तथापी गृहमंत्र्यांच्या पत्राविरुद्ध वातावरण तापवणे आणि न्यायालयाकडे धाव घेणे काँग्रेसने पसंत केले. राजकीय पातळीवर दिले गेलेले आव्हान कायदेशीर पातळीवर नेऊन निवडणुकांना सामोरे जाण्याच्या मनस्थितीमध्ये आपण नाही, अशी सुस्पष्ट कबुली कालपर्यंत सत्ताधारी असलेल्या या पक्षाने दिली आहे. त्यांच्या या निर्णयाचा एक मोठा परिणाम म्हणजे निवडणुकीच्या वेळी केंद्रस्थानीही सत्ता नाही आणि राज्यपातळीवर सत्ता नाही. अशी वेळ प्रथमच निर्माण होणार आहे. जनतेची साहानुभूती नाही,हातामध्ये सत्ता नाही म्हणजेच निवडणुकांसाठी पैसा उभा करण्याचे मार्ग खुंटलेच की ! यशवंतराव चव्हाण लोकसभा निवडणुकीच्या वेळी सांगत असत:–काँग्रेस पक्ष हत्तीसारखा आहे. सारी ताकद एकवटून येण्यास त्याला जरा वेळ लागतो. पण एकदा हा पक्ष निवडणुकांसाठी उठला की, त्याला हत्तीचे बळ येते. या बळामागे प्रचंड आर्थिक सत्ता उभी असे. न निघणाऱ्या स्मरणिकेमधील पानभर जाहिरातीसाठी पन्नास-पन्नास हजार रुपये चट गोळा होत असत. देणाराला खात्री असे की, काँग्रेस पक्षच पुन्हा येणार आणि तसा तो आला की, दिले दान व्याजासुद्धा वसूल होणार. आता सत्ता नाही आणि राज्यपातळीवरही ती मिळण्याचा संभव नाही. काँग्रेसची निवडणुक-यंत्रणा ही सतत झिरपणाऱ्या द्रव्याच्या सावलीने उभी असत. निष्ठांपेक्षा फायदा–तोट्याचे हिशेब लक्षात घेऊन मंडळी प्रचारयंत्रणेमध्ये उतरतात, असा या पक्षाबाबतचा अनुभव आहे. आतापर्यंत द्रव्याची कधीच अडचण नव्हती. आता द्रव्य आणि मनुष्यबळ या दोन्हीबाबत प्रश्न निर्माण होणार आहेत. दिल्लीची पक्षाची केंद्रिय कचेरी चालवण्यासाठी–महिना पाच लक्ष रुपये खर्च करणारा, राज्यपातळीवरील प्रश्न सोडवण्यासाठी जाणाऱ्या निरीक्षकांसाठी पंचतारांकित हॉटेलवर पैशाची उधळण करणाऱ्या या पक्षाला निवडणुकांना सामोरे जाताना आपल्या संपूर्ण आर्थिक धोरणाची पुनर्रचना करावी लागणार आहे. उमेदवारांची निवड, त्यांच्या निष्ठा, कार्यकर्त्यांची उपलब्धता, आणि प्रभावी वक्ते, या प्रत्येक बाबतीत काँग्रेस अडचणीमध्ये आहे.

पृष्ठ २७ वर

# एका खेड्यातील आंबेडकर जयंती

प्रा. राम डिमळे

पुण्याच्या दक्षिणेला नसरापूर–वेल्हे रस्त्यावर गुंजवणी नदीकाठी विंझर नावाचे एक मावळी खेडे आहे. जिराईत डोंगरी रान, तांबूस माती, भातशेती अन् दुधदुभत्यावर पोट भरणारी बहुतेक सर्व जातींतली थोडी थोडी कुटुंबे. मराठा कुटुंबांची संख्या त्यातल्या त्यात बरीच. पाच–दहा मातब्बर ब्राह्मण कुटुंबे अगदी जाणवेल एवढा प्रभाव गावावर ठेवून आहेत. गांव अगदी दरिद्रीदेखील नव्हे अन् बागायती समृद्धीची मुसमुसती हिरवी कळी ल्यायलेलेही नव्हे. सर्वसामान्य मावळी गावांचा तांबूस धुळीचा रखरखीत फुफाटा शिवाराला वेढून आहेच. अशा गावात पोटा-पाण्याच्या प्रश्नापलिकडे अन्य कशाचा विचार सुचू शकेल, अशी शंकाही कुणाला यायचे कारण नाही.

नाही म्हटले तरी, विंझर जरा वेगळेच गाव आहे. साधारणपणे कुठल्याच खेड्यात न दिसणारी संघाची नियमित शाखा या गावात भरते. १९६१ सालापासून येथे एक बऱ्यापैकी हायस्कूल गावकऱ्यांनी जिद्दीने उभे केले आहे. पुण्याच्या प्रसिद्ध फडकेबंधूंचे दुधदुभते याच भागातून जमा होते. याशिवाय पुणे जिल्ह्यात अगदी वेगळी, वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली डेअरी सोसायटी या विंझर गावचीच. या डेअरी सोसायटीच्या एका माध्यमातून नाना प्रकारच्या संघटित कामांना चालना देणारे चंदुकाका रायरीकर याच गावचे. खानापूरच्या डॉ. मोडकांच्या 'सह्याद्री विकास मंडळा'चे हरिजनसेवेचे उपक्रमही विंझरच्याच हरिजनवस्तीत चालतात.

दि. १४ एप्रिल ७७ रोजी या गावात आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम झाला. साधारणपणे आंबेडकर जयंती आंबेडकरांच्या वारसांनीच महारवाड्यात करायची. (नामदेवाची पालखी शिंपी आळीत उतरायची अन् ज्योतिबा फुल्यांना माळ्यांनीच भजायचे. एकूण काय, कुंपणे मोडणाऱ्यांची स्मारके कुंपणातच बंदिस्त करायची!) इतरांनी करायची ती काही राजकीय सारवासारवी साधत असेल तरच. पण परवाची जयंती मात्र गावाच्या ऐन मध्यात, भैरोबाच्या देवळात अन् खुद्द सवर्ण तरुणांच्या आग्रहाने झाली. तीही त्या दिवशी नुसतीच टाळीबाज सभा झाली नाही तर, गावचे कडेकोट पाणवठे त्या दिवशी हरिजनांसाठी पान्हवले. हा चमत्कार कसा झाला?

बाहेरच्या कुठल्याही प्रेरणेशिवाय एखाद्या खेडेगांवात समजून उमजून असा कार्यक्रम कसा घडू शकतो, या प्रक्रियेचा अनेक ग्रामीण कार्यकर्त्यांनी अभ्यास करण्यासारखा आहे.

शहरातून ग्रामविकासाच्या प्रेरणेने खेडो-पाडी जाणाऱ्या कार्यकर्त्यांना नेहमी सतावणारा यक्षप्रश्न एकच असतो. गावात ज्यांची जरब आहे, वट आहे अशा गावपुढाऱ्यांना त्यांच्या फायद्यातोट्याच्यापलिकडे जाऊन सार्वजनिक हिताचा विचार करायला कसे लावायचे? खेड्यातील असे कार्यक्रम नेहमी एका कोपऱ्यात चालतात. गावचा गाभा या कामापासून दूरच राहतो. अन् समजा, गावानं ही कामं आपली म्हणून स्वीकारली, तर बहुतांश मलई गावदादांनी गिळलेली असते. एकूण काय, गाव बदलत नाही तो नाहीच.

विंझरच्या चंदूकाका रायरीकरांनी बनवलेला फॉर्म्युला या दृष्टीने नवीन अन् प्रभावी आहे. रायरीकर विंझरमध्ये १७–१८ वर्षे काम करताहेत. संघ, आप्पासाहेब भागवत, थोडेसे राजकीय काम इत्यादी गोष्टींच्या माध्यमातून गाव काही हलले नाही, हे त्यांनी अनुभवाने हेरले. ज्यांना नवीन कल्पना सांगायच्या, सुचवायच्या, त्यांच्या पोटा-पाण्याची चिंता न करून भागणार नाही. प्रथम पोटोबाचे नर्तन, मग विठोबाचे कीर्तन.

चंदूकाकांनी गावची डेअरी सोसायटी हाती घेतली. रोज ५–७ शे लिटर दूध एकट्या विंझरमधून गोळा होऊ लागले. गाईचे शुद्ध दूध गोळा करणारी विंझरची सोसायटी अपवादात्मकच. दूध जास्तीतजास्त उत्पन्न व्हावे म्हणून पशुसंवर्धनाची शक्य ती आधुनिक तंत्रे काकांनी विंझरमध्ये आणली. गरीब, धनगर, हरिजन इ. कुटुंबांना हा दुभत्याचा आधार कसा देता येईल, याची चिंता काकांनी जास्त केली. कुटुंबांकडे येणारा वाढता पैसा, आवश्यक कौटुंबिक गरजा व उत्पादनवाढीतच खर्च व्हावा म्हणून रोख रकमेत पगारवाटप न करता वस्तुरूपाने वाटप सुरू केले. पुढे १०० गवळ्यांचे हे एक मोठे कुटुंबच मानून त्यांच्या सुख-दुःखांचे, अडीनडींचे सामूहिक विचार सुरू झाले. तालीम, शाळा, वाचनालये इ. सार्वजनिक गोष्टी अधिक चांगल्या रीतीने चालवण्याचा एकत्र संकल्प होऊ लागला. अर्थातच गावच्या नेतृत्वाचा तरुण गाभाच काकांनी नव्या विचारांशी जोडून घेतला. ही प्रक्रिया बऱ्याच काळाने संथ अन् निश्चित गतीने झाली. गावातली तरुण कुस्तीगीर मुले स्वयंस्फूर्तीने काकांबरोबर नवा विचार मांडू लागली.

एकदा अशी स्वाभाविक अनुकूल अवस्था आल्यावर नवीन पायंडे पाडण्यासाठी घनघोर संघर्ष व तावातावाने व्याख्यानबाजी करावी लागली नाही. गावची मराठा मुलेच म्हणू लागली, 'आपल्या गावात एक गाव एक पाणवठा' झालाच पाहिजे.

२० मार्च ७७ ला चवदार तळ्याचा स्मृतिदिन साजरा झाला. २७–२८ मार्चला ग्रामायनचे प्रा. व्ही. आर. देशपांडे व अनिल अवचट गावात येऊन राहिले. त्यांच्यासह हरिजन, सवर्ण व एकत्र अशा बैठकी झाल्या. बैठकीत उलटसुलट चर्चा झाल्या. या चर्चामध्ये, उपदेशी हेका नव्हता. समजावून देण्याचा प्रयत्न होता. गावची हरिजन मंडळीदेखील 'झालेच पाहिजे' छाप पवित्र्यात नव्हती. विहिरी खुल्या करणे ही नुसती वरवरची, दिशा दर्शविणारी कृती आहे. खरी गरज अस्पृश्यांना सर्व व्यवहारात मानाने बरोबरीचे स्थान देण्याचा आहे. पाण्याला समपातळीचे मोठे वेड आहे. म्हणून ज्यांना विषमता मोडायची आहे त्यांनी पाण्यापासून प्रारंभ करायचा एवढाच त्याचा अर्थ. हरिजन व सवर्णांना हे सर्व समजावून देण्यात कार्य-

कर्ते यशस्वी झाले. शेवटी २९ मार्च ७७ ला रामनवमीच्या मुहूर्तावर गावच्या विहिरी सवर्णांनी समारंभपूर्वक अस्पृश्यांसाठी खुल्या केल्या.

सर्जेराव भोसले, उत्तम भोसले, मारुती भोसले, ज्ञानोबा लिम्हण, साधू लिमण, बळिवा लिमण या साऱ्या तरुण मुलांनी विहिरी खुल्या व्हाव्यात म्हणून आग्रह धरला, त्यांना त्यांच्या घरांतून या कारणासाठी बराच विरोध झाला. मुलांनी आपल्या आई-वडील व भाऊबंदांना आपआपल्या परीने समजावून सांगितले. खुद्द घरातून असे बंडवाले निघाल्यावर जुन्या वळणाची म्हातारी माणसे गप्प झाली. देवळारावळातल्या चर्चांमध्ये हीच मुलं आपापल्या आयांना विचारात — 'तुम्ही म्हारांना घान म्हन्ता आन् बामनं तुम्हाला घान म्हन्तात. मंग राग त्येवढा तुम्हालाच यावा न् म्हाराला राग बिग् येऊ ने हा कोंचा न्याय झाला? मानसं तेवढी हितून तिथून सारखीच हो आता तरी शिका—!'

एक गाव एक पाणवठ्याचा कार्यक्रम धायरी, महंमदवाडी या गावी पाहिला होता. तिथं गावाबाहेरचा, नामदारमंत्री हा गावाला 'सांगू,' पाहत होता. त्यामुळं तिथलं कार्यक्रम नाही म्हटलं तरी सांगीबांगी झाल्यासारखे दिसत होते! विझरच्या विहिरींना आतूनच झरा फुटला होता!

विझरला ब्राह्मणांची पाच–दहा घरं आहेत. खेड्यातला ब्राह्मण आपल्या उच्च अस्मितेची कवचं घट्ट पकडून असतो. विझरकर ब्राह्मण याला अंशतः तरी अपवाद म्हटले पाहिजेत. फडके मंडळी संघ जनसंघाचे अध्वर्यूच म्हणायचे. त्यामुळे तत्त्वतः तरी 'आम्ही सकल हिंदू, बंधुबंधू'चे संस्कार त्यांचेवर झालेले. अर्थात् रोजच्या व्यवहारात ही सारी तत्त्वे रुजवणे खेड्यांच्या वातावरणात सहजी शक्य नाहीच. या दृष्टीने ६२ च्या निवडणुकीतला एक प्रसंग लक्षणीय आहे. ६२ च्या विधानसभेचे जनसंघ उमेदवार देवराम आवनावे म्हणून अस्पृश्य होते. प्रचारासाठी ते विझरला आल्यावर बापू फडक्यांकडे साहजिकच उतरले. प्रसंग जेवणाचा. एका पंक्तीत आवनाव्यांना बसवणे मुष्कीलच. न बसवावे तर ते कसे दिसेल! हा भलताच पेच बापूंच्या मातुःश्रींनी तात्काळ सोडवला. पाने एकाच पंक्तीत मांडली गेली. बापूंसकट साऱ्यांनी निःश्वास टाकला! फडक्यांच्याकडे स्पृश्यास्पृश्य व्यवहार पाळतात असे नव्हे, तरीही परवाच्या रामनवमीला फडक्यांकडचे पाणी भरायचे असा आग्रह पोरांनी धरला. अन् फडक्यांनीही तो तात्काळ मानला.

१४ एप्रिलच्या कार्यक्रमात हरिजन स्त्रियांनी भैरोबाला ओवाळले. बाबासाहेब आंबेडकर, गौतमबुद्ध यांच्या प्रतिमांची पूजा केली. पाहुण्यांना ओवाळले. भैरोबाच्या देवळात उत्साहाला उधाण आले होते. सभा खरोखरच सुंदर झाली. प्रारंभी कॉमर्सचे शिक्षण घेत असलेला मधुकर...गायकवाड बोलला. तो म्हणाला—'अस्पृश्यतेच्या दुष्ट रूढीमुळेच भारत जगामागे आहे. आता तरी अस्पृश्यता निवारणाचे आपण लावलेले हे रोपटे गावच्या सगळ्याच विहिरींच्या पाण्याने जगवू या.'

नंतर डॉ. मोडक यांचे अध्यक्षीय भाषण झाले. ते म्हणाले, 'हरेक गावात धार्मिक कारणांसाठी जसे सप्ताह होतात तसे सामाजिक कारणासाठीही व्हायला हवेत; म्हणजेच सामाजिक जबाबदारीची नेमकी जाणीव होईल.'

यानंतर डॉ. बाबा आढाव यांचे भाषण खूपच रंगले. आपल्या जागोजागच्या अनुभवांची रंजक डूब देऊन त्यांनी त्यांचे विचार डोलत्या डुयांमध्ये अलगद उतरवले. ते म्हणाले. 'हरिजनांना पाणी भरून दिले म्हणजे काही कुणाच्या आग्रहाखातर, मनात नसताना हे काहीच्या काही केले असे समजू नका; आपण केलंय् ते बरोबरच केलंय् याची खात्री बाळगा. हरिजनांबरोबरच स्त्रियांनाही मानानं वागवायचंय् हे विसरू नका. स्त्रियांना समान वारसाहक्क देण्याच्या मागणीसाठी बाबासाहेब आंबेडकरांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. याचं स्मरण ठेवा.'

यानंतर 'सकाळ'चे संपादक श्री. मुणगेकर यांचे भाषण झाले. विझरच्या ग्रामस्थांचे त्यांनी अभिनंदन केले. यानंतर श्री. राम डिमळे यांचे आभाराचे भाषण होऊन सभा संपली.

यापुढे स्त्रिया व शालेय युवकांशी विविध उपक्रमातून अधिक संपर्क यावा अशी श्री. रायरीकरांची योजना आहे. सामाजिक स्त्रियांमध्ये बदल करायचा तर समाजातील या थराशी अधिक संबंध आणला पाहिजे असे श्री. रायरीकरांना वाटते. □

# चक्रम्‌चक्री (१२)

दीर्घस्मृती विश्वनाथ

## □ का मे जननी, को मे तातः।

अमेरिकन लोकांना पूर्वीपासूनच आपलं घराणं, पराक्रमी पूर्वज आणि घराण्याची परंपरा यांचं फार आकर्षण आहे. आपल्या घराण्याचा अमेरिकेतील मूळ पुरुष इंग्लंडमधून अमेरिकेला गेलेल्या पहिल्या तांड्यातून आला, हे सिद्ध करण्याची त्यांची धडपड कित्येकदा केविलवाणी आणि अनेकदा हास्यास्पद ठरलेली आहे. इंग्लंडमधल्या जुन्या आणि आता मोडकळीला आलेल्या उमराव घराण्यांशी विवाहसंबंध व्हावेत अशी इच्छा अमेरिकेतील अनेक उद्योगपतींची असावयाची. पी. जी. वुडहाऊसच्या अनेक कादंबऱ्यांतून अमेरिकन धनिकांशी आपल्या मुलामुलींची लग्ने व्हावीत म्हणून विनोदी कारस्थाने रचणारे लॉर्ड्स् रंगविलेले असतात.

पण आपल्या कुळाची उच्चता आणि प्राचीनता यांचे आकर्षण केवळ अमेरिकेतल्या लोकांनाच असते असे नाही. आपल्याकडेही कित्येक रजपूत राजघराणी आपली कुलपरंपरा थेट रामचंद्रापर्यंत किंवा त्याही पूर्वी सूर्यचंद्रापर्यंत नेऊन भिडवितात. महाराष्ट्रात कित्येक मराठा घराणी आपण रजपूत कुलातील आहोत असे सांगण्यात धन्यता मानतात. हल्ली तर, कित्येक लोक जुनाट कागदांवर खोटा मजकूर लिहून पूर्वजांच्या पराक्रमांच्या कपोलकल्पित कथांना पुराव्याची जोड देण्याचा प्रयत्न करीत असतात अशी उदाहरणे आहेत.

आपले वाडवडील थोर होते हे सिद्ध करण्याची इच्छा सार्वत्रिक असली तरी, कित्येकदा ती विकृत रूप धारण करते. डी. एच. लॉरेन्सविषयी मला असं वाचल्याचं आठवतं की, आपला बाप कुणीतरी सरदार घराण्यातला असला पाहिजे अशी त्याची ठाम समजूत होती. आपल्या आईचे कोणा लॉर्डशी विवाहबाह्य संबंध होते आणि त्यासंबंधाचं

अपत्य म्हणजे आपण असं त्याला वाटत असे. हेही आपण समजू शकतो पण आपला पूर्वज अफझुलखानासारखा दैत्यतुल्य धटिंगण असावा, असं सिद्ध करण्याचा कोणी प्रयत्न करील का ? मागे पोतदारांनी एका व्याख्यानात अशी हकीकत सांगितली होती. प्रतापगडावरील अफझुलखानाच्या स्मृतिस्थानाच्या व्यवस्थेचा वाद चालू होता. दोन्ही बाजूंचा दावा असा होता की, आपणच अफझुलखानाचे वंशज आहोत. तसा काही पुरावा पोतदारांकडे मिळतो का, म्हणून एका बाजूने चौकशी केली होती.

## दाफ्ने द्यु मोरिए।

दाफ्ने द्यु मोरिए या इंग्लीश लेखिकेला स्वतःच्या पूर्वजांचे आणि स्वतःच्या घराण्याचे प्रेम आहे. आपल्या घराण्याचा एक कादंबरीमय इतिहासच तिने लिहिला आहे. तो इतिहासही अनेक मनोरंजक गोष्टींनी भरला आहे आणि बाईंची गोष्ट सांगण्याची हातोटी इतकी सरस की, कादंबऱ्या वाचताना क्षणाचा कंटाळा म्हणून येत नाही.

बाईंची खापरपणजी मेरी ॲन म्हणून एक बाई होती. वयात आल्यापासूनच तिचा चवचालपणा सगळ्यांच्या ध्यानात येऊ लागला होता. तिने लग्न केले ते एका उनाड दारूड्याबरोबर. तो दारूड्या बायका–मुलांना सोडून लवकरच कोठे नाहीसा झाला. मग मेरी ॲनने चक्क धंदाच चालू केला. धंदा जोरात चालू असतानाच एका सोद्याने मेरी ॲनची आणि इंग्लंडचा सेनापती, तिसऱ्या जॉर्जचा धाकटा मुलगा ड्यूक ऑफ यॉर्क याची गाठ घालून दिली. पणजीबाई ड्यूकची रक्षा म्हणून थाटात राहू लागल्या. पण ड्यूकने ठरवून दिलेला रोजमुरा आणि मेरी ॲनचा खर्च यांचा मेळ बसेना त्यावेळी बाईने लाच खायला सुरुवात केली. जो कुणी मेरी ॲनला पैसे देईल, त्याला ब्रिटिश सैन्यात ऑफिसरची नोकरी ! इतक्यात पणजीबाईंच्या दुर्दैवाने त्यांचा दारूडा नवरा उपटला. त्यामुळे ड्यूकला मेरी ॲनशी असलेले संबंध तोडावे लागले. मग बाईने काय करावे ? आपण ऑफिसरच्या नोकऱ्या कशा विकल्या याचा पुरावा तिने ब्रिटिश पार्लमेंटच्या विरोधी पक्षाला विकला. ड्यूकवर मोठा गहजब झाला. तरीदेखील पार्लमेंटने ड्यूकला निर्दोष सोडले. तेव्हा बाईने आपण आत्मचरित्र लिहिणार असा पुकारा केला ! ड्यूक हादरला. त्याने फार मोठी रक्कम मेरी ॲनला देऊन समझोता केला. मात्र त्या करारात अट अशी घातली की, खापरपणजीबाईंनी कायम फ्रान्समध्ये राहिले पाहिजे, इंग्लंडमध्ये पाऊल टाकता कामा नये.

मेरी ॲनला एक मुलगी होती. तिने द्यु मोरिए घराण्यातील लुई नावाच्या मुलाशी लग्न केले. लुईचा बाप रॉबर्ट हा एक लफंग्याच प्राणी होता. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात आपल्या बायकोला आणि मुलाला फ्रान्समध्येच सोडून तो इंग्लंडला पळून गेला. तिथे त्याने पुनः लग्न केले. मग तिथल्या बायका–मुलांना सोडून तो परत फ्रान्सला आला आणि इंग्लंडला पुनः गेलाच नाही. रॉबर्टच्या चरित्रावर दाफ्नेने 'द ग्लास ब्लोअर्स' म्हणून नितांत सुंदर कादंबरी लिहिली आहे. वास्तविक रॉबर्टचे आडनाव 'द्यु मोरिए' असे नव्हते. फ्रान्समध्ये द्यु अमुक तमुक किंवा द अमुक नमुक असे नाव असणे ही थोर घराण्याची खूण समजली जाते. आपण सरदार घराण्यातील आहोत असे लोकांना भासावे या इच्छेने रॉबर्टने द्यु मोरिए हे भपकेबाज पण खोटे नाव घेतले.

रॉबर्टचा मुलगा लुई आणि मेरी ॲनची मुलगी यांना जॉर्ज नावाचा मुलगा होता. तो इंग्लंडात स्थायिक झाला आणि व्यंगचित्रकार म्हणून फार नावाजला गेला. व्यंगचित्रकलेच्या इतिहासात त्याचा उल्लेख येतो. त्याने 'ट्रिल्बी' या नावाची त्यावेळी लोकप्रिय झालेली कादंबरी लिहिली होती. जॉर्जच्या जीवनावर दाफ्नेने 'द्यु मोरिए' या नावाची वाचनीय कादंबरी लिहिली आहे. त्यानंतर आपल्या वडिलांचे चरित्र लिहून दाफ्नेने आपल्या घराण्याचा इतिहास जवळपास पूर्ण केला.

दाफ्ने द्यु मोरिएने लिहिलेल्या आपल्या घराण्याच्या इतिहासात एक निःसंकोचीपणा आहे. वेश्या असलेली खापरपणजी आणि लफंग्या असलेला खापरपणजा ( पण खापरपणजीचा नवरा नव्हे ) यांच्याविषयी साहानुभूतीपूर्वक पण त्यांच्यातल्या दोषांचे कोणत्याही प्रकारे समर्थन न करता ती लिहू शकते. घराण्याविषयीचे तिचे प्रेम आंधळे नाही. ही एक लोकयात्रा आहे; त्यात आपली दिंडी सामील झालेली आहे. आधीच्या दिंडीच्या मागोमाग आपण आहोत, म्हणून त्या दिंडीतल्या यात्रेकरूंचे जवळून निरीक्षण करीत आहोत, इतकाच त्यातला भाव आहे. त्यामुळे एका अलिप्त मोकळेपणाने सगळे लिखाण झालेले आहे.

## रूट्स्

हल्ली पाश्चात्य जगात गाजणारा घराण्याचा इतिहास म्हणजे ॲलेक्स हेली या विद्वान लेखकाने लिहिलेले 'रूट्स्' हे पुस्तक. मार्गारेट मिचेलच्या 'गॉन विथ द विंड' नंतर इतके गाजलेले पुस्तक म्हणजे हेच, असं सगळ्यांनी एकमुखानं मान्य केलं आहे. या पुस्तकावर आधारलेला चित्रपट जेव्हा टेलिव्हिजनवर दाखविण्यात आला, तेव्हा हॉटेले, चित्रपटगृहे, खेळाची मैदाने इतकेच काय पण, दारूचे गुत्तेसुद्धा ओस पडले अशी वर्णनं आहेत. हेलीने आतापर्यंत अनर्थ पैसा या एका पुस्तकावर कमावला; आणि पुस्तक प्रसिद्ध होऊन अजून ८–९ महिने देखील झालेले नाहीत.

ॲलेक्स हेली हा श्वेत-कृष्ण अशा मिश्र-रक्ताचा मनुष्य आहे. त्याने आपल्या निग्रो पूर्वजांचा शोध घेतला. त्यासाठी अनेक ग्रंथालयातले अगणित कागदपत्रं त्याने धुंडाळली. मागोवा घेत घेत तो आपल्या टोबी ऊर्फ कुंटा किंटे या नावाच्या पूर्वजापर्यंत पोचला. हा आफ्रिकेतून गुलाम म्हणून अमेरिकेत आणला गेला होता. आफ्रिकेतल्या कोणत्या भागातून तो आला, त्याचे वाडवडील काय करीत होते हे कळणे महामुष्किलीचे होते. पण दोन धागे हेलीला मिळाले. टोबीकडून त्याच्या मुलांना आणि तिथून पुढे हेलीपर्यंत चालत आलेली आठवण अशी होती की, टोबी आफ्रिकेच्या ज्या भागातून आला त्या भागात व्हायोलिनसारख्या वाद्याला 'को' असे नाव होते. टोबीच्या देशातून एक महानदी वाहत होती, तिचे आफ्रिकन नावही परंपरेने हेलीला माहीत होते.

या दोन धाग्यांच्या आधारे हेलीने शोधून काढले की, टोबी हा गॅम्बिआ या देशातून आला असला पाहिजे. म्हणून हेली गॅम्बिआला गेला. तिथे त्याची काबे फोफाना नावाच्या माणसाशी गाठ पडली. काबे

फोकाना हा किंटे या नावाच्या टोळीचा भाट होता, म्हणजे त्या टोळीचा इतिहास पाठ म्हणणारा माणूस होता. त्याने हेलीला सांगितले की, फार पूर्वी कुंटा किंटे नावाचा किंटा टोळीचा जोरे नावाच्या गावी राहणारा माणूस लाकडं तोडायला रानात गेला असताना गुलामांच्या व्यापाऱ्यांच्या हस्तकांनी त्याला पळविले.

या पुराव्यावर आधारलेली एक इतिहास-सदृश कादंबरी हेलीने लिहिली. वास्तविक, त्यात फारसे नवे काही नाही. कारण, अमेरिकेतल्या मालकाने मुक्त केलेल्या गुलामाने पुनः आफ्रिकेत जाऊन लिहिलेलं १७६०–६५ च्या सुमाराचं आत्मचरित्र आजही उपलब्ध आहे. गुलामांच्या व्यापाराचे इतिहास आहेत. त्यावेळी ज्या जहाजांवरून गुलामांची आयात होत असे त्या जहाजांचे अहवालही आहेत. पण गेल्या दशकात अमेरिकेतील कृष्णवर्णीयांत जी जागृती झाली आणि श्वेत-अमेरिकनांना निग्रोंविषयी जो नवा उमाळा अलिकडे वाटू लागला आहे, त्यामुळे 'रूट्स्' या पुस्तकाने एवढो खळबळ माजवून सोडली आहे.

हेलीचा हा इतिहास म्हणजे एक फसवणूक आहे असे सुचविणारा एक लेख मार्क ओटॉने नावाच्या लेखकाने १० एप्रिलच्या 'संडे टाईम्स' (लंडन) मध्ये लिहिला आहे. ओटॉवेच म्हणणं असं की, हेलीला कुंटा किंटेची माहिती देणारा काबे फोफाना हा मुळी किंटे टोळीचा भाट नव्हताच. तो एक थापाड्या मुसलमान माणूस होता आणि हेलीला नक्की कोणती माहिती हवी आहे, ते त्याला आधीपासून माहिती होते. त्यामुळे हेलीचे ज्यामुळे समाधान होईल अशीच माहिती काबे फोफानाने त्याला दिली. त्यानंतर रिचर्ड वेस्ट नावाच्या लेखकाने २३ एप्रिलच्या स्पेक्टॅटरमध्ये एक लेख लिहिला असून हेलीला मिळालेली माहिती बरोबर असण्याचा दाट संभव आहे असे ठासून सांगितले आहे.

### आत्मा वै पुत्र नामासि

हेलीने लिहिलेली स्वतःच्या पूर्वजांची माहिती खरी असो अगर खोटी असो, हेलीला स्वतःला ती खरी वाटते, हा महत्त्वाचा भाग आहे. कारण अखेर घराण्याचा इतिहास स्वतःच्या समाधानासाठी लिहिला जातो. चंद्र हा एक उजाड गोळा आहे, असे निःसंशय सिद्ध झाले. पण तरी 'चंद्र माझ्या अंतरीचा मीच केवळ पाहतो.' असे कवी बजावतच असतात. पूर्वजांच्या इतिहासाचेही तसेच आहे.

जर पूर्वजांची खरी हकिकत कळणे दुरापास्त आहे किंवा कळली तरी, ती अभिमानास्पद निघणे क्वचितच शक्य आहे, तर घराण्याच्या इतिहासाची ही ओढ कशासाठी? 'का मे जननी, को मे तातः' हा प्रश्न का? त्याचे उत्तर असे दिसते की, कुलाचा शोध हा एक स्वतःचाच शोध असतो. 'आत्मा वै पुत्र नामासि' असे उपनिषदांत म्हटले आहे. आपला मुलगा म्हणजे आपल्याच आयुष्याचे दीर्घीकरण आहे, असा त्याचा अर्थ आहे. हा अर्थ जर भूतकाळाकडे लावला तर, सर्व घराण्याचा इतिहास एकाच मनुष्याच्या आयुष्यातल्या निरनिराळ्या प्रवेशांचा समूह आहे असे मानावे लागेल. आपण या चालू आयुष्यातले निरनिराळ्या वेळी काढलेले फोटो पुनः पुनः पाहण्यात आनंद मानतो, तर निराळ्या मुखवट्याखाली निराळ्या कालखंडातील आपल्याच हालचालीचा पट हवाहवासा वाटावा यांत नवल ते काय? □

# विधानसभा निवडणुका

## काँग्रेसचे दोष निर्धाराने टाळा

वा. दा. रानडे

देशातील वातावरण पुनः एकदा निवडणूकमय होत आहे. विधानसभा निवडणुका घेण्यास केंद्र सरकारला मनाई करावी हा चार काँग्रेस राज्यांतर्फे करण्यात आलेला अर्ज सुप्रीम कोर्टाने फेटाळला आणि निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला. राष्ट्रपतींनी सही करण्याचे नाकारल्याच्या बातम्या प्रथम आल्याने, पेचप्रसंग निर्माण होणार काय, असे वाटले पण तो टळला. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे जेथे 'पानिपत' झाले त्या पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा, मध्य प्रदेश या नऊ राज्यात निवडणुका व्हावयाच्या आहेत. याशिवाय तामिळनाडु, काश्मीर आणि गोवा येथेही याच सुमारास निवडणुका होतील. याशिवाय दक्षिणेकडील राज्यात विधानसभा विसर्जनाचा सल्ला देण्याचा केंद्राचा विचार दिसत नाही. पण तेथील काँग्रेस मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना तसा सल्ला दिल्यास तेथेही निवडणुका घ्यावा लागतील. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका न घेता सतरा पोटनिवडणुका घ्यावयाच्या असे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी ठरविले आहे पण केंद्राने विसर्जनाचा सल्ला दिलाच तर, आमची निवडणुकांना तयारी आहे, आम्ही पळून जाणार नाही असे त्यांनी सांगितले. याबाबतचे चित्र एका आठवड्यात स्पष्ट होईल. पण सर्वच राज्यात एकाचवेळी विधानसभा निवडणुका झाल्या असत्या तर, चांगले झाले असते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाचवेळी घ्यावयाचे धोरण यापुढे स्वीकारण्यात यावे. पण जेथे विजयाची खात्री नाही तेथे आपली शक्ती कशाला खर्च करावयाची असा विचार जनता पक्षाने केलेला दिसतो.

उत्तरेकडील नऊ राज्यांपैकी ओरिसात ४, पश्चिम बंगालमध्ये ३, राजस्थानात १ आणि मध्यप्रदेशात १ अशा अवघ्या ९ जागा काँग्रेसला मिळाल्या आहेत. बाकीच्या पाच राज्यांत काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. मतदारांमधील जनता हवा किंवा जनता लाट लक्षात घेता या राज्यामध्ये विधानसभा निवडणुकांतही आपण मोठे यश मिळवू असा आत्मविश्वास जनता पक्षाच्या नेत्यांना वाटत आहे.

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय प्रश्नांवर

लक्ष केंद्रित होते, विधानसभा निवडणुकीत प्रांतिक प्रश्नांना महत्त्व येते ते कितपत खरे आहे हे या विधानसभा निवडणुकांवरून दिसून येईल. १९५२ पासूनच्या निवडणुकांवरून एक स्पष्ट झाले की, काँग्रेसविरोध लोकसभा निवडणुकीपेक्षा विधानसभा निवडणुकांत अधिक प्रकर्षाने व्यक्त झालेला आहे. १९७१ पर्यंत केंद्रातील काँग्रेस सत्तेस धक्का लागला नाही पण प्रत्येक विधानसभा निवडणुकीत राज्य पातळीवरील काँग्रेस सत्तेस अधिक प्रमाणात तडे पडत गेले. अपवाद फक्त १९७२ च्या निवडणुकीचा. १९५२ च्या पहिल्या निवडणुकीत मद्रास व पेप्सूमध्ये काँग्रेसला हुकमी बहुमत मिळाले नाही. पेप्सूमध्ये अल्पकाळ विरोधी पक्षांचे सरकार अधिकारावर होते. मद्रासमध्ये मात्र काही छोटे पक्ष आणि अपक्ष सभासद यांचा पाठिंबा मिळवून आणि राजाजींसारख्या वजनदाराने त्याला मुख्यमंत्री करून काँग्रेसने सत्ता हाती टिकविली. १९५७ च्या निवडणुकीत केरळमध्ये कम्युनिस्टांनी काँग्रेसचा पराभव करून मंत्रिमंडळ बनविले. १९६२ मध्ये राजस्थान आणि मध्य प्रदेशात काँग्रेसला हुकमी बहुमत मिळाले नव्हते पण अपक्ष सभासदांच्या पाठिंब्याने दोन्ही राज्यांत काँग्रेसने सत्ता टिकविली. १९६७ मध्ये आठ राज्यांत काँग्रेसची सत्ता गेली आणि त्यानंतर दहा वर्षांनी लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे केंद्रातही तिला सत्तेवरून दूर व्हावे लागले. पराभवामुळे काँग्रेस एवढी गलितधैर्य झालेली आहे की विधानसभा निवडणुकीत आपली पडझड ती सावरू शकेल अशी शक्यता दिसत नाही.

लोकसभा निवडणुकीतलेच प्रश्न विधानसभा निवडणुकांतही आहेत. काँग्रेसची राजवट असलेल्या नऊ राज्यांत काँग्रेसचा मोठा पराभव होणार हे उघड दिसत आहे तरीसुद्धा गाफील न राहता एकजुटीने, जागरूकतेने, जनता पक्ष व त्यांच्या सहकारी पक्षांनी निवडणूक लढविली पाहिजे. संधिसाधूंना पक्षात थारा द्यावयाचा नाही, तिकिटे द्यावयाची नाहीत ही दक्षता आतापासूनच घ्यावयास हवी. त्या दृष्टीने राज्यसभा व विधानसभांतील ज्या काँग्रेस व इतर पक्षांच्या सभासदांना जनता पक्षात येण्याची इच्छा असेल त्यांना मुक्त प्रवेश देण्याचा जनता पक्षाच्या कार्यकारिणीचा निर्णय योग्य वाटत नाही. विधानसभा निवडणुका घेणे शक्य झाले नाही तर, राष्ट्रपती निवडणुकीत विजय मिळविण्याच्या दृष्टीने राज्यसभा व विधानसभांतील आपले पक्षबळ वाढविता येईल. तेवढे वाढवावे हा या निर्णयामागे उद्देश असावा. पण आता विधानसभा निवडणुका होत असल्याने त्याची आवश्यकता नाही. आणि संधिसाधू पक्षांतराला उत्तेजन देणारा हा निर्णय तत्त्वतःही योग्य नाही. काँग्रेसचा दणदणीत पराभव होईपर्यंत ज्यांना काँग्रेसचे धोरण योग्य वाटत होते आणि आणीबाणीतील प्रत्येक गोष्टीचे ज्यांनी समर्थन केले त्यांनी निवडणुकीनंतर केलेले पक्षांतर उघड उघड संधिसाधूपणाचे असून त्यांना जनता पक्षात थारा मिळता कामा नये.

सत्तारूढ पक्षात जे दोष शिरतात आणि काँग्रेसमध्ये जे दोष प्रकर्षाने निर्माण झाले होते ते जनता पक्षात शिरणार नाहीत यासाठीही प्रथमपासून दक्षता घ्यावयास हवी. जयप्रकाशांनी सुचविलेल्या दक्षता समित्या सर्व पातळींवर अविलंब स्थापन झाल्या पाहिजेत. जनता पक्षाचे प्रतिनिधी चुकत असतील, आपले कर्तव्य नीट बजावत नसतील तर, जागरूक मतदारांनी त्यांना वठणीवर आणले पाहिजे. निवडणुकांइतकेच विधायक कार्य आणि अन्याय निवारण्यासाठी संघर्ष ही कार्यक्षेत्रेही महत्त्वाची असून तिकडे दुर्लक्ष होत नाही याबद्दल जपायला हवे. या कार्यक्षेत्रांकडे दुर्लक्ष होऊन सारे सत्तेच्या राजकारणामागे लागल्यानेच काँग्रेसची अवनती झाली. दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे विधिमंडळ आघाडी व संघटना यांचे योग्य संबंध. काँग्रेसमध्ये पक्ष संघटनेला काही महत्त्वच राहिले नव्हते. श्रीमती गांधींनी आपल्या हाती सर्व सत्ता एकवटली होती. त्या जे निर्णय घेतील त्यांना होय म्हणणे असे होयबाचे स्थान संघटनेला प्राप्त झाले होते. सरकारी धोरणातील, निर्णयातील, अंमलबजावणीतील चुका, उणीवा संघटनेने स्पष्टपणे दाखवायला हव्यात व त्यानुसार सरकारी निर्णय आणि धोरणात बदल झाले पाहिजेत. काँग्रेसमध्ये ही प्रक्रिया थांबली होती. जनता पक्षाच्या उभारणीत सुरुवातीपासूनच हे दोष टाळण्याचे प्रयत्न निर्धारपूर्वक झाले पाहिजेत. विधिमंडळ पक्ष आणि संघटना यांपैकी कोणीही एकमेकांवर वर्चस्व गाजविण्याचा किंवा कुरघोडी करण्याचा प्रयत्न न करता सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर विचारविनिमयाने निर्णय घेतले पाहिजेत. संघटनेतले अधिकारपद म्हणजे मंत्री म्हणून नको असलेल्या व्यक्तीची केलेली सोय अशी अनिष्ट प्रथा काँग्रेसने पाडली होती. निष्ठावंत कार्यकर्ते सरकारमध्ये हवेत तसेच संघटनेमध्येही हवेत. जनता पक्षाला निवडणुकात विजय मिळेल पण देशापुढील प्रश्न यशस्वीपणे सोडविण्याच्या दृष्टीने पक्ष उभारणीचे कार्य अधिक महत्त्वाचे आहे. □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# इलेक्शन-विलक्षण ( चित्रे )

रघुवीर मुळे

नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांत जे काही घडले, ते खऱ्या अर्थाने विलक्षणच होते. तीस वर्षे सत्तारूढ काँग्रेसची मांड सेवेच्या नावाखाली आणि एकसंध पक्ष संघटनेचे निशाण हाती घेऊन प्रशासनावर घट्ट होती. हा अश्व ७७ मध्ये उधळेल असे कोणाला वाटले नव्हते. हे विलक्षण घडले. संजय गांधी हे नव्हेत तर, इथली ' जनता 'च Wisest Wizard of the World आहे हे सिद्ध झाले. नाशिक, मालेगाव, धुळे, डहाणू या मतदारसंघांतून महिना-दीड महिना हिंडून लोकमत आणि लोकमन छोट्या छोट्या गोष्टींतूनही कसे एकदम बदलले ते पाहायला मिळाले.

अगदी दोन-अडीच वर्षांपूर्वी नगरपालिकांच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीच्या प्रचारासाठी ज्या भिंती रंगविल्या होत्या त्यांच्या ' घोषणां 'वर गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकींचा छाप होता. उदाहरणार्थ ' थांब लक्ष्मी कुंकू लावते–अमक्या तमक्याला निवडून देते ' किंवा ' दीपक दीपक चोहिकडे × × × हे चालले पालिकेकडे ' अशा त्या घोषणा. यावेळेस मात्र ' घोषणा 'त बदल जाणवत होता. डहाणू मतदारसंघात ' आता खुशाल मारा बोंब–निवडून येणार लहानु कोम ' दिसले तर, युवक काँग्रेसचा बालेकिल्ला समजल्या गेलेल्या सटाणा-कळवणमध्ये ' इंदिरा तुने क्या किया ? हजार वासरं न् एकच गाय ' झळकत होते. ही ' जाण ' महत्त्वाची नाही काय ?

जिंदाबाद–मुर्दाबादच्या जागीही नवे शोधले गेले होते. आपल्या मतदारसंघातून जे निवडून आले त्यांचा वैयक्तिक गजर सहसा कमीच आढळत होता. मला वाटते ही कोणा व्यक्तीची निवड नाही तर, लोकशाही की हुकूमशाही यांचा प्राणांतिक झगडाच होता. आणि म्हणूनच रात्री तीन वाजता नाशिक शहरात निघालेल्या मिरवणुकीत जनता पक्षाचे यशस्वी उमेदवार हांडे व महाले यांचे वैयक्तिक जिंदाबाद ऐकू आले नाहीत. जमाव ' हरीभाऊ गोखले–घरी जाऊन झोपले ' म्हणून घटनेच्या आणखी विच्छेदनातून सुटल्याचा आनंद व्यक्त करीत होता तर, काँग्रेस पक्षानें पैशाची खैरात करूनही लोक फिरले नाहीत हे (मतपेटीतून सांगितले गेलेच होते !) सांगण्यासाठी ' पैसे वाटून केलं काय ? खाली डोकं वरती पाय ' ही घोषणा चपखल होती.

माजी मंत्री झकेरिया यांनी मृणाल गोरे यांचे तुरुंगात हाल झालेले नाहीत तर, त्यांचे गाल लाल झालेत या उद्गारावर सर्वत्र तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात होती. दुर्गा भागवतांपासून शालिनीबाई पाटील यांच्यापर्यंत या विधानाची संतापाने दखल घेतली गेली व तसे असेल तर, झकेरियांनी आपल्या पत्नीलाही हवाबदल म्हणून ' तिकडे ' पाठवावे असे जनमनाच्या कानोशातून सांगितले जात होते. याची दखल एका वक्त्याने भाषणातून घेतली. (व उपस्थितांची दादही !!) झकेरियांचे विधान सांगून हा वक्ता म्हणाला, ' तुरुंगात जाऊन मृणालताईंचे गाल ' लाल ' झालेत की नाही हे मला माहीत नाही, पण त्यांनी गोरेगाव मतदारसंघात फॉर्म भरताच काँग्रेसवाल्यांची ' पिवळी ' झाल्याचे मात्र मी पाहिले आहे.'

खेडलेझुंगे हे नाशिक जिल्ह्यातले एक संत-क्षेत्र म्हणून समजले जाते. काँग्रेस असो वा विरोधी पक्ष असो अनेकांच्या निवडणूक प्रचाराचा नारळ तिथं फोडला जातो. काँग्रेसचे उमेदवार श्री. बाबुराव ठाकरे, यांच्याही प्रचाराचा नारळ तिथं घाईघाईनं फोडला गेला. त्याची बातमी आली म्हणून सगळ्यांना कळलं. मी व ज्यांच्या हस्ते हा नारळ फोडला ते श्री. माधवराव बोरस्ते जेव्हा दुसऱ्या दिवशी भेटलो तेव्हा चर्चेच्या ओघात विचारलं की, ' खेडल्याझुंग्याला नारळ फोडण्यात तुम्ही काय साधलं ?' तर तीर्थक्षेत्र व चांगली तिथी होती न् सगळ्यांना कळवायला वेळही नव्हता म्हणून घाई केल्याचे ते म्हणाले. मी म्हटलं की, खेडल्याझुंग्याचा अनुभव चांगला नाही तेव्हा तुम्हालाही ' तेच ' हवे का ?'

' म्हणजे कसं ?'

' अहो काकासाहेब वाघांनीही परिषदेसाठी तिथंच नारळ फोडला–ते पडले, सावळचांनी फोडला–तेही पडले, गेल्या विधानसभा निवडणुकीत विनायकराव पाटलांनीही तिथंच नारळ फोडला तेही पडले. असा हा अनुभव असताना काँग्रेसच्या ठाकऱ्यांचे आता काय होणार ?'

त्यांनीच नारळ फोडल्याने ही ' गंमत ' ऐकूनही बोरस्ते गंभीर झाले न् हळूच म्हणाले, ' अहो, ६२ साली मी विधानसभेला उभा होतो, तेव्हा माझाही नारळ तिथंच फुटला होता न् मीही पडलो होतो. ' आमची ही चर्चा जनता पक्षाचे एक प्रमुख वक्ते भवरीलाल मोदी यांनी ऐकली. त्यात आणखी ' पाणी ' टाकून हा मुद्दा ते खुलवीत व दाद मिळवीत.

' मंडळी, या काँग्रेसवाल्यांचाच त्यांच्या उमेदवाराला विरोध आहे. त्यामुळे आपले यश नक्कीच. कसं ते पहा. परवाच निफाड साखर कारखान्याचे चेअरमन माधवराव बोरस्ते यांच्या हस्ते ठाकऱ्यांचा नारळ खेडल्याझुंग्याला फोडण्यात आला. या खेडल्याझुंग्याची कथा ऐका. १९६० साली काकासाहेब वाघ जिल्हा परिषदेसाठी उभे होते. त्यांचा नारळ तेथे फुटला न् ते–'

' पडले !' लोकांचा उत्स्फूर्त आवाज.

' त्याच्यानंतर पंचायत समित्यांसाठी सावळचांनीही तिथंच नारळ फोडला न् तेही–'

' पडले !' जनतेचा आवाज वाढतो.

' १९६२ मध्ये माधवराव बोरस्ते विधानसभेसाठी उभे होते. त्यांनीही आपला नारळ तिथंच फोडला. पण तेदेखील–'

' पडले !' जनता टाळ्यांसह जोरात.

' १९७२ मध्ये विधानसभेसाठी काँग्रेसचे उमेदवार विनायकराव पाटील यांनीदेखील

आपल्या प्रचाराचा नारळ तिथंच फोडला. विनायकरावही–'

'पडले!'

'आता बाबूराव ठाकऱ्यांचा नारळही तिथंच फोडलाय. बाबूरावसुद्धा–'

'पडणार!!' आणि घडले प्रत्यक्षात तसेच.

'मिसा'चा कायदा हा इंदिरा गांधींचे आजचे स्थान कायम ठेवून संजयसाठी वारसाहक्काने जागा निर्माण करण्याची युक्ती होती, असे स्पष्ट करताना अनेकदा या कायद्याचा लॉंगफॉर्म Maintenance of Indira and Sanjay Act सांगून हशा वसूल केला जाई.

श्री. बुखारी यांच्या भाषणाला भिवंडी ते धुळे थाप गर्दी असे. त्यांचे भाषण मुस्लीम मोहल्ल्यात जेवढे दाद घेऊन जात असे तेवढीच हिंदू वस्तीतही. त्यांतले काही (गंमतीचे) मुद्दे–(मूळ भाषण अप्रतीम उर्दूत वा हिंदीत होई.) कॉंग्रेसच्या निवडणूक चिन्हाकडे बोट दाखवून बुखारी म्हणत–

'ते पाहा गायवासरू. विशेषतः वासराची पोझिशन. कुठलीही सभ्य माता आणि तिच्या पोटी जन्म घेतलेला बछडा वर्ष दोन वर्षच अंगावर पितो, आई पाजते. पण हे वासरू इतकं पिपासू आहे की, १९७१ साली ते जे प्यायला लागलं त्याला सहा वर्षं होऊन गेली तरी अजून पितंच आहे. अशी राक्षसी भूक असलेलं बाळ आपल्याला नको.'

'आत्तापर्यंत आम्ही जनावरांना मतं दिली (आधी बैलजोडी–नंतर गायवासरू) आणि आमच्या माथी जनावरांसारखं जीवन जगण्याची पाळी आली. यावेळेस मात्र आम्ही माणसाला (नांगरधारी) मतं देऊन माणसासारखं जीवन जगण्याचा निर्धार करणार आहोत.'

जनता पक्षाच्या ध्वजाची टिंगल आणि मुस्लीम समाजाचा बुद्धिभेद करण्यासाठी कॉंग्रेसवाल्यांकडून नेहमीच सांगितले जाई की, "दोनतृतीयांश जागा केशरी म्हणजे जनसंघाने व्यापली आणि एकतृतीयांश जागा तुमची मते मिळविण्यासाठी म्हणून हिरवा रंग घेतला. जनता पक्षाला म्हणजेच मुस्लीमद्वेष्ट्या जनसंघाला तुम्ही मते देणार काय?'

या विधानाचा परामर्ष घेताना बुखारी सांगत, 'लेकीन ये एक सफेद झूट है... जनता पक्षाच्या ध्वजाचा दोनतृतीयांश भाग केशरी रंगाने व्याप्त असला तरी, हिंदुस्तानात हिंदूंची संख्याच प्रचंड असल्याने त्यात गैर काय आहे? आपण जर एकतृतीयांश आहोत तर ध्वजावर आपल्याला आपली जागा मिळालेली आहे. याउलट हिंदू आणि मुस्लिमांना समान वागणुकीच्या थापांची खैरात करणारा कॉंग्रेसचा ध्वज पाहा. वर केशरी, खाली हिरवा आणि मध्ये या कॉंग्रेसी खादीवाल्याचा पांढरा हत्ती. हिंदू व मुस्लिमांना कधी याने एकत्र येऊच दिले नाही. जनता पक्षाचे तसे नाही. केशरी व हिरवा एकसंध आहेत. कॉंग्रेस आता फूट पाडू शकणार नाही.'

महाराष्ट्रात कॉंग्रेसचे तिकीट युवक कॉंग्रेसचे चंद्रशेखर राजूरकर यांना मराठवाड्यात मिळाले. (जनता पक्षाचे बापूसाहेब काळदाते यांच्या विरोधात) त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, राजूरकर हे माजी मुख्यमंत्र्यांचे (भावी) जावई. युवक कॉंग्रेसच्या पाच कलमी कार्यक्रमात हुंडा घेऊ नका–देऊ नका, असे एक कलम असल्याने शंकरराव चव्हाणांची पंचाईत झाली. म्हणून हुंड्याऐवजी त्यांनी राजूरकरांना 'तिकीट' दिले, हा 'जनता पार्टी'चा आणखी एक हशावसुली पॉइंट. पण त्याचबरोबर मराठवाड्यात राजूर'कर' / पालोद'कर' / म्हैसे'कर' / दुधगाव'कर' यांना तिकिटे का दिलीत? तर बाईंनी म्हणे शंकररावांना सांगितले. मला तुमच्या धारियांमुळे फार त्रास झाला. तेव्हा मला महाराष्ट्रातले 'डोके'बाज नकोत, 'हात' फक्त हवेत. (सांगेन तेव्हा वर होतील असे!) मग शंकरराव चव्हाणांनी डोके चालवले व 'कर' म्हणजे हात समजून ज्याच्या आडनावात 'कर' आहे अशांनाच तिकिटे दिली. मानवत प्रकरणात अडकले होते नाही तर, शंकररावांनी बाईंच्या आदेशान्वये बार'हाते'नाही तिकीट दिले असते.

लोकशाही हक्कांची पायमल्ली हे इंदिराजींच्या राजकारणाचे वैशिष्ट्य. हे किळसवाणे प्रकार वाढत चालले तेव्हा मी संसदेत त्यावर टीका केली, असे एका भाषणात सांगून मोहन धारिया म्हणाले, 'इंग्लंडमध्ये हाऊस ऑफ कॉमन्ससमोर वॉल्टेअरचं एक सुप्रसिद्ध सुभाषित लावलेलं आहे. 'तुझ्या मतांविषयी मला आत्यंतिक घृणा आहे. परंतु तुझं मत व्यक्त करण्याचे तुला स्वातंत्र्य आहे. हा तुझा अधिकार अबाधित राखण्यासाठी मी प्राणपणाने झगडेन.' समोरच्या बाकावर इंदिराजी गांधी बसल्या होत्या. त्यांच्याकडे पाहून मी म्हणालो, मी बाईंना विनंती करतो की, त्यांनी संसदेसमोर फलक लावावा–' मला तुमच्या मतांविषयी आत्यंतिक घृणा आहे. आणि म्हणून तुमचा मत व्यक्त करण्याचा अधिकार नामशेष करण्यासाठी मी प्राणपणाने झगडेन.' खाली लिहा–इंदिरा गांधी.'

□


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

। मॅक्झिम गॉर्की ।

। सुमती देवस्थळे ।

मूल्य वहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ । पुणे ४११ ०३०

कथा

# ल्हानसं जग

सौ. उज्ज्वला पिंपळखरे

मोनिलाच्या रोक्सा बुलेवा (Roxas Boulevard) या सुंदर समुद्रकिनाऱ्यावरच्या फिलीपिना हॉटेलचे नोव्हेंबर, डिसेंबरचे दिवस म्हणजे प्रवाशांचा सीझन. 'फिलीपिना हॉटेल 'ला 'पर्ल ऑफ ओरिएन्ट हॉटेल्स' असं नाव मिळालं होतं. ते तिथं मिळणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण सेवेबद्दल. वेगवेगळ्या देशाहून आलेले प्रवासी मोनिलातल्या इतर मेट्रो, मर्लीन, हिल्टन हॉटेलकडे न जाता फिलीपिना हॉटेलात राहणं पसंत करीत. इथं येणाऱ्या प्रवाशांच्या नाना तऱ्हा होत्या. कित्येक प्रवासी कंपन्यांतर्फे प्रवासाला निघालेली मंडळी, 'लायन्स इंटरनॅशनल'चे प्रतिनिधी, वयस्क अमेरिकन जोडपी, कॉलेज विद्यार्थी, हौशी कुटुंबं असे कित्येकजण होते. आपापलं सामान, बॅगा घेऊन ते आत शिरत तेव्हा काऊंटरजवळची चिनी मुलगी मोगऱ्याच्या पाचसहा फुलांचा सुंदर गजरा त्यांना देऊन मनापासून त्यांचं स्वागत करायची. ही मंडळी हॉटेलात आरामात आहेत ना याकडे इथल्या लहान मोठ्या सर्व नोकरवर्गाचं बारीक लक्ष असायचं. हे प्रवासी आपला मुक्काम संपल्यावर सामानासह इथून निघत तेव्हा त्यांच्यापैकी प्रत्येकाला एकेक छोटा हातरुमाल देण्यात यायचा. त्यावरची चारसहाच छापील वाक्यं—

तुम्ही आमच्याकडे रहायला आलात, फार फार बरं वाटलं,

तुमच्यासाठी आम्ही काही करू शकलो याचा आम्हाला अतिशय आनंद वाटतो.

आता मॅनिलाला परत आलात ना, की आमच्याकडे यायला विसरू नका.

तुमच्या येण्याकडे आम्ही वाट पाहत आहोत.

तुमचा प्रवास अतिशय सुखाचा होवो.

मॅनिला इथं मी पहिल्यांदाच आलेली. फिलीपिना हॉटेलाच्या नवव्या मजल्यावरच्या रूम नंबर ९०१ मध्येही राहण्याचा मला नवा अनुभव होता. इथल्या प्रत्येक वस्तूचे, व्यक्तीचे अवलोकन करण्यात माझी करमणूक व्हायची. प्रवाशांच्या नाना तऱ्हा बघण्यात माझा वेळ जायचा. इतक्या मोठ्या प्रवासी समुदायात मी एकटी भारतीय आहे, असं मला सुरुवातीच्या एकदोन दिवसात वाटलं होतं. पण दुसऱ्या दिवशी संध्याकाळी तिथं आणखी एक भारतीय प्रवासी आलेला आहे, हे मी चटकन ओळखलं. बहुतकरून तो केरळीय असावा. आमच्या तिसऱ्या दिवशीच्या मुक्कामात आमच्या टुअरचे आम्ही सारे सकाळी नऊ वाजता बसनं बाहेर पडलो. इथून शंभर सव्वाशे मैलांवर असलेल्या पागसनजाँ या निसर्गरम्य धबधब्याला भेट दिली. धबधब्याच्या प्रवाहात छोट्या होडीत, बसून एकदीड मैल जा—ये केली, पागसनजाँ रॅपिडस हॉटेल या तिथल्या किनाऱ्यावरच्या हॉटेलात चवदार जेवण घेऊन आराम केला. काहींनी धबधब्याच्या पाण्यात पोहण्याचा आनंद लुटला. हे सर्व करून फिलीपिना हॉटेलात आम्ही परतलो तेव्हा संध्याकाळचे साडेसहा वाजले होते.

हॉटेलात शिरल्यावर लक्षात आलं, कुठलीतरी प्रवासी कंपनी नुकतीच लाऊंजवर आलेली होती. काऊंटरपाशी गर्दी नव्हती. तिथल्या स्वागतिकेला सांगितल्यावर तिनं माझी ९०१ नंबरची किल्ली देत असतानाच माझ्या शेजारून 'रूम नंबर सिक्स हंड्रेड वन' असे किंचित दक्षिण हिंदुस्थानी थाटाचे उच्चार कानी आले. मी त्या प्रवाशाकडे आणि त्यानं माझ्याकडे पहायला एकच गाठ पडली.

'हॅलो, तुम्ही इंडियातून आलात का इथं!' त्यानं मला विचारल्यावर मी सांगितलं, 'हो हो, मी इथं जाल' कंपनीच्या टुअरबरोबर आले आहे. दोन दिवसापूर्वी आमची टुअर इथं आली आणि आता आम्ही परवा इथून 'तायपे'ला जाणार. तुम्ही!'

त्यांनी खिशातून आपलं व्हिजिटींग कार्ड काढून मला दिलं. त्यावर टी रामन्—डेप्युटी गव्हर्नर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया असं लिहिलं होतं. मोहोरेदार अक्षरावरून मी झटकन् नजर फिरवली. 'ग्लॅड टू मीट यू.' मी म्हणाले. माणूस चेहऱ्यावरून अतिशय आनंदी, हसतमुख वाटला. पन्नाशीच्या पुढला असावा. वाढत्या वयाच्या खुणा चेहऱ्यावर दिसून येत होत्या पण आनंदी स्वभाव या सर्वांवर आपला प्रभाव पाडीत होता.

टी. रामन् सांगत होते, 'एशिअन बँकर्स या आमच्या संघटनेतर्फे 'मॅनिला'ला कॉन्फरन्स आहे. इंडियाचा प्रतिनिधी या नात्यानं मी आमंत्रित पाहुणा आहे. आपली ६०१ नंबरची किल्ली पारखून त्यांनी उचलली. काऊंटरवरच्या चिनी स्वागतिकेला त्यांनी 'थँक यू हेंगलान' असं म्हटलं. लिफ्टकडे जाण्यासाठी आम्ही वळलो असताना त्यांनी मला विचारलं,' तुम्ही मॅनिलाला पहिल्यांदाच येत असाल ना!'

मी मानेनेच 'हो' म्हटलं, 'तुम्ही?' त्यांनाच विचारलं,

'मी इथं बऱ्याच वेळा आलोय. मला तर फिलीपिना, हॉटेल फार आवडतं. अगदी घरच्यासारखं वाटतं. इथल्या स्टाफपैकी सर्वांना मी ओळखतो.

तेवढ्यात लिफ्ट समोर येऊन उभं राहिल्यावर आमच्या पुढच्या चार पाच इसमांनी आत प्रवेश केला, फक्त आणखी एकालाच आत जाण्याजोगं राहिलं होतं. 'तुम्ही गेलात तरी चालेल,' मी टी. रामननना म्हणाले.' तुम्ही लिफ्टमध्ये गेलात तरी चालेल.' खरं म्हणजे मला त्या गर्दीच्यावेळी लिफ्टमधनं जावसंच वाटलं नाही.

'थँक यू...बरंय, उद्या आपण जरूर भेटू.' असं म्हणून ते लिफ्टमध्ये शिरले... आणि वर गेले.

'उद्या आपण भेटू' असं ते म्हणाले होते, त्यात औपचारिकपणा अधिक होता. खरं म्हणजे दिवसभराच्या फिरण्यानं मी दमले होते. शिवाय प्रवासात मी तशी एकटीच

होते. प्रवासात अनोळखी माणसांशी फारसं बोलू नकोस असं मुंबईत मला सर्वांनी सांगितलं होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी रोजच्याप्रमाणे सहा वाजता मी उठले. स्नान, कपडे करून मी सात वाजता तयार झाले, आणि तळमजल्यावरच्या डायनिंग हॉलमध्ये चहा-नास्ता घेण्यासाठी आले. सकाळी तोंड धुणं झालं की, मला चहा लागतो. इथं तशी 'बेड-टी'ची पद्धत नव्हती. चहाबरोबर इथं नास्तापण तयार असे. आमच्या टुअरची बाकीची मंडळी साडेसात वाजता तयार होऊन येत. पण मी त्यांच्याआधीच डायनिंग हॉलमध्ये येऊन बसायची. इथली मध्य भागातली लांबलचक डायनिंग टेबलं सोडून कोपऱ्यातल्या छोट्या डायनिंग टेबलांपैकी मी खिडकीजवळचं टेबल पसंत करी. इथं बसल्यावर चहा पिताना समोरच्या सिंगापुरी नारळांच्या रेखीव महिरपीतून पलिकडचा समुद्र छान दिसायचा. आज माझं नेहमीप्रमाणं चहापान चालू असतानाच, 'हॅलो,

गुड मॉर्निंग...', 'या इथं मी बसू? कोणी येणार आहे का इथं?' टी. रामननी आपली ऑफिस बॅग खुर्चीशेजारी ठेऊन ते मलाच विचारून माझ्या टेबलासमोरच्या खुर्चीत बसले.

'वा-वा, जरूर बसा ना' मी म्हणाले. नंतर लक्षात आलं, 'गुड मॉर्निंग' म्हणायचं राहून गेलं.

'जॉनी' त्यांनी चुटकी वाजवून तिथल्या एका वेटरला बोलावून सांगितलं 'आज मला टोस्ट नकोय हं कॉनफ्लेक्स आणि हॅम मांडून ठेव. आज फ्रेंच फ्राईज नाही वाटतं?

नो-सर...आपल्याला हवं तसं हॅम आणून देतो हं. बरोबर ब्लॅक कॉफीपण आणतो. 'जॉनीनं हलक्या आवाजात बोलून ते सारं अतिशय आदबीनं आमच्या टेबलावर मांडलं; जणू काही जॉनी ते सारं देवालाच अर्पण करतोय. जॉनी आणि बाकीचे वेटर आमच्यापासून दहा पावलांवर दूर उभे असायचे पण त्यांचं सारं लक्ष आमच्या समोरच्या बशा, खाद्यपदार्थ, चहा, कॉफी याकडे असायचं.

'आज तुमचा काय कार्यक्रम आहे?' त्यांनी मला विचारलं.

'आज आम्ही गावातली चायना टाऊन, रिझाल पार्क चर्चमधलं बाम्बू ऑर्गन (वाद्य), पहाणार.' मी छापील माहितीपत्रक आठवून सांगायचा प्रयत्न केला.

'अर्रर...आज स्तोत्र म्हटलं नाही,' त्यांना अचानक आठवण झाली. नाश्ता संपवून त्यांनी आपल्या भाषेतलं काही स्तोत्र मनाशी म्हटल्यासारखं करून ते ऑफिस बॅग घेऊन बाहेर पडले. पण तेवढ्यात मला 'हॅव अ गुड डे' आणि समोरच्या वेटरला 'थँक यु जॉनी' म्हणायला विसरले नाहीत.

त्यानंतरच्या दोन दिवसात आमची दोघांची तीनचार वेळा तरी गाठ पडली होती. माणूस मोठा आनंदी, सदा प्रसन्न असे. स्वतःविषयी, घराविषयी जवळजवळ काहीच बोलत नसे. फिलीपिना हॉटेल त्याला घरासारखंच वाटत असावं; कितीतरी गमतीदार माहिती ते गप्पांच्या ओघात सांगायचे. या इथल्या वेटरपैकी कुठला वेटर कामचुकार आहे, कुठला वेटर तुमच्या आवडी लक्षात ठेऊन सर्व्ह करून तुमची पसंती विचारून त्याप्रमाणे गाण्याची रेकॉर्ड तुम्हाला ऐकवतो येथपासून चौथ्या मजल्यावरच्या स्विमिंग पूलचा कोच (Coach) किंम कधी स्विमिंग पूल सोडून कुठे न जाताही तुम्हाला मॅनिलातल्या कॅसिनोतली बित्तबातमी सांगतो. इथपर्यंत टी. रामननी मला माहितीचा खजिनाच सांगितला.

मला वाटतं आमच्या जायच्या आदले दिवशी संध्याकाळी मी जेवणाऐवजी कॉफी, सॅन्डविच असं घेत तळमजल्यावरच्या 'कॉफी शॉप'मध्ये बसले असताना, अचानकपणे टी. रामन पण तिथं आले. तेही बहुतकरून कॉफी अन् टोस्ट घ्यायला आले असावेत. ते सांगत होते, 'हे कॉफी शॉपसुद्धा आपल्याच फिलीपिनाचं आहे. या इथले वेटर आहेत ना, ते चिनी, थायी, इंडोनेशियाचे आहेत. फक्त एकचजण मलेशियाचा आहे. या खेपेला तो मला इथं दिसला नाही. स्मरणशक्ती बघा इतकी तीव्र की, आपल्या फिलीपिनातला कोणता प्रवासी कोणत्या खोलीत रहायला आला आहे हे तो बघता बघता अचूक लक्षात ठेवायचा. आपल्या हॉटेल मॅनेजरनं त्याला इथून उचलून पलीकडच्या डायनिंग हॉल'मध्ये कामावर ठेवलं होतं. मेमरीवर थक्क व्हायचा. मॅनेजर त्याला म्हणायचा, 'ली खरं म्हणजे तुझी योग्यता माझ्या खुर्चीवर बसायची आहे पण थोडक्यानं चुकलं रे.'

टी. रामन हे सांगत असतानाच वीस पंचवीस प्रवाशाचं एक टोळकं आमच्या तिथं आलं. बघता बघता भोवतालच्या खुर्च्या-टेबलं भरून गेली. सर्वजणं गावातच हिंडून आली असावी, कॉफी शॉपच्या मंद लालसर प्रकाशात सर्वांचे चेहेरे प्रसन्न, हसरे वाटत होते. त्यांच्यावर देखरेख ठेवणारा त्यांचा गाईड हातातल्या कागदावरच्या नावाप्रमाणं त्या सर्वांची मोजणी करीत हिंडत होता. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था केल्यावर त्याचं लक्ष टी. रामनकडे गेलं.

टी. रामननं त्याला हाक मारून बोलाविलं. 'हॅलो मि. नॅशिओ — कसं काय ठीक ना!'

मि. नॅशिओचं लक्ष बोलण्याच्या मनःस्थितीत फारसं नव्हतं तरी औपचारिकपणे 'गुड इव्हिनिंग' केलं. 'नॅशिओ-बैस इथंच. काय घेशील कॉफी?' टी. रामननी त्याला आग्रहाने आमच्या पलिकडच्या खुर्चीवर बसविलं...माझ्याशी ओळख करून दिली. 'या मिसेस पिंपळखरे. 'जाल'बरोबर इथं टुएरवर आल्यात उद्या 'तापेय'ला जाणार.'

तरी त्यानं फारसं काही बोलणं केलं नव्हतं. त्याचं वय पन्नाशीपुढलं वाटलं तरी त्या मानानं तो बराच वयस्कर वाटला. टी. रामनलाही रहावलं नाही. ते म्हणाले, 'नॅशिओ, तू काय आजारी होतास का? खूप बदलला आहेस पूर्वीपेक्षा.'

'ती एक कहाणीच आहे.' नॅशिओ म्हणाला.

'अस्सं होय? काय झालं? सांग तरी असं कर. आधी गरम गरम कॉफी घे — हं आता सांग तुझी अडचण.'

'आपल्याला तर माहितीच आहे. मी फिलीपिन हॉटेलात मास (MAS) या कंपनीचा टुअर-गाइड या नात्याने गेली पंचवीस तीस वर्षं नोकरी करतोय, मला चार मुली आहेत. त्यातली थोरली चोवीस वर्षांची आणि धाकटी सतरा वर्षांची आहे. माझ्या मुली फार गोड स्वभावाच्या, कामसू आहेत. माझी बायको रोझा इथल्याच मुलीच्या शाळेत म्युझिकची टीचर आहे. म्हणजे होती. घरातही ती खूप काम करायची. बागकाम करायची. मुलीसाठी कपडे शिवायची — तिनं घरालाही छान शिस्त लावून दिली होती. असं आमचं छोटं

पण सुखी कुटुंब होतं.'

'अरे पण सारं भूतकाळात का जमा करतोस!'

'सांगतो! दहा महिन्यांपूर्वी मास टुअरची एक बॅच इथं आली. त्यांच्यात एक भारतीय ज्योतिषी होता. फेस रिडींग हस्तरेषा अगदी अचूक सांगायचा. त्याच्याबरोबरच्या सहप्रवाशांत तो खूपच लोकप्रिय झाला. मी कधी त्याला माझा हात दाखवला नाही की प्रश्न विचारले नाहीत. एकतर माझा ज्योतिषावर अजिबात विश्वास नाही. हजारो मैल दूरवरचे चंद्र, सूर्य, गुरू, शुक्र आपल्या हालचालींवर, कृतीवर ताबा ठेवतात हे मात्र पटतच नाही. एक गमतीदार अनुभव सांगतो! माझे वडील ज्या नारळीच्या फार्मवर मॅनेजर म्हणून नोकरीला होते त्या बागाइतदाराची बायको आणि माझी आई एकाच हॉस्पिटलात, एकाच दिवशी अन् एकाच वेळेला बाळंतीण झाल्या. दोघींनाही मुलगे झाले. हॉस्पिटलच्या रेकॉर्डमध्येही या दोन्ही मुलांच्या जन्मतारखा, जन्मवेळा एकच आहेत. बागाईतदाराचा मुलगा इथं शिक्षणमंत्री झाला आहे, आणि त्याच्याएवढा माझा भाऊ मात्र शाळामास्तर झाला आहे. याला उत्तर काहीच नाही.

'मी जरी त्या ज्योतिषी—प्रवाशाला टाळलं तरी, त्यानं मात्र एक दिवस एका बाजूला नेऊन सांगितलं—'

'काय सांगितलं?'

'तुझ्या घरावर कठीण प्रसंग येणार आहे. सावधगिरी बाळग. जपून रहा' आता सावधगिरी म्हणजे काय? मी मुलींना सांगितलं. रस्ता ओलांडताना नीट पहात जा. दारावरची आपली घंटा कोणी वाजवली तरी सरळ दरवाजा उघडू नका. पीपहोलमधनं पहात जा. माझ्या मुली आता लहान का आहेत? मी असं सांगितलं की त्या हसायच्या तेव्हा त्यानं सांगितलेलं भाकित तर मी घरात कोणालाच सांगितलं नाही. पण मुलींनी माझ्या पैशाच्या पाकिटातला त्यानं दिलेला तो देवाचा छोटा—फोटो मुलींनी पाहिलाच.' डॅडी हे काय? त्यांनी मला विचारलं.

'हा ना, इंडियन देव आहे. मी सांगितलं तरी त्यांचं समाधान झालं नाही. पण हा देव कसा? तोंड हत्तीचं आणि शरीर माणसाचं हे गणपतीचं रूप पाहून त्यांना खूप मजा वाटली.'

'दोन महिन्यापूर्वी काय झालं, रोझाच्या शाळेची ट्रीप पागसनजाँ धबधब्याला जाऊन आली. खरं पाहिलं तर पागसनजाँ इथं काही धोका आहे का? मी तर तिथं इतक्या वेळेला गेलोय की, पाण्याच्या प्रवाहातला प्रत्येक दगड न् दगड मला माहीत आहे. होड्या वल्हवणारे सारे वल्हेकरी माझ्या ओळखीचे आहेत.'

नेशिओ हे सांगत असतानाच मला आमचा दोन दिवसापूर्वीचा दिवस आठवला. दोनच दिवसापूर्वी मी आमच्या टुअरबरोबर 'पागसनजाँ'ला जाऊन आले होते. वीस, पंचवीस फूट रुंदीच्या नदीच्या पात्रातून जवळजवळ पाऊण मैल होडीतून जाण्याचा रोमहर्षक अनुभव मीही घेतला होता. दोन्ही तीरालगत डोंगराळ उंचसखल हिरवीगार झाडी आणि झाडावरची माकडांची कसरत, त्यांच्या गमतीदार हालचाली मीही पाहिल्या होत्या. पाऊण मैलाचा हा मार्ग सरळ आहे. त्यानंतर जिथं डोंगरावरून धबधब्याचं पाणी उभं कोसळतं त्या डोंगराखालून होडी जेव्हा आपल्याला हिंडवून आणते तेव्हा खरी गंमत. कोसळणाऱ्या पाण्याच्या तुषाराखालून होडी हेलकावे खात अर्धा मैल चक्कर मारून आणते तेव्हा भीती आणि मजा यांचं एक चमत्कारिक मिश्रण माझ्या मनावर तरंगलं होतं. मी तरी परवाचा तो विलक्षण अनुभव कधी विसरणार नव्हते.

हे सारं आठवल्यामुळेच मी नेशिओचं बोलणं उत्सुकतेनं ऐकत होते.

मध्येच त्यानं बोलणं थांबवून सिगरेट पेटवून झुरका घेतला. मनाशी काही जुळवित तो कसबसं बोलू लागला...दोन महिन्यापूर्वी याच जागी रोझा आणि तिच्या शाळेच्या मुली आल्या. रोझाच्या होडीत दोन मुली होत्या. पण तिघींचं वजन जास्त होऊ लागलं त्याबरोबर त्यातली एक मुलगी उतरली. होडीच्या दोन टोकांना दोन वल्हेकरी वल्ही मारीत होडी नेत होते. मध्ये रोझा आणि एक मुलगी अशा बसल्या होत्या. उगमापर्यंत त्यांची होडी गेली. आणि पावसाला सुरवात झाली. वल्हेकरी म्हणत होते इथूनच परतूया आपण. पण रोझा आणि ती मुलगी हटेना. जरा पुढे तर चल असं म्हणत ती सर्व कोसळणाऱ्या पाण्याच्या धारेपाशी आलीत. त्यांची होडी जी उलटली आणि संपले!...रोझा आणि तिच्याबरोबरची मुलगी जेव्हा हाताशी लागल्या तेव्हा सारं संपलं होतं. वल्हेकरी मात्र बेशुद्धावस्थेत सापडले. कुणी म्हणतात तिथं भोवऱ्यात होडी सापडली. काय व्हायचं होतं ते झालं खरं!'

'दिसायला एक साधा प्रसंग पण माझं घर पार विस्कटलं! पण मुली शहाण्या आहेत. घर चांगलं चालवतात. थोरलीचे लग्न ठरलेलं आहेच. वरच्या दोघी नोकऱ्या करतात. घर पूर्वी होतं तसंच व्यवस्थित ठेवलंय. माझ्या हाताखालून टुअर गेली की तिच्यासाठी रोझा नारळाची सुंदर टॉफी करून द्यायची. आता मुली देतात. घराकडे पाहिलं की, रोझा घरात नाही हे कळतसुद्धा नाही. मला मात्र वाटत राहतं...नेहमी वाटत राहतं. माझी रोझा कायमची दूर गेली ते अचानक अपघातामुळं की त्या इंडियन ज्योतिष्यानं सांगितलेल्या भाकितावरून?

नेशिओचा आवाज गहिवरून आला होता. डोळे भरून आले होते. त्याला थोपटतांना टी. रामननासुद्धा शोकावेगानं बोलवेना.

दुसऱ्या क्षणी नेशिओ तेथून उठून 'मी जरा आलो हे उद्याच्या कार्यक्रमाबद्दल साऱ्यांना सांगायचं आहे.' असं म्हणून तो उठून दुसऱ्या बाजूला गेला.

'आम्ही आता उद्या इथनं 'तायेपला जाण्यासाठी निघणार. तुम्ही इंडियाला कधी जाणार.' मी टी. रामनना विचारलं.

'मी दोनचार दिवसांनी जपानला जाणार. तिथून आणखी वर—'

'म्हणजे मीच इंडियात प्रथम पोहोचेन. तुमच्या घरी किंवा कुटुंबाला काही निरोप कळवायचा का? तुमचा फोन नंबर द्या. मी फोन करून तुमच्या घरी कळवीन.' मी डायरी व पेन पर्समधनं काढलं.'

'नको नको, तशी काही गरज नाही,' ते घाईघाईनं म्हणाले,

मी नवलाईनं त्यांच्याकडे पहात राहिले. ते उदास चेहेऱ्यानं जड आवाजात म्हणाले, 'माझ्या बायकोची तब्येत बरी नसते. शॉक ट्रीटमेंटसाठी ती येरवड्याला हॉस्पिटलमध्ये असते.'

दोनचार क्षणच! लगेच पूर्वीच्या सफाईदारपणाने हसून ते म्हणाले, 'एनी वे तुमचा पत्ता आहेच माझ्याकडे. मी तुम्हाला मुंबईत जरूर भेटेन. मनिलाला आपण भेटतो तर मुंबईत जरूर भेटू. द वर्ल्ड इज टू स्मॉल'

आता मात्र त्यांच्या हसण्यात नेहेमीचा दिलखुलासपणा होता. □

पुस्तके

एका पत्रकार–साहित्यिकाचे धीट आत्मचरित्र

# यशवंत बाळाजी शास्त्री

म. श्री. दीक्षित

गेल्या दहा–पंधरा वर्षांपासून मराठीत आत्मचरित्रात्मक वाङमयाला उधाण आलेलं आहे. कादंबरीच्या खालोखाल हाच वाङमयप्रकार उत्सुकतेनं वाचला जातोय. नजरेत भरणारी आणखी एक गोष्ट अशी की, जीवनाच्या विविध क्षेत्रांतील स्त्री-पुरुष व्यक्ती धीटपणे व मोकळेपणाने आपली आत्मचरित्रं लिहू लागली आहेत. कामजीवनातील अनुभव खुल्लंखुल्लेपणाने लिहिण्याची तर जणू स्पर्धाच लागलेली दिसते. वैवाहिक आणि विवाहबाह्य संबंधांची चविष्ट वर्णनं तपशीलाने देऊन कित्येकांनी आपली आत्मचरित्रं गाजवून सोडली आहेत.

नागपूरचे पत्रकार कै. य. बा. शास्त्री यांनासुद्धा हा मोह आवरता आला नाही. 'यशवंत बाळाजी शास्त्री' हे त्यांचं आत्मचरित्र यादृष्टीने गाजेल, यात शंका नाही. तथापी एवढंच काही या आत्मचरित्राचं आकर्षण नाही. जीवन, साहित्य, कला, पत्रसृष्टी इत्यादी विविध क्षेत्रांत संचार करणाऱ्या या हाडाच्या पत्रकार साहित्यिकाने सहवासात आलेल्या अनेक लहानथोर माणसांच्या आठवणी रसिल्या वृत्तीने टिपल्या असून त्या टिपता टिपता स्वतःच्या प्रेमजीवनाची उत्कट कहाणीही मोकळेपणाने सांगितली आहे.

कै. शास्त्री यांची आठवणीरूप कथा अतिशय प्रांजल, धीट, काही ठिकाणी काव्यात्म, तर काही ठिकाणी चावट, व्रात्य अशी आहे. कै. माडखोलकर यांच्या शब्दात ती 'बोल्ड आणि लालित्यपूर्ण' असल्याचा प्रत्यय येतो. दुर्दैव असं की, आपली आत्मकथा प्रकाशित झाल्याचं लेखकाला पाहता आलं नाही. जीवनाला आणि मृत्यूला हसत हसत सामोरे जाणारे य. बा. शास्त्री जीवनकथा लिहून होताच मृत्यू पावले. त्यांच्या माघारी श्रीमती शालिनीबाईंनी पतीची रसरशीत जीवनकथा अनेकांच्या मदतीने प्रकाशात आणली. या कथेतील काही भाग (विशेषतः शांताबाई कशाळकरांसंबंधीचा) राजस, ललित, मोहर, नागपूरचा तरुण भारत यांच्या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झाला होता आणि तो वाचून वाचकांची जिज्ञासा आधीच चाळवली गेली होती. आता या सर्व भागांसह य. बां. ची लिहून ठेवलेली आत्मकथा वाचकांप्रत पोचली आहे.

लहानमोठ्या चार भागांत प्रसिद्ध झालेली ही रम्य–उदास जीवनकहाणी व्यक्तीविषयी आठवणीरूप असली तरी, तिचं वैयक्तिक आणि सार्वजनिक असं दुहेरी रूप कहाणीत साकार झालेलं आढळतं. प्रभात, माध्यान्ह, सायंकाळ आणि उपसंहार अशा चार भागांतून ही कहाणी निर्झराप्रमाणे वाहत जाते आणि पूर्णविराम न देताच थांबते. निर्झराच्या नागमोडी गतीप्रमाणे या कहाणीत निसर्ग, मानव, काटेकुटे, भोवरे, खळखळ, उथळपणा, खोली, वेग, गतिरुद्धता, विरहमीलनाची आडवळणे इत्यादी साऱ्या गोष्टी आहेत. सेक्सविषयक स्वतःच्या व इतरांच्या चघळून सांगितलेल्या चमत्कारिक हकिकतीही अनेक आहेत. कहाणी वाचताना अधूनमधून कालानुक्रम सुटतो, काही ठिकाणी विस्कळीतपणा जाणवतो, तर काही हकिकतीत अतिशयोक्ती असल्याचीही शंका येते. पण हे सर्व दोष जमेस धरून प्रस्तुत आत्मचरित्रशैली आणि अनुभवसमृद्धी या दोन दृष्टींनी वाचनीय आहे एवढे खास.

कै. शास्त्री हे 'तरुण भारत'मध्ये २५–३० वर्षं कै. माडखोलकर यांचे सहकारी होते. पत्रसृष्टीत उभयतांचे नाते गुरुशिष्यांचे होते, याची साक्ष कहाणीतच आढळते. माडखोलकरांच्या वृत्तीतील प्रमत्तपणाही शास्त्रींच्या वृत्तीत पुरेपूर उतरल्याचे जाणवते. पण एवढ्याने लेखकाची पुरती ओळख होऊ शकत नाही. नागपूरला स्थिरावण्यापूर्वी कै. शास्त्री यांनी पुण्या–मुंबईत पत्रकार नि वार्ताहर म्हणून नेकीने उमेदवारी केली होती. या ठिकाणच्या वास्तव्यात बोलपट आणि रंगभूमी या क्षेत्रांशी त्यांचा संबंध आला होता. साहजिकच अनेक लेखक आणि कलावंत त्यांना जवळून पाहता आले. जाहिरातपटू आणि मुलाखतकार या नात्याने त्यांनी याच काळात नावलौकिक मिळवला. शिक्षण आणि व्यवसायाच्या निमित्ताने घडलेला दूरवरचा प्रवास ही मोठी शिदोरी शास्त्रींच्या पाठीशी होती. प्रवासात नाना प्रवृत्तींची जी माणसं भेटली त्यांच्याशी त्यांनी सख्यत्वाचं नातं जोडलं.

प्रवास आणि लहानथोर माणसांच्या सहवासाचं शास्त्रींना इतकं वेड की, सहवासातील हरएक लक्षणीय माणसाच्या आठवणी ते मोकळेपणाने सांगतात. आपल्या प्रेमाची, संसाराची, फार काय, स्खलनतेची कहाणीही त्यांनी सांगून टाकली आहे. तीही आडपडदा न ठेवता. मद्य–मदिराक्षींच्या दाहक अनुभवांसह. या कहाणीतील जनदृष्टीने सामान्य वाटणाऱ्या सामान्य जनांच्या उत्कट उदात्त आठवणी वाचून, सामान्य–असामान्यत्वाचे निकष तपासून घ्यावेत की काय असा वाचकांना प्रश्न पडेल. सामान्यातील असामान्य आणि असामान्यातील सामान्य यांचा शोध घेणारी शास्त्रींची दृष्टी आणि त्या दृष्टीतून साकारलेली अक्षरसृष्टी कौतुकास्पद म्हटली पाहिजे.

वृत्तपत्र, चित्रपट, रंगभूमी, साहित्य, प्रवास इत्यादी क्षेत्रात लेखकाला शेकडो व्यक्ती भेटल्या. या कहाणीत अशा ५०–६० व्यक्तींच्या वेधक आठवणी वाचायला मिळतात. आणि त्यांचा विशेष हा की, त्या लिहिता लिहिता लेखकाने त्या त्या व्यक्तीचे खास पैलू स्वतःची छिन्नी वापरून उजळून दाखविले आहेत. शांताबाई कशाळकर, वडीलबंधू शं. बा. शास्त्री, विश्राम बेडेकर, थापेबाज मामा वरेरकर, दिनानाथ, अत्रे,

पांडोबा भागवत, उपाध्ये–बोबडे हे वैदर्भीय कवी, माडखोलकर, 'सकाळ'चे परुळेकर, बाबासाहेब घोरपडे, 'केसरी'चे माडीवाले, विनोबा यांच्यासंबंधीच्या आठवणी हृद्य नि साभिप्राय आहेत. विनोबांविषयी अपार आदर बाळगणारे शास्त्री त्यांच्या भूदान चळवळीवर आणि सर्वोदयी उपक्रमाबद्दल परखड प्रतिक्रिया व्यक्त करतात. भाषिक राज्यकल्पनेविषयीचा आपला विरोध त्यांनी नोंदवून ठेवला आहे. भाषिक आणि प्रांतिक अभिनिवेश देशाचा घात करतील हे शास्त्रींनी ठामपणे सांगितले ते मात्र आत्मकथेत हे ध्यानी घेण्यासारखं आहे.

शांताबाई कशाळकर यांची मनस्वी, उदास, स्निग्ध अशी व्यक्तिरेखा वाचताना वाचकाचे डोळे पाणावून जातील. पत्रसृष्टीतले–येरवड्यातून सुभाष मुक्तता, नेहरूंवरील नागपुरातील हल्ला, नेहरूंची सचित्र स्टोरी, कन्नमवारांची न घेतलेली मुलाखत, पक्वासांचा ए. डी. सी. ने केलेला अपमान, मंत्र्याने देऊ केलेली लाच, रामप्रसादच्या फाशीचा–म्हणजे मृत्यूचा दारूण सोहळा–हे सारे नाट्यपूर्ण प्रसंग मुळातूनच वाचण्यासारखे आहेत. निःस्पृह, धाडशी, कल्पक वार्ताहर कसा असावा याचा आदर्शच या प्रसंगांद्वारे उभा राहातो. पत्रव्यवसायातील त्यांचे काही अनुभव मात्र पारखून घ्यावेत असे आहेत. उदाहरणार्थ 'सकाळ'मध्ये असताना आलेली एका न्यायाधीशाच्या मृत्युची वार्ता. 'न्यायाधीशांची बुद्धी तल्लख होती.' ऐवजी 'बु×' असा मुद्रराक्षसी प्रसाद घडणे, त्यामुळे न्यायाधीशबाईंनी कचेरीत येऊन आदळआपट करणे, फिर्यादीची धमकी देणे आणि बाबासाहेब घोरपड्यांसारख्या विवेकी संपादकाने 'बाई, मी क्षमा मागितलीच आहे. इतक्याउपर फिर्याद करायची असेल तर करा. जे छापून आले त्याचा अनुभव माझ्यापेक्षा तुम्हालाच असणार' असे इंग्रजीत उत्तर देणे–हा सारा प्रसंग आचार्य अत्रे यांच्या कचेरीत घडण्याची शक्यता आहे. 'सकाळ'मध्ये असंभाव्य वाटतो.

वनमाला, ज्योत्स्ना भोळे, लीला चिटणीस; स्नेहप्रभा प्रधान, नूरजहां यांच्या उडत्या आठवणी खूप काही सांगून जातात. स्त्रीविषयक आठवणींपैकी प्रिया इंदू आणि गुलाब–शालिनी या दोघी कायस्थ पत्नी यांच्याशी जडलेली नाती उलगडून दाखवताना लेखकातील कसबी कथाकार उत्कटपणे जागा होतो व तिघींसमवेतचं आपलं भावजीवन करुण कोमलतेने खुलं करतो. स्वतःवर स्त्रीकडून झालेल्या बलात्काराचे दोन प्रसंग लेखकाने तपशीलवार पेश केले आहेत. ते नैसर्गिक वाटत नाहीत. लेखकाची वृत्ती केवळ रसिकच नाही, तर रंगेल, भोगलोलुपही होती. एवढेच ध्यानी येते. भोग घेऊ देणारा निष्पाप आणि भोगणारी पापी हा पवित्राच मुळात स्वार्थी, पापी आहे. या कहाणीतील सुष्ट–दुष्ट स्त्रीसृष्टीत अपार मातृभक्ती एकदाच डोकावून जाते. सारवलेल्या अंगणी एकच पणती मिणमिणावी तशी.

कै. शास्त्री हे तसे अप्रसिद्ध गृहस्थ. खरे प्रसिद्ध त्यांचे बंधू शं. बा. शास्त्री. त्यांचं वाङमयीन मोठेपण य. बां. नी चांगलं विस्ताराने आणि सोदाहरण कथन केलं आहे. सावरकरांच्या 'सन्यस्तखड्ग' नाटकातील 'मर्म बंधातली ठेव ही' हे लोकप्रिय पद शं. बां. चं आहे हे वाचून अनेकांना आश्चर्य वाटेल. रंगभूमीच्या संदर्भात शं. बा., दीनानाथ आणि विश्राम बेडेकर यांच्या य. बां. नी कथिलेल्या साऱ्याच आठवणी नवीन, उद्बोधक आहेत. पत्रकारी आणि ललितलेखन या दोन्ही कला अवगत असणाऱ्या शास्त्रींच्या शैलीचा इथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. दिल्ली वास्तव्यातील अवलिया, बहादुरशहाचा निर्वासित वंशज बेदारबख्त, अमीनाबाई, तिथे ऐकलेले गझल, कळंब गाव व तिथली नदी, आणि घरच्या अंगणातील डवरलेला गुलमोहर या सर्वांच्या वर्णनातून हेच जाणवते की, शास्त्री हे केवळ पत्रकार नव्हते तर, जातीवंत ललितलेखक होते. वाह्यातपणाकडे झुकणारी विनोदबुद्धीही त्यांचे ठायी होती. त्यांनी आपल्या जीवनातील मुग्धकोमल, कटू, गोड, शीतल-दाहक अनुभव मुक्तपणे, किंबहुना स्वैरपणे शब्दांकित करून स्वतःचा आगळेपणा सिद्ध केला. लेखकाच्या माणुसकीने ओथंबलेल्या आगळेपणाचं कौतुक आता कितीही केलं तरी फारसा उपयोग नाही. शास्त्री हे एक वैदर्भी झाकलं माणिक होतं एवढं त्यांच्या आत्मचरित्रावरून पुण्या-मुंबईकडील रसिकांना कळून येईल हा लाभ काही कमी नाही. □

**य. बा. शास्त्री**
य. बा. शास्त्री,
प्रेस्टीज पब्लिकेशन्स,
टिळक रस्ता पुणे ३०,
मूल्य २५ रु.

### बालगंधर्वांचे फुकट प्रेक्षक

नानाजी मंगळमूर्ती खुशमिजास होते, तसेच व्रात्यपण. डॉ. गद्रे सवाई व्रात्य. एकदा ही मंडळी बालगंधर्वांचे नाटक पाहण्यास अमरावतीस गेली दोघांनी नाटक फुटक पाहण्याचे ठरविले. थिएटरात तुडुंब गर्दी. तिकिटाच्या अभावी अनेकजण परत जात होते. पण ही मंडळी तेथेच रेंगाळत उभी. गंधर्वांचे 'पांडुकुमारा' हे पद आत सुरू होताच, गद्रे एकदम 'अरे, हमारे पांडू कू मारा' ओरडत आत घुसले. त्यांच्याबरोबर नानाजी व इतरही आत घुसले व मिळेल त्या जागेवर बसून ठरल्याप्रमाणे फुकट नाटक पाहून आले.

(पृ. २२–२३)

सर्वोत्तम लेखक ('टाईम 'वरून)

# अल्बेर कामू

परिचय : जे. एन्. पोंडा
(फिनिक्स लायब्ररी, पुणे)

अल्बेर कामू (१९१३-१९६०) 'Life is irrational. Life is a cosmic absurdity.' 'Mankind has but one Problem. And it is Suicide.' जीवनाबद्दल असली वाक्ये लिहिणारा व बोलणारा हाच तो अल्जेरियामध्ये जन्मलेला अल्बेर कामू. त्याला १९५७ मध्ये नोबेल प्राईज मिळाले होते. जीवन जगण्यासाठी कोणताच युक्तिवाद उपयोगात येत नाही, तर जीवन संपवण्यासाठीही कोणताच उक्तिवाद यशस्वी ठरत नाही, म्हणून आत्ताच, या घटकेलाच, जीवन जेवढ्या उत्कटतेने जगता येईल तेवढे माणसाने बघावे, असे कामूचे म्हणणे होते. कामू स्वत: एका absurd मोटारगाडीच्या अपघातात १९६० मध्ये मरण पावला. हे जणू त्याच्या वरील उक्तीला पुष्टीच देत आहे. ग्रीसमध्ये पूर्वी philosophical Statesmen होते. कामूविषयी असे म्हणता येईल की, तो खऱ्या अर्थाने Philosophical Writer होता. १९४२ च्या पुढे तो फ्रान्सच्या Vichy गव्हर्नमेंटच्या संधिसाधूपणामुळे इतका हादरला की, त्याने आपली मते व तत्त्वच बदलून टाकली. कामू जसजसा परिपक्व होत गेला तसतसे त्याचे विचारही बदलत गेले. डॉस्टॉव्हॅस्की म्हणत असे, 'If God does not exist, everything is permitted.' पण कामूच्या दृष्टीने, 'God does not exist, but everything is not permitted. And what is never permitted is injsutice and wrong doing.'

'तरुण असताना कामू म्हणत असे, मला एक शब्द समजत नाही. आणि तो म्हणजे 'पाप.' पाप आणि पुण्य, सुख आणि दु:ख असे हे कसे Subjective व empirical असतात ते आपण बघू. एका म्हातारीला एक मुलगा होता. त्या म्हातारीचा भाऊ आधीच दिवंगत झाला होता. त्यामुळे तिच्या भावाच्या मुलाला तिने पोटच्या मुलाप्रमाणे वाढविले होते. इतकेच नव्हे पण, तिने मृत्यूपत्रात सख्ख्या मुलाला व भावाच्या मुलाला अगदी सारखाच हिस्सा दिला होता. सख्ख्या मुलाचे आईवर अतिशय प्रेम होते, पण तिच्या भाच्याला मात्र म्हातारीबद्दल अजिबात जिव्हाळा नव्हता. एकदा लवकर पैसे मिळावेत म्हणून त्याने म्हातारीचा खून करायचाही बेत आखला होता, पण तेवढ्यात म्हतारी मेली ही घटना सख्ख्या मुलाला दु:खद व भाच्यासाठी सुखद ठरली, म्हणजे घटना एकच पण त्या दोघांसाठी ती अगदीच विरुद्ध ठरली.

अल्बेर कामूच्या The Outsider (अमेरिकेत त्या पुस्तकाचे नाव The stranger आहे व इंग्लंडमध्ये The Outsider असे आहे) मध्ये एक माणूस स्वत:च्या आईच्या दफनक्रियेच्या वेळी अजिबात भावना दाखवीत नाही व पुढे हाच मनुष्य अल्जेरियाच्या तळपत्या उन्हात एका अरबाचा खून करतो. ट्रायल होते तेव्हा ज्युरींना कळते की, या मनुष्याने स्वत:च्या आईच्या दफनक्रियेच्या वेळी कोणत्याच भावना दाखवल्या नव्हत्या. म्हणजे तो अगदीच हिणकस होता. तेव्हा आता त्याला देहान्त शिक्षा झालीच पाहिजे!

Universe is irrational हे अल्बेर कामूचे पालुपद त्याच्या साहित्यातून अनेकदा गाईले जाते. एका ठराविक परिस्थितीत माणसाने ठराविक रित्याच वागले पाहिजे हे तंत्र कामूला मान्य नव्हते. सबंध विश्वच जर irrational आहे तर, नीतिमूल्यांसाठी एक ठराविक फॉर्म्युला कसा काढावा असे कामू Myth of Sisyphus मध्ये विचारतो. कामूच्या Caligula या नाटकात माणसाने त्याग करून समाजकार्याला वाहून घेतले पाहिजे असे तो म्हणतो.

कामू हा थोडे दिवस सार्त्रचा खास मित्र झाला. कामू कट्टर अस्तित्ववादी होता. सार्त्र अजूनही तसा आहे. पण सार्त्र हा थोडासा धंदेवाईक व academic तत्त्वज्ञ आहे. कामू हा आधी पत्रकार होता. (इथे हेमिंग्वे व स्टीनबक हेही आधी पत्रकार


**SOME NEW TITLES RECEIVED**

| | | |
|---|---|---|
| 1. | **The Terminal Connection**–( Bestseller–Thriller by the author of French Connection)– Robin Moore | Rs. 18·90 |
| 2. | **I Heard The Owl Call My Name**–( Bestseller )– Margaret Craven | Rs. 8/– |
| 3. | **Heat And Dust**–( The novel that raised much controversy and won the Booker–Award of £ 5000 )–R. P. Thabvala | Rs. 7/– |
| 4. | **The Day Of The Dolphin**–( Picture Story–Thriller about Dolphins )–Robert Merle | Rs. 12/– |
| 5. | **A Doll For The Child Prostitute**–( Novel )– Kamala Das | Rs. 4·50 |
| 6. | **Mary Queen of Scots**–( Bestseller–Biography ) Antonia Fraser | Rs. 16·75 |
| 7. | **Psychic Discoveries Behind The Iron Curtain**–( The most outstanding book on the Subject )– Sheila Ostrander & Lynn Schroeder | Rs. 14·55 |

पालकांनो, आपल्या पाल्याला उत्तम संस्कार देण्यासाठी त्यांना उत्तमोत्तम साहित्य उपलब्ध करून द्या. उत्तम साहित्य वाचणे हे पदवी मिळविण्याइतकेच ( किंबहुना जास्त ) महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी– 'फिनिक्स लायब्ररी'

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

होते ते आठवते.) कामू एका नाटक कंपनीचा दिग्दर्शकही होता. कामू खऱ्या अर्थाने कलाकार होता. म्हणून सार्त्रसारख्या कमठ व शिस्तप्रिय माणसाचे पुढे कामूशी मतभेद निर्माण झाले.

डावीकडे झुकलेल्या Combat नावाच्या मासिकाचा कामू बरेच दिवस संपादक होता. तरीपण सॉलझेनित्सिनच्या आधी कामूच असे म्हणाला होता की, रशियन कॉन्सेन्ट्रेशन कॅम्प्स् हे नाझींच्या कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पइतकेच माणसाच्या अंतःकरणाला काळीमा लावणारे होते.

कामूच्या The Plague या पुस्तकात उत्तर आफ्रिकेच्या एका आधुनिक शहरात ब्युबॉनिक प्लेग होतो व जिकडे तिकडे भ्रष्टाचार फैलावतो. या पुस्तकात The Outsider व Myth of Sisyphus पेक्षा वेगळीच तत्त्वे कामूने मांडली आहेत.

हिंसेने क्रांती करणे हे कामूला अजिबात पटत नव्हते. समाज सुधारण्यासाठी माणसाने कधीच अतिरेकी साधनांचा वापर करू नये असे कामूचे मत होते.

अल्बेर कामूवर एकदा असाही आरोप ठेवण्यात आला होता की, तो निराशावादी साहित्यात भर घालतो! (इथे मौजेचे लक्ष ओढतो निराशावादी!) पण कामू म्हणतो की, 'माझ्या पुस्तकात निराशेवर कशी मात करायची याचेच मी विवेचन केले आहे!' एकदा तर त्याने, तो कट्टर अस्तित्ववादी होता हेच नाकारले होते. त्या वेळेला माझे 'The Myth of sisyphus हे तथाकथित अस्तित्ववादींनाच प्रत्युत्तर आहे!' असे तो म्हणाला होता. Really, Camus, Life is irrational!

The Hall या पुस्तकात कामूने माणसाच्या पतनाच्या अवस्थेचा आढावा घेतला आहे व असे नैतिक प्रश्न उपस्थित केले आहेत की, ख्रिश्चन धर्मच त्याची उत्तरे देऊ शकेल. या कारणामुळे तो कॅथॉलिक वाचकांत अत्यंत लोकप्रिय झाला.

The Rebel या पुस्तकातच कामूने अतिरेकी साधनांचा निषेध केला आणि त्यामुळे उजवीकडे झुकलेल्या लोकांमध्ये तो लोकप्रिय ठरला.

आता बघा. शेवटी डावीकडे झुकलेल्या Combat मासिकाचा संपादक उजवीकडे झुकलेल्या गटात लोकप्रिय ठरतो! व एक हाडाचा नास्तिक, आस्तिक वाचकांत लोकप्रिय ठरतो! Come now, Camus, really, really, life is irrational!

### नोबेल प्राईज मिळालेले लेखक

| | | |
|---|---|---|
| १९०१ | Sully Prudhomme | फ्रेंच कवी |
| १९०२ | Theodor Mommsen | जर्मन इतिहासकार |
| १९०३ | Djôrnstjerne Bjornson | नॉर्वेजिअन कादंबरीकार, कवी व नाटककार |
| १९०४ | Frederic Mistral | कवी आणि भाषाशास्त्रज्ञ |
| १९०४ | Jose Echegaray Y Eizaguirre | स्पॅनिश नाटककार |
| १९०५ | Henryk Sienkiewicz | पोलीश कादंबरीकार |
| १९०६ | Giosue Carducci | इटालिअन कवी |
| १९०७ | Rudyard Kipling | इंग्लिश कवी व कादंबरीकार |
| १९०८ | Rudolf Eucken | जर्मन तत्त्वज्ञ |
| १९०९ | Selma Lagerlof | स्वीडिश कादंबरीकार |
| १९१० | Paul Von Heyse | जर्मन कवी, कादंबरीकार व नाटककार |
| १९११ | Maurice Maeterlinck | बेल्जिअन नाटककार |
| १९१२ | Gerhart Hauptmann | जर्मन नाटककार व कादंबरीकार |
| १९१३ | Rabindranath Tagore | भारतीय कवी |
| १९१४ | No Award | ---- |
| १९१५ | Romain Rolland | फ्रेंच कादंबरीकार |
| १९१६ | Verner Von Heidenstam | स्वीडिश कवी |
| १९१७ | Karl Gjellerup | डॅनिश कादंबरीकार व कवी |
| | Henrik Pontoppidan | डॅनिश कादंबरीकार |
| १९१८ | No Award | ---- |
| १९१९ | Carl Spitteler | स्वीस कवी व कादंबरीकार |
| १९२० | Knut Hamsun | नॉर्वेजिअन कादंबरीकार |
| १९२१ | Anatole France | फ्रेंच कादंबरीकार |
| १९२२ | Jacinto Benavente Y Martinz | स्पॅनिश नाटककार |
| १९२३ | William Butler Yeats | आयरिश कवी |
| १९२४ | Wladyslaw Stanislaw Reymont | पोलिश कादंबरीकार |
| १९२५ | George Bernard Shaw | आयरिश नाटककार |
| १९२६ | Grazia Deledda | इटालिअन कादंबरीकार |
| १९२७ | Henri Louis Bergson | फ्रेंच तत्त्वज्ञ |
| १९२८ | Sigrid undset | नॉर्वेजिअन कादंबरीकार |
| १९२९ | Thomas Mann | जर्मन कादंबरीकार |
| १९३० | Sinclair Lewis | अमेरिकन कादंबरीकार |
| १९३१ | Erik AxelKarlfeldt | स्वीडिश कवी. दिवंगत झाल्यावर दिले गेले. दहा वर्षांपूर्वीच ते देऊ केले होते, परंतु त्याने ते नाकारले. कारण स्वीडनबाहेर तो वाचला जात असे. |
| १९३२ | John Galsworthy | इंग्लिश कादंबरीकार व नाटककार |
| १९३३ | Ivan Alixeyevich Bunin | रशिअन कादंबरीकार व कवी |

एकदा प्रख्यात जर्मन कवी, नाटककार व कादंबरीकार Goethe ( त्याला बऱ्याच लोकांनी घाटे किंवा घाटी म्हटले आहे. ( १७४९–१८३२ ) मृत्यूशय्येवर ओरडला होता, ' मला प्रकाश-हवा आहे.' ( म्हणजे ' Lead, O kindly light ! ' यासारखा ). कामूचेही उभे आयुष्य हा 'प्रकाश' शोधण्यात गेले. मानवाच्या विचित्र परिस्थितीचे त्याला एक विजेच्या कल्लोळासारखे डोळे दिपवून टाकणारे अंतर्ज्ञान झाले आणि याचा शोध घेताना जणू सबंध भूमध्य समुद्राचा आसमंत त्याला कुरवाळू लागला, व अल्जेरियाचा प्रखर सूर्यप्रकाशच जणू त्याला वाट दाखवू लागला ! कामूला ही दोन ठिकाणे अत्यंत प्रीय होती.

आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्या निराशेवर कामूने असे लिहिले आहे की, ' The violent bath of Sun and wind drained me of all strength. I scarcely felt the quivering of wings inside me, life's complaint, the weak rebellion of the mind. Soon, scattered to the four corners of the earth, self-forgetful and self-forgotton, I am the wind and within it, the columns and the archway, the flagstones warm to the touch. the pale mountains around the deserted city. And never have I felt sy deeply at one and the same time so detached from myself and so present in the world. '

प्रामाणिकपणा, अंत:करण, मानवता हे व असले शब्द वापरून वापरून गुळगुळीत झाले आहेत. कामूला या शब्दांची जणू 'allergy'च होती. पण याच शब्दांनी कामूचे वर्णन करावे लागेल. कारण कामू स्वत:शी निष्ठ राहून शेवटपर्यंत सतत सत्याचा शोध करीत राहिला. (क्रमश:)

लेखकांची सर्व माहिती गोळा करणे हे काम फार वेळ खाणारे असल्यामुळे या वेळेस अल्बेर कामू व थॉमस मॅन यांचे परिचय देण्याचे योजले असून सुद्धा थॉमस मॅनचा परिचय देणे अशक्य होत आहे.

पुढील अंकात फ्रान्झ काफ्का( The castle, The Trial, America, Metamorphosis And Other Stories वगैरेंचा लेखक ) यांचा परिचय. □

| | | |
|---|---|---|
| १९३४ | Luigi Pirandello | इटालिअन कादंबरीकार व नाटककार |
| १९३५ | No Award | ---- |
| १९३६ | Eugene O' Neill | अमेरिकन नाटककार |
| १९३७ | Roger Martin du Gard | फ्रेंच कादंबरीकार |
| १९३८ | Pearl S. Buck | अमेरिकन कादंबरीकार |
| १९३९ | Frans Eemil Sillanpaa | फिनलंडचा कादंबरीकार |
| १९४० ते १९४३ | No Award | |
| १९४४ | Johannes V. Jensen | डॅनिश कादंबरीकार आणि कवी |
| १९४५ | Gabriela Mistral– (Lucila Godoy Y' Aleayaga) | चिलिअन कवी |
| १९४६ | Hermann Hesse | स्वीस कादंबरीकार व कवी |
| १९४७ | Andre Gide | फ्रेंच कादंबरीकार, निबंधकार, तत्त्वज्ञ आणि कवी |
| १९४८ | T. S. Eliot | इंग्रजी कवी आणि टीकाकार |
| १९४९ | William Faulkner | अमेरिकन कादंबरीकार |
| १९५० | Bertrand Russel | इंग्लिश तत्त्वज्ञ व गणित तज्ज्ञ |
| १९५१ | Par F. Lagerkvist | स्वीडिश कादंबरीकार, कवी व निबंधकार |
| १९५२ | Francois Mauriac | फ्रेंच कादंबरीकार, पत्रकार व कवी |
| १९५३ | Sir Winston Churchil | इंग्लिश इतिहासकार व राजनितिज्ञ |
| १९५४ | Ernest Hemingway | अमेरिकन कादंबरीकार |
| १९५५ | Halldor Kiljan Laxness | आईसलॅंडचा कादंबरीकार |
| १९५६ | Juan Ramon Jimenez | स्पॅनिश कवी |
| १९५७ | Albert Camus | फ्रेंच कादंबरीकार व नाटककार |
| १९५८ | Boris L.Pasternak | रशिअन कवी आणि कादंबरीकार– –पारितोषिक नाकारले. |
| १९५९ | Salvatore Quasimodo | इटालीअन कवी व टीकाकार |
| १९६० | Saint-John Perse– (Alexis Leger) | फ्रेंच कवी |
| १९६१ | Ivo Andric | युगोस्लाव्हिअन कादंबरीकार |
| १९६२ | John Steinbeck | अमेरिकन कादंबरीकार |
| १९६३ | Riorgos Seferiades | ग्रीक कवी |
| १९६४ | Jean-Paul Sartre | फ्रेंच तत्त्वज्ञ, कादंबरीकार, नाटककार– –पारितोषिक नाकारले. |
| १९६५ | Mikhail Sholokhov | रशिअन कादंबरीकार |
| १९६६ | S. Y. Agnon | इस्रायली कादंबरीकार |
| | Nelly Sachs | जर्मन कवी |
| १९६७ | Miguel Angel Asturias | ग्वाटेमालाचा कवी |
| १९६८ | Yasunari Kawabata | जपानी कादंबरीकार |
| १९६९ | Samuel Beckett | आयरिश नाटककार व कादंबरीकार |
| १९७० | Alekzander Solzhenitsyn | रशिअन कादंबरीकार |
| १९७१ | Pablo Neruda (Ricardo– –Eliezar Neftali Reys Bosoalto) | चिलिअन कवी |
| १९७२ | Heinrich Boll | जर्मन कादंबरीकार |
| १९७३ | Patrick V. M. White | ऑस्ट्रेलिअनकादंबरीकार |

□

# स्वीडनमधल्या त्या दोन फुलपाखरांची गोष्ट

अशोक प्रभाकर डांगे

प्रत्येकाच्याच मनात एकेकदा एकेक स्वप्न आकाराला येत असतं. कधी ते भावनांच्या ताटव्यावर फुलपाखरू होऊन भिरभिरत राहतं, तर कधी इच्छेच्या अथांग आकाशात घार होऊन घिरट्या घालत राहतं. अशाच एका नवथर स्वप्नातलं एक सुरम्य गाव परवा मला अगदी अचानकच भेटलं. खरं म्हणजे, मीच त्या स्वप्नील सुंदर वास्तवाकडे अगदी हलक्या पावलांनी अलगद चालत गेलो. आणि माझ्या स्वतःच्याही नकळत तिथल्या त्या देखण्या आसमंताच्या प्रेमातदेखील पडलो.

हे स्वप्न जणू कालपरवापर्यंत माझ्या पापण्यांवरच नाचत होतं. आणि आज एखाद्या रंगीत परीसारखं ते पांढऱ्या पडद्यावर पिंगा घालत होतं. मला राहायला आवडणारी लाल कौलारू घरं पण तिथे होती, आणि बेभान होऊन कवटाळून टाकावं अशी गर्दगार हिरवी रानं पण तिथे होती, आणि वाऱ्यांना अस्ताव्यस्त बागडायला हिरवीगार कुरणं पण होती, आणि कुरणांना आरपार भेदून जाणारी मातीची सडक तिही तिथे होती.

स्वप्नांच्या पागोळ्या अंगावर घेतच मी त्या गावात शिरलो आणि भेटलेल्या पहिल्याच व्यक्तीला विचारून घेतले, 'अरे, हे गाव तरी आहे कुठलं ?' मग मात्र माझ्या मनातला कुतूहलाचा कोलाहल संपला. माझ्या स्वप्नांच्या पावलांनी मी बघता बघता स्वीडन नावाच्या देशात येऊन पोहोचलो होतो तर ! म्हणजे इथे मी एक परका. ना घरचा, ना दारचा. आणि भाषेबिषेचा तर चेहरामोहरादेखील काळा की गोरा न पाहिलेला ! जरा दबकत दबकतच पुढे झालो. वाटेवर एक भव्य दुमजली घर भेटलं. दारातच एक पोरगी फतकल मारून बसली होती. पाच सहा वर्षांची असेल. चुकलंच तर सातं. पण जास्त नाही. ती बेटी खड्याचे सागरगोटे करून खेळत होती. मध्येच ती कंटाळली. ते मूठभर खडे तिनं आपटून टाकले आणि समोर बघते तर मी. मग सरळ पुढे धावतच आली आणि चक्क मला बिलगली. जणू ती कितीतरी दिवस माझीच वाट पाहत असावी ! ती गोड पोर म्हणते कशी.'

'माझं नाव जोसेफीन ! तुमचं ?'

मनात म्हटलं छान. पोरगीदेखील आपल्या स्वप्नाला साजेशीच आहे. अगदी कुणालाही आवडण्याइतकी. म्हटलं जमवावी हिच्याशीच दोस्ती. जमून जाईल.

मग जोसेफीननंच मला खूप गोष्टी सांगितल्या. तिचे वडील धर्मगुरू आहेत. ते सारखे आपल्याच कामात असतात. मग त्यांना तिच्याकडे बघायला वेळ कुठून असणार. स्वाभाविकच होतं म्हणा. तशी ती शाळेतदेखील जाते. पण शाळा पण जरा लांबच आहे. आणि एकट्यानं जायचं तर तिच्या जीवावरच येतं. मी म्हटलं बरोबर आहे. तिला पण तिचं मन आहेच की, पण तिच्या बरोबर खेळायला वगैरे कोण ? तेव्हा मला कळलं जोसेफीनचं खरं दुःख हेच आहे की, तिच्याबरोबर खेळायला बरोबरीचं असं कुणीच नाही. ती आपला वेळ सदानकदा कसातरी घालवत असते एवढंच. कधी झाडांशी खेळते, तर कधी दगडांना सवंगडी करते. कधी बागेची चित्रं रंगवते, तर कधी घरातल्या घरातच चाळे करते. कधी स्वतःशी हसते तर कधी स्वतःतच हरवून बसते. कधी वडलांचा धर्मगुरूचा झगा घालून छानपैकी प्रवचनं ठोकते. म्हणजे आपल्या वडलांचीच नक्कल वठवते. पण येवढं करूनदेखील तिचा वेळ जाईल, तर तेही नाही. कसा जाईल म्हणा ? एकटेपणाचं दुःख असंच असतं. मला म्हणाल तर, तिच्या कोवळ्या मनाची ती फरफट मात्र मुळीच बघवत नाही. मनातनं उगीच वाटतं की, तिला खेळायला का होईना, एखादा छोटा मित्र आता मिळायला हवाच.

आणि मग माझ्या मनासारखंच होतं. जोसेफीनला जोडीदार भेटतो. ह्यूगो वयानं तिच्याएवढाच. फारतर वर्षभरानं मोठा असेल. हा स्विडीश पोरगा. त्याचा चेहराच नुस्ता बोलत राहतो. त्याच्या डोळ्यातून नाचत असतात अनामिक भावनांचे मोर. एकदा जोसेफ दप्तर घेऊन शाळेला निघाली तर वाटेत हा झाडाखाली बसलेला. मी फांद्यातून वाकून बघतो तर, त्याच्या एका हातात चाकू आणि दुसऱ्या हातात एक लाकूड. मी काही विचारायच्या आतच जोसेफ विचारते ( कारण तिलाच उत्सुकता असते ना ! )

'ह्यूऽगो, काय करतोयस ?'

'लाकूड तासतोय'

'होडी करणारेस ?'

'कुणास ठाऊक ! करीनसुद्धा !'

'शाळेत जातेस ?'

'नाही. पण जावं अशी अपेक्षा आहे !'

मी मनातन आपला खुश. म्हटलं छान जमतंय. आता माझं स्वप्न पण रंगायला लागलंय. म्हणूनतर मी माझ्यावरचं खुश. जोसेफ तर नाचतच शाळेत जाते. तिचं बरोबर आहे म्हणा. तिला आता जोडीदार भेटलाय ना ! घरी गेल्यावर ती आधाशासारखी आईला सांगूनपण टाकते.'

'आई, मला एक मित्र मिळालाय'

'छान – नाव काय ग ?'

'ह्यूऽगो'

ह्यूगो एक वेगळाच पोरगा असतो. त्याचे कपडे, त्याचं वागणं, त्याचं राहणं सगळं वेगळ्याच ढंगाचं. त्याचा मुक्काम नेहमी

रानातच. माझ्या मनात दडून बसलेल्या पोरासारखाच तो झाडांच्या कुशीत झोपतो. आकाशाशी दोस्ती साधतो. पाखरांशी. गुज-गोष्टी करतो. तो एक निसर्गाचाच पोर असतो. मला आवडतं ते त्याचं अवखळ, उत्साही व्यक्तिमत्त्व. ह्या रानातल्या दिवसात कधी याद आलीच तर तो येतो आणि त्याच्या अंकलनं करून ठेवलेलं जेवण बकाबक खाऊन घेतो. बस, एवढंच त्याचं घर ह्या गोष्टीशी नातं.

एकदा मात्र चांगलीच गंमत होते. जोसेफीनच्या नादात असेल किंवा स्वतःलाच वाटलं म्हणून असेल, भटक्या ह्यूगो शाळेत येतो. बाईंना विचारतो.

'मी शाळेत येऊ ? मला शिकायचंय !'

'आधी कधी शाळेत गेला होतास ?'

'नाही.'

'तुझी आई कुठंय ? तीं नाही आली ?'

'मला आई नाही.'

'पण नाव तरी घातलंय का तुझं ?'

'कशाला ते ?'

मग मीच पुढे होतो. बाईंकडे रदबदली करतो. हा मोठा छान मुलगा आहे. घ्या ह्याला. पण मी काही सांगायच्या आतच ह्यूगोनं वर्गातल्या प्रत्येकाशी ओळख करून घेतलेली देखील असते. जोसेफीनला तो 'हाय ऽ' म्हणतो आणि सरळ तिच्याशेजारी बाकावर ठाण मांडतो. मी चाटच. मग गाण्याचा तास होतो. बाई पियानो वाजवतात. पोरं त्या तालावर गातात. आता मात्र ह्यूगोला राहवत नाही. तो खिशातून बाजा काढतो आणि बाईंच्याच सूरात वाजवू लागतो. पोरांचे आवाज जागच्या जागीच खिळतात, आणि बाईंची आणि ह्यूगोची जुगलबंदी रंगात येते. हा अफलातून पोर बाईंचं मनं कधीच जिंकलेला असतो.

माझ्या स्वप्नाचे रंग अधिकच चमकू लागतात. ह्या असल्या सुरेख गावातनं परत जायला मी तरी कुठे तयार असतो ! क्षणमात्र झुंडीझुंडीनं पळतच असतात. जोसेफची तर चंगळच असते. ती आणि ह्यूगो दोघांच्या भटकण्याच्या मोहिमा रंगात आलेल्या असतात. ह्यूगो तिला गावातल्या आणखी एका म्हाताऱ्याकडे नेतो. म्हणतो,

'आजोबांनी बटाटे सोलायचं एक मोठं यंत्र बनवलंय '

'बघून येऊ का ?'

'जा बघ माळ्यावर पडलंय–पण ते चालू असल्याचं कधी कोणी पाहिलं नाहीय.'

जोसेफबरोबर मी पण माळा गाठतो. ह्यूगो म्हणाला ते खरं असतं तर. एक भलं मोठं यंत्र तिथे पडलेलं. आणि बाजूला बटाट्याचे ढीगच्या ढीग, पडलेले. आम्ही खाली येतो तर, ह्यूगोचा दुसराच धंदा चाललेला. एका खांबाला तो आरसा लावत असतो. खांबासमोर दोन खोकडे आणून मांडतो. एकावर म्हाताऱ्याला बसवतो. दुसऱ्यावर आपण उभा राहतो. मग घोपटीतून कात्री काढतो आणि म्हाताऱ्याचे केस कातरायला लागतो. मी हादरतो. पोरगा भलताच भेदी निघतो. आजोबांनी आठवणीनं दिलेलं नाणं तो पाठीवरच्या घोपटीत नीट लपवून ठेवतो. जोसेफीनला राहवत नाही. ती विचारतेच,

'पैसे साठवतोयस ?'

'होय,

'कशासाठी ? सायकल घ्यायला ?'

'नाही जगायला'

'जगायला' हा शब्दप्रयोग त्याच्या तोंडी कसातरीच वाटतो. मी पण क्षणभर दचकतो. रस्त्याच्या पलीकडे नजर टाकली. हिरवीगार कुरणं बिचारी डोलत असतात. डोक्यावर निरभ्र आकाश हसतंय. बस्स. माझा मूर्खपणा हा की, ह्या पोराला मी अजूनही समजून घेऊच शकलो नाही. निदान आता तरी त्याला काही तरी विचारणार तेवढ्यात जोसेफाईन म्हणून जाते.

'तुला सायकल चालवायला आवडेल ?'

'हो. नक्कीच !'

'चल, मी तुला सायकल दाखवते.'

'चल. कुठाय ?'

'मोडक्या फॅक्टरीत एक सायकल पडलीय म्हणतात'

दोघे धावतात. त्याला उसंत नसते. मागनं मी धडपडतोय. एक जुनी बंद फॅक्टरी. यंत्राचे प्रचंड सांगाडे. दोघं शोध शोध शोधतात. एकदा जोसेफ भिते देखील, पण तो नाद सोडत नाही. शेवटी एकदाची सापडते. मी बघतो. हादरतोच. ती असते सर्कशीतली एक चाकी सायकल. एक भले मोठे चाक, मागे लहानसं दुसरं, वर बसायला एक फळकूट. माझ्या पोटात आता गोळा येतो. पोर धाडसी असला म्हणून काय झालं ? त्याच्या दहापट उंचीची ती सायकल चालवणार कसा ? पण इथेही माझी टोपी पडते. ते एकचाकी प्रचंड धूड ह्यूगो लीलया चालवतोय. गावातल्या रस्त्यावर मजेत हिंडतो. आणि पोराचा हा पराक्रम पहायला अवघा गाव रस्त्यावर लोटलय. त्याचं कौतुक म्हणून जोसेफीन त्याच्या बाजूनं धावतेय. त्याला आनंद झालाय आभाळायेवढा. आता तो आनंद माझ्याही डोळयांत मावेनासा झालाय. त्याच्या शक्यतेपलीकडे वस्तू, मग एकचाकीका असेना. ती मिळाल्यावर ह्यूगोला जग जिंकल्याचा आनंद झालाय.

आतापर्यंत स्वप्नातलं हे गाव मला चांगलच मानवलय. मीही ह्या पोरांच्या प्रेमात पडलोय. पण तेवढ्यात ह्यूगो गायब. नेहमी प्रमाणे आपल्या संशोधन मोहिमेवर गेलेला. त्याच्या अंकलला त्याचं काहीच वाटत नाही. पण जोसेफीन मात्र पार रडकुंडीला येते. शिवाय शाळेतली पोरं तिला, त्याच्यावरनं चिडवतात ते वेगळंच ! ती तिकडे लक्षच देत नाही. पण एकदा एक टारगट पोरगा तिला सांगून टाकतो.

'ह्यूगोचा बाप तुरुंगात आहे !'

'शक्यच नाही ! तू खोटं बोलतोयस'

तिला तो स्वतःचाच अपमान वाटतो.

'तू खोटारडा आहेस !'

'मी ? आणि खोटारडा ?'

तो पोरगा तर तिला चांगलीच थोबाडतो. मी देखील कळवळतो. पण ती पोर मात्र ह्यूगोसाठी काहीही सहन करायला तयार असते. माझ्या स्वप्नांच्या आकाशात आता गडद भरू लागलेले असतात.

पण ह्यूगो एकदाचा येतो. त्याच्या पाठीवर घोपटी बांधलेली असतेच.

'सॉरी ! मॅडम ! मला प्रत्येक गोष्टीला नेहमी उशीर होतो. आजही तसाच झालाय !

बाई बघतच राहतात.

'पंधरा दिवस होतास तरी कुठं तू ह्यूगो ?'

'हे खेकडे ना फार वेळ खातात. बाई मी त्यांच्याच अभ्यास मोहिमेवर होतो ना ?'

ह्यूगो दोस्तांना भेटतो. तेवढ्यात त्याची ती घोपटी निसटते. खाली पडते. त्याचा सगळा संसार उधळला जातो. त्यात पानं असतात नि फुलं असतात. आणखीही खूप

गोष्टी असतात. त्यातलंच एक सुवासिक लाकूड तो पोरांना दाखवतो. मग सगळीच पोरं ते पाळीपाळीनं हुंगत राहतात. मला वाटतं बाई आता त्याच्यावर रागावणार. पण कसचं काय. उलट त्या त्याला आपल्या जवळचं नवीन पुस्तक काढून देतात. वर्ग पुन्हा सुरू होतो. तेवढ्यात जोसेफीन ओरडते,

'बाई हृयूगो झोपलाय !'

जोसेफची आता मुळीच तक्रार नसते. दोघांची दोस्ती चांगली जोरात असते. दिवसभर तर ती त्याची पाठ सोडायला तयार नव्हती. घरी गेल्यावरदेखील आईला ती हृयूगोचेच पराक्रम सांगत राहते. एकदा ती उत्साहात आईला सांगते,

'आई, हृयूगो माझ्यासाठी कॅलिडोस्कोप करतोय'

माझं सारं स्वप्नंच कॅलिडोस्कोपमधल्या रंगीबेरंगी आकृतीसारखं क्षणाक्षणाला बदलतंय. माझ्या हलक्याफुलक्या भावनांचे रंगीन तुकडे क्षणोक्षणी नवनव्या आकृती साकारतायत. पण आता एक मात्र मी नक्की ठरवलंय की, हृयूगोला ती गोष्ट विचारायचीच. पण ते सत्य विचारण्याआधीच नेहमीप्रमाणे माझ्याकडे चालत आलंय. त्याचं काय झालं, आज सकाळी हृयूगोनं जोसेफला एक वेगळंच ठिकाण दाखवायला नेलं. वेगळं म्हणजे एक खाणच होती ती. तिथे खनिजांच्या ढीगाऱ्यांवर ते घसरगुंडी खेळले. बागडले. मग हृयूगो तिला तिथल्या त्या प्रचंड कन्व्हेअर बेल्टच्या जुनाट कंट्रोल रूममध्ये घेऊन गेला. तिथे भितीवर एक हॅट ठेवलेली होती. ती त्यानं अलगद काढून घेतली. त्याच्या वरची धूळ पुसली आणि मग आपला कोवळा हात हळवारपणे हॅटवरनं फिरवला. मला काहीतरी वेगळंच वाटलं. ओल्या भावनांचा वास माझ्या मनात दरवळला. मी जीवाचे कान केले. हृयूगो आपल्या त्या प्रीय मैत्रिणीला सांगत होता.

'ही माझ्या डॅडींची हॅट !'

मग मी कळवळलो. मला सारं काही कळून चुकलं. म्हणजे ह्याच खाणीवर त्याचे वडील काम करत होते तर! त्यांनी सक्तीनं सैन्यात जायचं नाकारलं म्हणूनच मग त्यांना तुरुंगात डांबण्यात आलं! गावातल्या प्रत्येकाला ते ठाऊक होतं. माहीत नव्हतं ते आमच्या जोसेफीनला. म्हणून तर आता तिचे डोळे पाणावले! मी वळून पाहिलं. ती दोघं परत निघाली होती. आणि हृयूगोच्या डोक्यावर त्याच्या वडलांची हॅट डोकावत होती. स्वीडन नावाचा देश. त्यातलं सुंदर खेडं. ते खेडंच आता माझ्या स्वप्नातलं फुलपाखरू झालंय. आज पाऊस पण झिमझिमतोय आणि हृयूगोपण परत कुठेतरी गायब झालाय. जोसेफ त्याच्या अंकलच्या मागे मागे आहे. त्या चिमुरड्या पोरीनं छान लाल रेनकोट चढवलाय आणि तिच्याबरोबर दाढीवाला ताडमाड उंच अंकल चालतोय. त्या हळव्या पावसात मला पण भिजावंसं वाटतंय. जोसेफ विचारत्येय,

'तुम्ही दुःखी आहात ?'

ती सहा वर्षाची पोर. मला आता चक्रावून सोडत्येय.

'होय'

'कशामुळे ?'

'ते माझं गुपीत आहे !'

रस्त्यावर जागोजाग पाणी साठलंय. प्रत्येक डबक्यात पाय आपटून पाणी उडवायचा खेळ चाललाय. आधी ती मग अंकल. ती जोरात मग अंकल आणखी जोरात पाणी उडवतोय. पण शेवटी ती इतक्या जोरात पाय आपटते. प्रचंड पाणी उसळतं. शेवटी अंकल हरतो. मागनं मला दिसतेय ती एक गुडघ्याएवढी पोर. एका उंचपुऱ्या माणसाचा हात पकडून बागडत चाललेली. आता अंकल विचारतोय,

'तू कुणाची तरी वाट बघत्येयस ?'

'हं'

'कुणाची ?'

'ते माझंही गुपित आहे !'

शब्दांची फिटंफाट होतेय. माझ्या मनाचा कॅलिडोस्कोप झालाय. त्यात स्वप्नांचे मोर नवनव्या ढंगानं नाचतायत. मला वाटतंय, हे स्वप्नच विरघळू नये, हा खेळ संपू नये. पण तसं व्हायचं नाहीय. उद्याच हृयूगोचे वडील सुटून येणार आहेत. त्यामुळे अंकलचं तिथलं काम आता संपलंय. कारण त्यांच्या मते हृयूगोला आता त्यांच्या आधाराची गरजच राहिलेली नाहीय. अंकलनी आपलं सामान एका टेम्पोत भरलंय. हृयूगो तर रानातच पडलेला. जोसेफ सैरावैरा धावते; रान गाठते, ओरडते,

'हृयूऽगो, अंकल चाललेयत !'

तो बिचारा आपलं सायकलचं धूड बाहेर काढतोय. धडपडत शॉर्टकटनं रानाबाहेरच्या रस्त्यावर येतोय. तो समोरनंच आल्यावर अंकलना टेम्पोला ब्रेक लावणं भागच झालंय. गाडी थांबते. खुर्च्या पडतात. मग मात्र पोरांपायी अंकलचं पाऊल उचलत नाहीय. अंधार उतरतोय. ते तिघं तिथेच उघड्या आकाशाखाली जेवतायत. अंकल एकाकी मुशाफिरांची अफलातून गोष्ट पोरांना सांगतायत. अंधार दाटून येतो. बाजूच्या रानकुरणांना तो झाकून टाकतोय. गोष्ट संपते. अंकल निघतात. त्यांचे डोळे अश्रूंनी डबडबलेयत. क्षणभर भान न राहून अंकल गाडीचे दायरच सुरू करतायत. अंकलचा टेम्पो गर्द अंधारात नाहीसा होतोय. या दोन्ही पोरांचे डोळे एकमेकांकडे लागलेयत.

प्रत्येकाच्याच मनात एकेकदा एकेक स्वप्न आकाराला येतं. माझ्या स्वप्नातला तो सुंदर प्रदेश आता कधीच मागे पडलाय. वास्तवाच्या वादळवाऱ्यांनी मला परत एकदा घेरून टाकलंय. काळाचा एस्कॅलेटर मला नको म्हटलं तरी, बळचाबळचानं पुढे ओढून नेतच आहे. तो स्वीडन नावाचा सुंदर देश, तिथली गर्दगार रानं आणि देखणा वसंत ऋतू आता माझ्या नजरेतून ओसरलाय. पण अंतरंगाच्या आकाशात दोन देखणी फुलपाखरं आता कायमचीच भिरभिरत राहणार आहेत. त्यातल्या एकाचं नाव आहे हृयूगो आणि दुसऱ्याचं नाव आहे जोसेफीन. माझ्या मनात काल आकारलेलं हे स्वप्न मी उद्या पण न चुकता पाहणार आहे. □

[ चित्रपट हृयूगो अँड जोसेफीन : स्वीडन ]

# नक्षत्रांचे देणे !

## कविता अशी जगायची असते !

सतीश कामत

काव्यवाचन हा प्रकार मराठी काव्यरसिकाला नवीन नाही. पण कागद बाजूला ठेवून, जणू काही या ओळी आत्ताच, पाण्यामध्ये एकापाठोपाठ एक निर्माण होणाऱ्या लहरीप्रमाणे, स्फुरत आहेत आणि ते जे जाणवतंय तेच, जसंच्या तसं आपण कुणाला तरी सांगत आहोत याचा अनुभव घेणं आणि देणं हा प्रकार मराठी काव्यरसिकाला नक्कीच नवीन होता. २६ एप्रिलला बालगंधर्व रंगमंदिरात पं. भास्कर चंदावरकरांनी आपल्या पस्तीस सहकाऱ्यांच्या साहाय्याने 'नक्षत्रांचे देणे' हा वैशिष्टयपूर्ण कार्यक्रम सादर केला. कै. आरती प्रभूंच्या काही निवडक कविता या कार्यक्रमामध्ये सादर केल्या. या कार्यक्रमाने श्रोत्यांना हा एक निराळा अनुभव नक्कीच दिला.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील मराठी काव्य म्हटल्यावर सर्वच काव्य 'गेय' असणं शक्यच नसतं. कारण आता कवींनी रचनापद्धतीपेक्षा आविष्काराला अधिक महत्त्व दिलेलं आहे. त्यामुळे कै. खानोलकरांच्या या कविता श्रोत्यांसमोर ठेवताना चंदावरकरांना बरीच कसरत करावी लागली. कारण ध्वनीच्या संगीतापेक्षा शब्दांचं आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या अर्थाचं संगीत श्रोत्यांच्या हृदयापर्यंत पोचवणं ही बाब अधिकच कठीण. अर्थात ज्या कविता चालीत बांधण्यास योग्य होत्या त्यांना तशा तऱ्हेने सादर करण्यात चंदावरकरांनी कसूर केली नाही. पण असं करत असताना बऱ्याच वेळा कविता या तालातच अडकून पडण्याची, तिचं स्वतंत्र अस्तित्व आणि निराळा आविष्कार गमावून बसण्याची आणि शब्दांपेक्षा तालाचंच वर्चस्व अधिक निर्माण होण्याची दाट भीती असते. चंदावरकरांनी तो धोका उत्कृष्टपणे टाळला. त्यामुळे कविता श्रोत्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यास निश्चितच मदत झाली. अर्थात यामध्ये कविता प्रत्यक्ष म्हणणाऱ्या किंवा गाणाऱ्या गायक-गायिकांनीही फार मोलाची कामगिरी बजावली. अमोल-अनुया पालेकर आणि मोहन गोखले यांचा त्यादृष्टीने प्रथम उल्लेख केला पाहिजे. कारण या तिघांनीही सादर केलेल्या बहुतेक कविता 'गद्य काव्य' या स्वरूपाच्या होत्या. त्यामुळे त्यांना कोणतीही चाल नव्हती. अशा वेळी, सारी भिस्त शब्दांचा उच्चार आणि फेक यांवरच ठेवावी लागते. या तिघांही कलाकारांनी आपल्या सामर्थ्याचा पुरेपूर उपयोग करून, खानोलकरांच्या कविता श्रोत्यांपर्यंत मोठ्या यशस्वीपणे नेऊन पोचवल्या. मोहन गोखलेने म्हटलेल्या, 'प्रेम हवय का' या कवितेचं ?'; 'शेजारीचा नाला', 'येता पावसाळा' आणि 'सप्रेम द्या निरोप' या कविता त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. अमोल पालेकरांनी 'ही दोन बकरीची पोरे' 'इथले सगळे दिवे विझून जातात' या दोन कविता आणि अनुया पालेकरची 'रिमझिम गावी', 'वळणावर रस्ता येतो' आणि 'ओंजळीत कोमेजलेली तरी फुलं असायला हवी होती' या कविता फारच परिणामकारक वाटल्या. याबरोबरच माधुरी पुरंदरेनेही फार उत्कृष्टपणे कविता म्हटल्या. तिने म्हटलेल्या 'हार-जितींच्या दुव्यांची' या कवितेने श्रोत्यांना ताल धरायला लावला. अनुराधा गोडबोलेने म्हटलेली 'तेव्हा मलाच माझा' ही कविता, रंजना पेठेने म्हटलेली 'लवलव करी पानं' नरेन्द्र पटवर्धनाची 'थोर जोंधळयाची पानं' आणि श्रीकान्त पारगावकरांनी म्हटलेली 'मृत्यूंत कोणी हासे' या कविताही परिणामकारक होत्या. पण पारगावकरांनी ही कविता म्हणताना हावभाव थोडे कमी केले तर ती अधिक परिणामकारक होईल असं वाटतं. त्या दृष्टीने रविंद्र साठेने म्हटलेल्या कविता उल्लेखनीय आहेत. 'भुईवर आली सर', 'कुणासाठी कुणासाठी', 'सेवेकरी मुद्रा असो नये बाशी' ही समूहगीतेही उत्कृष्टपणे म्हटली गेली. फक्त 'सेवेकरी मुद्रा' या गीताच्या वेळी स्टेजवर पुढील बाजूस, कोपऱ्यात मोहन गोखले व श्रीराम पेंडसे जे हाव-भाव करीत राहतात त्यामुळे श्रोत्यांचं चित्त विचलित होण्याची शक्यता आहे, पण चंद्रकांत काळेने ही कविता म्हटली फारच छान !

रंगमंच सजावट करताना वापरलेली प्रतीकं ( symbols ) प्रभावी होती. स्टेजवर डाव्या बाजूच्या कोपऱ्यात एक हिरव्यागार पानांचं झाड उभं केलं होतं तर, उजव्या बाजूच्या कोपऱ्यात एक मानवी कवटी होती. ही दोन्ही प्रतीकं अनुक्रमे जीवन आणि मृत्यूची निदर्शक होती. स्टेजच्या मध्यभागी घड्याळाच्या आकाराचा पडदा होता. त्यावर कवितेला अनुरूप अशा 'स्लाईडस्' प्रोजेक्टरच्या मदतीनं टाकल्या जात होत्या. हे प्रतीक सामान्य माणसाच्या चाकोरीबद्ध जीवनाचं निदर्शक होतं. कविता म्हणताना त्यांचा विषय लक्षात घेऊन, या तीन प्रतीकांच्या पार्श्वभूमीवर त्या म्हटल्या गेल्या. त्यामुळे कवितांचा 'इफेक्ट' वाढण्यास निश्चितच मदत झाली. त्यादृष्टीने रंगमंचावरील हालचालीही उल्लेखनीय आहेत. सर्व कलाकारांचे चोख पाठांतर ( अगदी, पाठांतर केलं आहे असंसुद्धा वाटू नये इतकं चोख ) ही या कार्यक्रमाच्या जमेची एक फार मोठी बाजू. ससंदर्भ आणि सुसंघ असो, नाटयसंवादही पाठ नसण्याचे दुर्दैवी अनुभव व्यावसायिक नाटकं पाहताना येतो. पार्श्वभूमीवर कुठलाही पुढला-मागला संदर्भ नसताना, एकही शब्द बदलण्याची ( नैतिक ) परवानगी नसताना जोंधळयाच्या लाह्याप्रमाणे शब्द जेव्हा तडातडा फुटत जातात तेव्हा एक आगळीच मजा येते.

सर्वसाधारणपणे, कुठल्याही कलाकृतीचं रसग्रहण करताना त्या कलेचा आणि कलाकारांचाच विचार केला जातो. पण तिचा आस्वाद घेणाऱ्या प्रेक्षकांचा किंवा श्रोत्यांचा विचार केला जात नाही. (काही वेळा एखाद्या ड्रॅक्यूलाच्या चित्रपटाच्या जाहिरातीत- 'कमकुवत मनाच्या माणसांनी हा चित्रपट पाहू नये'- अशी तळटीप असते, पण तीही अधिक गर्दी खेचण्याच्या हेतूनेच

तेव्हढीच. ) पण हा कार्यक्रमच असा वैशिष्टय-पूर्ण होता की, येथील श्रोत्यांकडूनही कार्यक्रम रंगण्याच्या दृष्टीने एक विशिष्ट पातळी अपेक्षित आहे. या प्रयोगानंतर काही श्रोत्याकडून अशी एक बारीकशी तक्रार ऐकू आली की, काही कवितांचे शब्द नीट कळत नाहीत. एक-दोन प्रसंगी तसं झालंही. उदा. जेव्हा कोरसच्या पार्श्वभूमीवर 'अल्याड कोठे, पल्याड कोठे' म्हटली गेली तेव्हा; पण याचबरोबर येणाऱ्या श्रोत्यांनीही रात्रीच्या वेळी, मनोरंजनासाठी एखादं कौटुंबिक जिव्हाळ्याचं धातुर-मातुर नाटक पान चघळत पाहायला आल्याच्या थाटात येऊ नये. खानोलकरांच्या कविता त्यांनी वाचल्या असतील तर उत्तमच, पण किमानपक्षी एकदा कार्यक्रम सुरू झाल्यावर तो एकाग्र चित्ताने, त्याच्याशी एकरूप होऊन ऐकण्याची तयारी त्यांनी दाखवली पाहिजे. कारण हा सबंध कार्यक्रमच एका वेगळ्या पातळीवरील आहे.

हा कार्यक्रम करण्याचं धाडस दाखवलं आणि तो यशस्वी केला याबद्दल पं. भास्कर चंदावरकर, आणि त्यांचे सहकारी मीना चंदावरकर निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. हाच कार्यक्रम ८ मेला मुंबईमध्ये 'साहित्य' संघात होणार आहे व १० तारखेला पुण्यातही होणार आहे. याचे असे आणखीही अनेक प्रयोग होतील, पण त्या प्रत्येक कार्यक्रयाच्या वेळी अशा तऱ्हेने शब्दार्थांच्या अलौकिक विश्वात नेऊन भावनांच्या गुंत्यामध्ये जखडवून टाकणाऱ्या किमयागार आरती प्रभूंची स्मृती मराठी काव्यरसिकांच्या हृदयात जागी झाल्याशिवाय राहणार नाही. □

## अवती-भवती : पृष्ठ ७ वरून

इंदिरा अमदानीमध्ये निवडणुकांची सारी जबाबदारी इंदिराजी उचलत असत. पण आता परिस्थिती बदलली आहे. पक्षाला बाईंवर मोठा भार टाकता येणार नाही. त्यातून ज्या नऊ राज्यांतून या निवडणुका होणार, त्या नऊ राज्यांत इंदिराजींना आता कोणतेही स्थान नाही. आपली सर्व शक्ती पणाला लावून, उत्तर प्रदेश, बिहारसारख्या राज्यांतून दोन-दोन दौरे करूनही ज्या नऊ राज्यांत विधानसभांच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत, तेथे असलेल्या एकूण ३०० जागांपैकी कांग्रेसला केवळ नऊ जागा मिळाल्या. या दारुण पराभवाची जबाबदारी स्वतःच्या शिरावर मिरवत बाई कोणत्या तोंडाने फिरणार ? आणि फिरल्या तरी त्यांचे तेज काय फाकणार ? पक्षाचे हंगामी अध्यक्षपद भुषवणारे स्वर्णसिंग ए. आय. सी. सी. अधिवेशनामध्ये त्याच जागी कायम होतील. कारण ज्याच्या नावाबाबत तडजोड होऊ शकेल असा हा एकमेव नेता आहे. हा संघटनेचा मनुष्य नाही, अशी तक्रार त्यांच्याबाबत केली जाते. पण ज्याला संघटनेमध्ये स्थान असलेला नेता म्हणता येईल, असा प्रमुख नेता लोकसभेमधील विरोधी पक्षाच्या नेतेपदी विराजमान आहे. आणि अध्यक्षपदाची माळ त्याच्याच गळ्यात घातली, तर, पुन्हा सत्तेच्या केंद्रिकरणाच्या प्रक्रियेस प्रारंभ होतो. त्यातून स्वतः चव्हाणांनाही दोन्ही पदे सांभाळण्यात रस नाही. विरोधी पक्षाचा नेता म्हणून संसदीय कांग्रेस पक्षाचे नेतृत्व करणे त्यांना जास्त पसंत आहे. गृहामध्ये पक्षाचा नेता म्हणून काम करत असतानाच पक्षीय यंत्रणेवर पुरेसा ताबा ठेवणे त्यांना बदललेल्या परिस्थितीमध्ये सहज शक्य आहे. पक्षाचा अध्यक्ष दुसरा असला तर चालेल, पण गृहामधील पक्षाचे नेतेपद ते आता सोडणार नाहीत. पक्षाची पुनर्बांधणी करत असतानाच वयाच्या एक्क्याऐंशिव्या वर्षी मोरारजीभाई पंतप्रधान होऊ शकतात, ही वस्तुस्थिती त्यांच्या डोक्यात असणारच. संधीची वाट पाहत शांतपणे 'पेशन्स'चा डाव खेळणारा त्यांच्यासारखा नेता शोधून सापडणार नाही.

### प्रचार धोरण

निवडणुकांमधील सभांमधून कांग्रेस नेते सांगणार काय ? हाही एक मोठाच प्रश्न आहे. 'विधानसभा बरखास्त करून निवडणुका घेण्याच्या जनता पक्षाच्या निर्णयावर कठोर टीका हेच निवडणूक प्रचारामधील प्रमुख सूत्र राहील, असा अंदाज आहे. पण एक तर नानी पालखीवाला, एच. एम. सिरवाई, एम. सी. छागला, माजी कायदा मंत्री ए. के. सेन, यांसारख्या घटनात्मक प्रश्नावर अधिकारी समजल्या जाणाऱ्या व्यक्तींनी केंद्र शासनाच्या निर्णयाचा पाठपुरावा केला आहे. खेरीज जयप्रकाश नारायण, आचार्य कृपलानी, यांसारख्या सत्तास्थानापासून दूर असलेल्या राष्ट्रीय नेत्यांनीही केंद्रशासनाच्या धोरणाचा पाठपुरावा केला आहे. अर्थात जनता पक्षाचे प्रेरणास्थान म्हणूनच या नेत्यांचा निर्देश होतो, हे खरे असले तरी, पक्षीय मर्यादांच्या चौकटीमध्ये त्यांच्या विधानांचे मूल्यमापन केले जात नाही. अर्थात असे जरी असले तरी, या निवडणुका घेता याव्यात म्हणून केंद्र शासनाने विधानसभा बरखास्त करून घटनेची पायमल्ली केली, इतकेच नव्हे तर, लोकसभा निवडणुकांपूर्वी जनता पक्षाने आपल्या जाहीरनाम्यामध्ये जी आश्वासने दिली होती, त्याचीही पायमल्ली केली जात आहे, असा ओरडाही कांग्रेस पक्ष करील. नव्हे तसा तो करावाच लागेल. जनता पक्षाच्या लोकसभा निवडणुकांमधील जाहीरनाम्याचे सातवे कलम म्हणते की, घटनेच्या तीनशे छपन्नाव्या कलमाप्रमाणे राज्यांमध्ये राष्ट्रपतींची राजवट लादण्याच्या निर्णयाचा दुरुपयोग केला जाणार नाही. इतकेच नव्हे तर, तसे अन्य कोणाला करता येऊ नये, यासाठी योग्य त्या दुरुस्त्या करण्यात येतील. असे आश्वासन देणाऱ्या पक्षाच्या गृहमंत्र्यांनी लेखणीच्या एका फटकाऱ्याने नऊ विधानसभा प्राण्यात घातल्या आहेत, या गोष्टीचा पुरेपूर फायदा कांग्रेस पक्ष घेईल. त्यासाठी बी. सी. कांबळे यांच्यासारखे जनता पक्षाचे खासदार जाहीर सभांमधून सल्ले देत आहेत, त्याचाही वापर केला जाईल. जॉर्ज फर्नांडिस यांच्यावरील खटला काढून घेतला, त्यावर टीका होईल. परदेश दौऱ्यावर असणारे अर्थमंत्री श्री. पटेल कॉंकर्ड विमानसेवेचा वापर करतात, यासारखी उदाहरणे घोळवून घोळवून सांगितली जातील. वाढत्या महागाईचा भस्मासूर जनतेला कसा त्रस्त करत आहे,

याची रसभरित वर्णने केली जातील आणि त्याचबरोबर किमान बोनस सुरू करावा, सक्तीची बचत योजना रद्द करून, या योजनेप्रमाणे जमा झालेली सर्व रक्कम कर्मचाऱ्यांना व्याजासुद्धा रोख रकमेच्या स्वरूपामध्ये परत करावी, असा आग्रह धरला जाईल. आता तिजोरी सांभाळण्याची जबाबदारी जनता पक्षाकडे असल्याने या मागण्यांबावत काँग्रेसला नेट धरता येईल. सुब्रह्मण्यमस्वामींसारख्या खासदारांनी केलेल्या काही उथळ विधानांचा खरपूस समाचार घेतला जाईल. आणि इतके करत असतानाच पक्ष सोडून जाणाऱ्या मंडळींना कसे थांबवायचे, या विवंचनेलाही तोंड द्यावे लागेल.

## जनता पक्ष व निवडणुका

हवा जनता पक्षाची–जिथे निवडणुका होणार तेथे जनता पक्षाने लोकसभा निवडणुकांमध्ये अती प्रचंड विजय मिळवलेला, घटक पक्षांचे पूर्ण विलिनीकरण होऊन परिपूर्ण एकजिनसी पक्ष म्हणून जनतेसमोर जाता येत असल्याने निर्माण होणारा विश्वास, उत्तम युक्तिवाद करणारे असंख्य प्रभावी नेते, असे सारे अनुकूल दान संगती घेऊन विधानसभांमधील जागांसाठी मते मागणाऱ्या या पक्षाला अर्थातच विधानसभा बरखास्त करणे कसे न्याय होते, हे पटवून सांगावे लागेल. हे सांगण्याची कुवत आणि कौशल्य असलेले असंख्य नेते पक्षाजवळ आहेत. विधानसभा बरखास्तीबाबत वा अन्य मुद्द्यांवर काँग्रेसकडून होणाऱ्या टिका-टिपणीला उत्तर देणे जनता पक्षाला मुळीच कठीण नाही. पक्ष सत्ताधारी असल्याने निवडणूक निधीबावत अडचणी येणार नाहीत. अंतर्गत राजकीय पक्ष, देशाला त्रस्त करणारे आर्थिक प्रश्न, ते सोडवण्याबाबतच्या अडचणी यांना तोंड देत निवडणुकांना सामोरे जाणे जनता पक्षाला फारसे जड जाणार नाही.

जनता पक्षाचे कुंकू साऱ्यांनीच कपाळी लावले असले तरी, त्यामागे दडलेला पक्षीय विचारसरणीचा आणि आपल्या आणि आपल्या साथीदारांचे भले करण्याच्या वृत्तीचा विचार तिकीट-वाटपाच्या वेळी पुन्हा एकदा वळावणार आहे. केंद्रिय मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेट दर्जाचे आणखी दोन ते तीन मंत्री घेतले जातील, त्या वेळी तर राज्यमंत्र्यांच्या दुसऱ्या स्तराची निवड होईल त्या वेळीही घटक पक्ष आणि त्यांचा सत्तेतील वाटा हा विचार राहणारच. नवनिर्मित जनता पक्षाला वाहिलेली नवी पिढी येईपर्यंत ही मागची खरकटी चांगलाच पाठपुरावा करणार आहे. विधानसभा निवडणुकांच्या वेळी मार्क्सवादी, कम्युनिस्ट (विशेषतः पश्चिम बंगालबाबत) यांच्याशी तडजोड करताना प्रथम एक राहून, संघर्ष करून त्यांच्या पदरी कमीतकमी जागा टाकायच्या आणि मग अंतर्गत भांडणे झुंजवत बसायचे, असे हे तिकीट–राजकारण येत्या आठ-पंधरा दिवसांमध्ये चांगलेच फोफावणार आहे. मद्रासमध्ये मैत्री कोणाशी करायची ते ठरवावे लागणार आहे. स्वतःची प्रतिमा सांभाळून येऊ घातलेल्या सत्तास्थानांची खिरापत जनता पक्ष आणि त्यांचे मित्र पक्ष कशा प्रकारे वाटून घेतात, याला फार महत्त्व आहे. आर्थिक आघाडीवरील सगळ्यांत मोठा प्रश्न अर्थातच सक्तीच्या बचत योजनेबाबतचा आहे. लोकसभा निवडणुकांच्या सभा गाजवताना अटलजी, स्वामी, जेठमलानी यांसारख्या नेत्यांनी सक्तीची बचत योजना रद्द करू, असे आश्वासन दिले आहे. दिल्लीहून येणाऱ्या वार्तांप्रमाणे महामंत्र्यांमार्फत अर्थखाते सांभाळणारे पटेल आणि स्वतः महामंत्री ही सक्तीची बचत योजना रद्द करण्याच्या विरुद्ध आहेत. येणाऱ्या निवडणुका आणि सक्तीची बचत योजना यांचे मतांच्या फार मोठ्या गठ्ठ्यांशी साटेलोटे आहे. आर्थिक परिणामाचा विचार बाजूस ठेवून याबाबतचा निर्णय शासनाला घ्यावा लागेल. जुनी आश्वासने, आणि लोकांच्या-विशेषतः शासकीय कर्मचाऱ्यांच्या याबाबतच्या अपेक्षा लक्षात घेऊनच हा निर्णय घ्यावा लागेल. गोठवलेली रक्कम कशी द्यायची, याबाबत कर्मचारी थोडेफार नरमाईचे धोरण स्वीकारतील. परंतु या योजनेची येत्या जुलैमध्ये संपत असलेली मुदत वाढवली गेली तर, कर्मचारी असंतुष्ट होतील. आणि ही असली असंतुष्टता निवडणुकीच्या तोंडावर निर्माण करणे परवडण्यासारखे नाही. म्हणजेच कर्मचाऱ्यांना अनुकल असा निर्णय घेऊन मते निश्चित केली जातील, असे दिसते. वाढीव महागाईभत्त्याची जी निम्मी रक्कम सरकारी तिजोरीत जमा होते, ती मोकळी सुटताच १३० कोटी रुपयांची रक्कम बाजारपेठ शोधत बाहेर पडेल. अर्थव्यवस्थेवर त्याचा ताण पडणारच. खेरीज अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये जो अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे, त्यात ही रक्कम सरकारला वापरावयास मिळेल, असे गृहित धरून आखणी केली जात होती. आता बदललेल्या परिस्थितीमध्ये ही रक्कम लाखो कर्मचाऱ्यांमार्फत बाजारात येणार ही कटू वस्तुस्थिती पचवून अर्थमंत्र्यांना अर्थसंकल्पावर अखेरचा हात फिरवावा लागेल असे दिसते. निवडणुकांचे राजकारण ज्यांना खेळायचे असते, त्यांना अशा परिस्थितीला तोंड द्यावेच लागते. लोकशाही राज्यव्यवस्थेचाच तो एक स्थायीभाव आहे. लोकसभा निवडणुकीमुळे निर्माण झालेले धुळीचे लोट जरा कोठे विरून जात आहेत, तोच नऊ राज्यांत मतांचा जोगवा मागत असंख्य जीपगाड्या पुन्हा एकदा फिरणार आणि वाद–प्रतिवादांच्या नौबतींनी वातावरण पुन्हा एकदा ढवळून निघणार हे आता निश्चित झाले आहे. □

## □ राष्ट्रपतींचे निधन आणि शंकांची वावटळ

मरहूम राष्ट्रपती फकरुद्दिन अली अहमद हे नेमके कोणत्या परिस्थितीमध्ये वारले, याबाबत असंख्य अफवा पसरल्या आहेत. खऱ्या गोष्टींचे खमंग मिश्रण करून हे वृत्त दिले जात आहे–ऐकले जात आहे. राष्ट्रपतींच्या निधनानंतर त्यांच्या बेगम काही खळबळजनक निवेदन करणार असे जे वृत्त होते, तेही लोक अद्यापी विसरलेले नाहीत. मुंबईहून निघणाऱ्या 'फॉर यू' या इंग्रजी पाक्षिकाने याबाबतची तपशीलवार हकीगत दिली असून सत्ताधारी असलेल्या जनता पक्षाने आणि अहमदसाहेबांच्या कुटुंबियांनी खुलासा करून याबाबतच्या शंका–कुशंकांवर पडदा टाकावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

राष्ट्रपती फकरुद्दिन अली अहमद यांचे ११ फेब्रुवारी १९७७ रोजी सकाळी आठ वाजून बावन्न मिनिटांनी निधन झाल्याचे

अधिकृत वृत्त आहे. मलेशियाच्या आपल्या दौऱ्यामधील एक दिवसाचे कार्यक्रम रद्द करून राजधानी गाठणाऱ्या राष्ट्रपतींनी आपली अखेरची रात्र कशी घालवली याबाबतच्या अनेक सुरस आणि चमत्कारिक कथा प्रसृत झालेल्या आहेत. आजारी अवस्थेमध्ये परत आलेले वृद्ध राष्ट्रपती, कोणाचीही मदत न घेता विमानापासून, ते त्यांच्यासाठी सिद्ध असलेल्या मोटारीपर्यंत स्वतः चालत आले. राष्ट्रपती भवनामध्ये वैद्यकीय मदतीची अत्युत्कृष्ट व्यवस्था असल्याने राष्ट्रपतींना हॉस्पिटलमध्ये नेण्याऐवजी सरळ राष्ट्रपतीभवनातच नेण्यात आले, हा खुलासा पाहण्यासारखा आहे. राष्ट्रपतीभवनामध्ये आल्यावर राष्ट्रपतींनी कुटुंबियांसमवेत खाना घेतला. त्यांची तब्येत सर्वसाधारणपणे समाधानकारक दिसत होती. आता असे सांगितले जाते की, प्रवासातून दमून आलेल्या, वृद्ध आणि आजारी अशा राष्ट्रपतींची भेट घेण्यासाठी संजय गांधी, इंदिरा गांधी व बन्सीलाल राष्ट्रपतिभवनावर आले होते. गंभीर स्वरूपाच्या राष्ट्रीय प्रश्नावर त्यांनी राष्ट्रपतींशी दीर्घकाळ चर्चा केली. वैद्यकीय सल्लागारांनी या सल्लामसलतीला का आणि कशी परवानगी दिली, हा एक प्रश्नच आहे! असा सल्ला धुडकावून लावून हे त्रिकूट राष्ट्रपतींशी सल्लामसलत करण्याचे निमित्त करून लष्करी कायदा पुकारण्याबाबत त्यांच्यावर दडपण आणत होते काय, हा खरा प्रश्न आहे. असेही सांगितले जाते की, लष्करी राजवट आणण्याच्या वटहुकुमावर राष्ट्रपतींनी सही करावी, यासाठी प्रचंड दडपण आणले गेले. राष्ट्रपतींनी या दडपणास कठोर प्रतिकार केल्यावर त्यांच्याबरोबर काही धांदगाईचे वर्तन केल्याचेही बोलले जाते. त्या वेळचे संरक्षणमंत्री बन्सीलालजी यांनी राष्ट्रपतींना धक्का दिला आणि सांगितले, 'जर बहेनजी सही करा असे म्हणतात तर तुम्ही सही का करत नाही?' शेजारीच असलेल्या अबिदा बेगम यांनी संरक्षणमंत्र्यांना तुम्ही राष्ट्रपतींशी अशा प्रकारचे वर्तन करू शकणार नाही, याची जाणीव दिली आणि ताबडतोब राष्ट्रपतिभवन सोडून जाण्याचा सल्ला दिला. त्यावर बरीच बाचाबाची झाली. संजय गांधी यांनी वापरलेल्या उद्धट भाषेमुळे राष्ट्रपती संतापले आणि त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

या साऱ्या गोष्टींचा राष्ट्रपतींच्या आधीच खालावलेल्या प्रकृतीवर ताण पडला आणि त्यामुळे त्यांचे निधन झाले. राष्ट्रपतींच्या निधनाची अधिकृत वेळ सकाळी आठ वाजून बावन्न मिनिटांची असल्याचे त्या वेळच्या सरकारने घोषित केले असले तरी प्रत्यक्षामध्ये–राष्ट्रपती १० फेब्रुवारीच्या रात्री २ वाजून ३० मिनिटांनी निधन पावल्याचे बोलले जाते.

राष्ट्रपती आजारी असल्याचे घोषित केल्यावरही त्यांचे वय आणि त्यांचा आजार यांचे पुरेसे गांभीर्य लक्षात न घेता, सर्वकाही अलबेल असल्याचा देखावा निर्माण केला गेला. त्यांच्या वैद्यकीय सल्लागारांचे सल्ले धुडकावले गेले, कुटुंबियांना हेतुतः अंधारात ठेवण्याचे प्रयत्न झाले, असे आरोपही केले जातात.

राष्ट्रपतींचे नैसर्गिक निधन ही वादाची गोष्ट व्हावी, ही दुर्दैवी बाब मानावी लागेल. आणि या संदर्भातील वावड्या, आणि लोकांच्या मनामध्ये असलेल्या शंकाकुशंका दूर व्हायच्या असतील तर, या साऱ्या प्रकाराची परिपूर्ण चौकशी करून जनतेने ज्यांच्यावर विश्वास टाकला आहे, अशा नवशासनाने या प्रकाराची चौकशी करून खरी वस्तुस्थिती जनतेसमोर ठेवणे अगत्याचे आहे. तसेच राष्ट्रपतींचे निधन ही विवाद्य गोष्ट ठरू नये, यासाठी मरहूम राष्ट्रपतींच्या कुटुंबियांनीही याबाबतची त्यांना ज्ञात असलेली सारी माहिती मरहूम राष्ट्रपतींच्या पत्नी अबिदा बेगम यांनी जनतेसमोर ठेवणे अगत्याचे आहे, तरच या दुर्दैवी घटनेबाबत उठत असलेले साद-पडसाद थंडावतील. □


☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

□ **सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ **टॉलस्टॉय एक माणूस**
सुमती देवस्थळे

□ **श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर

□ **शतपावली**
रवींद्र पिंगे

□ **पुरंदऱ्यांची दौलत**

□ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो पुरंदरे

☆ ☆

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजरातेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १५ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १६ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १७ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १८ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| १९ | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २० | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |
| २१ | लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २० – ०० |

आगामी

| | |
|---|---|
| प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे/श्री. ग. माजगावकर |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे |
| सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आ.) |
| संध्याकाळ | गजानन जागीरदार (दु. आ.) |
| शतपावली | रवींद्र पिंगे (दु. आ.) |
| टॉलस्टॉय-एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आ.) |
| मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**७।५।७७ ते १३।५।७७**

**मेष : नोकरीत मान**

शत्रूस्थानी राहू आल्यापासून तुमच्या विरुद्धची कटकारस्थाने आता थांबली आहेत. कारण हा राहू तुमच्या विरोधकांचे डाव उधळून लावणार आहे. शत्रू, मग तो घरचा असो की बाहेरचा असो, तो आता तुमचे काही वाकडे करू शकणार नाही. तुम्ही स्वतंत्र धंदा करणार असाल तर, त्यासाठी बरीच अनुकूलता आहे. सहकार्य मिळेल. दूरच्या प्रवासाचे बेत सध्या करू नका. वाहन खरेदी विक्री फायदेशीर होईल. नातेवाईक व मित्रपरिवार यांच्या पाहुणचाराने मात्र घर नकोसे होणार आहे. रेस व लॉटरीत फायदेशीर असे काहीसरी होईल. नोकरीत–बदलीत–बढती होण्याचा संभव आहे. नोकरीत ज्यांना शाश्वती नसेल त्यांच्या बाबतीत अनुकूल घडणार आहे, बेकारांना केवळ आश्वासन मिळेल. पण शुभकारक घडेल. शुभ दिनांक ८–११

महिलांना : इतरांबरोबर श्रीमंतीची तुलना करून मनस्थिती बिघडून घेऊ नका.

विद्यार्थ्यांना : यश आनंद मिळेल.

**वृषभ : प्रगतीकडे वाटचाल**

तुम्ही असमाधानी राहावे अशी आता तुमची वाईट परिस्थिती नाही. यश नाही, मार्ग सापडत नाही, असे जे घडत होते ते आता बंद झाले आहे. गुरू राशीत आल्यापासूनच तुमच्या प्रगतीचा मार्ग खुला झाला आहे. तिसरा शनी तुम्हांला नवी नवी क्षेत्रे शोधण्यास मदत करणार आहे. जे तुम्ही कराल त्यात यश आहे एवढे नक्की समजा. बौद्धिक व कलाक्षेत्रात तुम्ही आता नवे विक्रम करू शकाल. नोकरीत पुढे पाऊल पडेल. मनोरथ पुरे होतील. अनेक लाभ दृष्टिपथात येतील. साऱ्या अडचणी कमी होतील. पैसा कसा मिळेल ही काळजी आता करू नका. व्यवसायात आता कोणत्याच अडचणी राहणार नाहीत. नवे तेज व नव्या कल्पना यामुळे प्रगतीची घोडदौड सुरू होणार आहे. शुभ दिनांक ८–१०.

महिलांना : घरात मंगलकार्य घडू शकेल.

विद्यार्थ्यांना : बुद्धीला नवे क्षेत्र उपलब्ध होईल.

**मिथुन : अडचणीतून मार्ग**

साडेसातीची आता तुम्ही मुळीच काळजी करू नका. साडेसातीचे शेवटचे पर्व सुरू आहे. हा शनी तुमचे आता काही वाईट करणार नाही. तरीपण गुरू बारावा झाला आहे. राहू चौथा झाला आहे. मनात साशंकता निर्माण होऊ शकेल व मधून मधून मन उद्विग्न होऊ शकेल. घर – स्थावर हा प्रश्न काहीसा अडचण निर्माण करण्याचा संभव आहे. पण यामुळे तुम्ही चिंता मात्र करण्याचे मुळीच कारण नाही. मार्ग अडचणीतून जाणारा असला तरी त्यातून तुम्ही बाहेर पडाल याची खात्री बाळगा. व्यवसाय प्रगतीकडे जाईल. नोकरीत काळजीपूर्वक काम केले तर, वरिष्ठांकडून तुम्हाला त्रास होणार नाही. बेकारांना आश्वासन मिळेल. व्यवसायात नवे धाडस करू नका. पण व्यापार व इतर धंदा व्यवस्थित चालेल. आर्थिक बाजू निभावून नेईल. शुभ दिनांक १०–११.

महिलांना : नोकरीत साहानुभूती व मर्जीचा अनुभव येईल.

विद्यार्थ्यांना : वाङमयीन शिक्षण अवश्य घ्या.

**कर्क : मित्राकडून मदत**

गुरू हा एकच ग्रह तुम्हाला अकरावा असताना तुम्ही चिंतातूर राहून उपयोग काय ? आता तुमच्या प्रगतीचा मार्ग एकदम खुला झाला आहे. मित्राची मदत मिळेल. उच्चपदस्थ किंवा परदेशात मोठ्या हुद्यावर असलेल्या एखाद्या व्यक्तीकडून तुम्हाला मदत मिळणार आहे. ती फारच उपकारक होईल. नोकरीत बदल होण्याची चाहूल लागेल. हा बदल आगामी भविष्यकाळात तुमचा मोठेपणा वाढवणारा व तुमचं कर्तृत्व उजळवणारा असेल. सध्याच्या नोकरीदेखील अडचणीतून बाहेर पडाल. वरिष्ठांचा जाच कमी होईल.


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरु झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**BHARAT AYURVEDASHRAM ( M ) P. O. KATRI SARAI ( GAYA )**

ते एकतर बदलून तरी जातील किंवा सोडून तरी जातील. तुम्ही एखादा स्वतंत्र धंदा सुरू करणार असाल तर हरकत नाही. तुमच्या-पैकी जे कुणी लग्नाचे असतील त्यांचे शुभ-मंगल होणार आहे. घरात नवा संसार होणार आहे. ज्यांच्या संसारात अडचणी असतील त्यांचे संसारही अडचणींवर मात करून पुढे जातील. एकूण यश व समाधान देणारा काळ आहे. शुभ दिनांक, ७-९.

महिलांना : नोकरीत बढती व प्रमोशन मिळणार आहे.

विद्यार्थ्यांना : परिक्षेत अनपेक्षित यश मिळणार आहे.

## सिंह : समाधान मिळेल

गेल्या आठवड्यात राहू दुसरा झाला आहे. राहू जरी तसा वाईट नसला तरी, धनस्थान व कुटुंबस्थान त्याने दुषित केले आहे. त्यामुळे तुमचा एकंदर मार्ग गुलाबांच्या फुलांचा नाही हे तुमच्या लक्षात यावे असे असले तरी, आठवडा प्रगतीला बाधक नाही. गेल्यापेक्षा तुमचे पाऊल पुढे पडणार आहे. रवी हा राशिस्वामी भाग्यस्थानी आहे. तो राजकारणाचा कारक आहे. तुमचा पिंड राजकारणी आहे. पण यावेळी तुमच्या पदरात फारसे काही पडेल असे वाटत नाही. प्रवासात नव्या ओळखी होतील. प्रवास सुखकारक होईल. परदेशी प्रवासाचा योग आहे. नोकरीची स्थिती आहे तशी राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. ते तुमचा सल्ला मानतील पण तुमच्या मागण्या मात्र मंजूर होतीलच अशी खात्री बाळगू नका.

शुभ दिनांक ८-११.

महिलांना : नोकरीत कामाचा ताण फारसा पडणार नाही.

विद्यार्थ्यांना : ठरवलेले बेत तडीस जातील.

## कन्या : घाईगर्दीचा काळ

राशीत राहू आला आहे तो फारसा वाईट जाणार नाही. परंतु सातवा केतू अजून मंगळाच्या सहवासात आहे, त्यामुळे घरगुती वातावरणात कटकटी राहणार आहेत. फारशी काळजी करण्यासारखे काही नसेल परंतु अनपेक्षित आजार, पत्नीला त्रास असे काही तरी निर्माण होणार नाही असे मात्र नाही. भाग्यस्थानी सुदैवाने गुरूसारखा ग्रह विराजमान झाला आहे. त्यामुळे कोणतीच वाईट गोष्ट तो मर्यादेबाहेर जाऊ देणार नाही. इत्यर्थ एवढाच की, सावधपणे राहावे. आठवडा कामाची घाईगर्दी वाढवणारा आहे. कौटुंबिक नव्या समस्या सुरळीत सुटतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. प्रवास रद्द करावा लागेल. खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल. बेकारांना नोकरीची हमी मिळेल. मासिक येणे वसुल होणे जरा कठीण आहे.

शुभ दिनांक ७-९.

महिलांना : सर्व प्रकारची काळजी दूर होईल. प्रश्न सुटतील.

विद्यार्थ्यांना : शिक्षणात पाऊल प्रगतीकडे पडेल.

## तूळ : अनपेक्षित खर्च

अंतरिक्षातील सर्व राशीत ज्या राशी गेले काही काळ आघाडीवर होत्या त्यांत तुमची रास होती. परंतु ती आघाडी आता मात्र राहीलच अशी खात्री बाळगून चालू नका. कारण गेल्याच आठवड्यात राहू बारावा झाला आहे. अनपेक्षित व चमत्कारिक घटना घडवणे हे राहूचे कार्य असते. त्यामुळे या बाराव्या राहूबद्दल तुम्हाला सावध राहावे लागेल. अर्थात तुम्ही खचून जाण्याचे कारण नाही. अनपेक्षित एकदम मोठा खर्च हे राहूचे मोठे कृत्य ठरेल अशी भीती वाटते. स्वतः



लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये

वाहन हाकणारांनी वेगावर नियंत्रण ठेवणे, तसेच स्वत:च्या पत्नीखेरीज दुसऱ्या कुठल्या स्त्रीच्या आहारी जाऊ नका. नोकरीत काम वाढणार आहे. पूर्वी दिलेली आश्वासने वरिष्ठांकडून फारशी पाळली जातीलच अशी खात्री बाळगू नका. शुभदिनांक १०–१२.

**महिलांना :** उद्योग व्यवसायांत शुभकारक घटना घडू शकतील.

**विद्यार्थ्यांना :** प्रयत्नावर भर देणे आवश्यक आहे.

## वृश्चिक : महत्त्व वाढेल

बाराव्या राहूच्या त्रासापासून तुम्ही मोकळे झाला आहात. खरे म्हणजे तुमच्या बाबतीत अनुकूल घटनांची चांदी होय. त्याचबरोबर सातवा गुरू तुमच्यावर कृपा ठेवणार आहेच. आजवर अनेक प्रश्न तुमच्याबाबतीत सुटावयाचे राहिले असतील तर, ते आता सुटणार आहे. व्यवसाय व नोकरी यांत बरेच काही हितकारक घडणार आहे. 'चांगले श्रेय तुमच्या वाट्याला येणार आहे. नोकरीत बदली होऊ शकेल. परंतु बढती मिळून ती होणार आहे. तुमचे स्थान उंचावणार आहे. वरिष्ठांच्या त्रासाचा काळ इतिहासजमा झाला आहे. आर्थिक बाजू बरीच भक्कम होणार आहे. आता तुम्ही लॉटरी व रेस या साधनांचा लाभ घ्यायला हरकत नाही. बेकारांचा वनवास संपला आहे, कौटुंबिक व संसारी जीवनात गार वारा व चांदणे सुरू होणार आहे. अविवाहितांचे विवाह ठरतील. शुभ दिनांक ७–१०.

**महिलांना :** संसारात सारे काही मनासारखे घडू लागेल.

**विद्यार्थ्यांना :** उत्कट स्त्रीप्रेमाचा अनुभव येईल.

## धनु : नोकरीत बेफिकिरी वाढेल

गुरू–सहावा झाला आहे. तो तुम्हाला हवी तेवढी साथ देणार नाही. तरीपण त्याची दशमस्थानावर असलेली दृष्टी थोडीफार उपकारकच ठरेल. दशमस्थानी राहू आला आहे. तो कार्यक्षमता व कर्तबगारीत वाढ करणार आहे. कामाचा ताण पडेल. काम नेहमीपेक्षा जास्त करण्याची स्थिती निर्माण होईल. परंतु त्यात तुम्ही अजिबात मागे पडणार नाही. सामर्थ्य वाढेल व आत्मविश्वासाचा साक्षात्कार घडेल. उत्पन्नात वाढ होईल. बेकारांची परिस्थिती सुधारणा आहे. नोकरी मिळेल अथवा धंदा करण्यासाठी योग्य संधी मदत मिळेल. जुने येणे वसूल होईल. व्यापारात प्रगतीची दिशा दिसेल. व्यापारात प्रामाणिक राहून चार पैसे मिळू शकतील. मंदीचा व्यवसाय अडचणीतून बाहेर पडेल. शुभ दिनांक ९–१२.

**महिलांना :** त्रास व असुरक्षितता कमी होईल. चार पैसे हाती पडतील.

**विद्यार्थ्यांना :** शालेय स्थित्यंतर व्यवस्थित पार पडेल.

## मकर : समंजसपणा ठेवा

मकर राशीला सध्या शनीचे जे पाठबळ आहे ते आता कमी होत जाणार आहे. आता शनी वक्री नाही. गुरू पांचवा हीच खरी तुमची जमेची बाजू आहे. पण वाकडे डावपेच हे गुरूला मान्य नाहीत. हे लक्षात घेऊन अत्यंत समंजसपणाने वागलात तर, तुम्ही यशस्वी व्हाल. नोकरीत काही चुका भूतकाळात तुमच्या हातून झाल्या असतील तर, त्याची चौकशी होण्याची शक्यता नाकारून चालणार नाही. वरिष्ठांबरोबर भांडण न करता थोडीफार माघारीची भूमिका घेऊन सारे निभावून नेऊ शकाल. घराचा व शेत जमिनीचा प्रश्न सुटेल. कर्तृत्वाला तसे क्षेत्र उपलब्ध होईल. आर्थिक बाजू समाधानकारक राहील. प्रवासाला जायला हरकत नाही. दूरचा प्रवास संभवतो. कोर्ट कचेरीतील कामे वेग घेतील. विवाहाचा प्रश्न समाधानकारक सुटेल. शुभ दिनांक ८–१०

**महिलांना :** मन साशंक ठेवू नका. संसारात साधारण प्रसन्नता राहील.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक स्थलांतर येण्याची शक्यता आहे.

## कुंभ : प्रतिष्ठेला उंची येईल

दुसरा मंगळ, तिसरा रवी व चौथा गुरू अशी ग्रहांची रचना आहे. केतू दुसरा झाला आहे. तो एवढा अनुकूल नाही. कौटुंबिक घडामोडी घडतील. घरगुती तंटे विकोपाला नेऊ नका. भांडणे कोर्टापर्यंत न नेता समझोता करून मिटविणे हिताचे ठरेल. पैसा व श्रम यांचे गणित जमणे अवघड होणार आहे. हौसेखातर प्रवास होणार आहे. धंद्याची स्थिती समाधानकारक असली तरी, नोकर लोकांवर विश्वासून राहू नका. विशेषत: व्यापारी लोकांनी याची विशेष काळजी घ्यावी. तब्येतेची बाजू बरी राहील. नोकरीत कामाचा बोजा वाढणार आहे. तसे काम करावे लागणार आहे. ते अंगवळणी पडेपर्यंत त्रास सहन करावा लागणार आहे. वरिष्ठांची मर्जी राहील. परंतु ते सतत कटकट करीत राहतील. वैवाहिक जीवनात सारे समाधानकारक राहील. ज्यांचे विवाह लांबणीवर पडत होते किंवा ठरत नव्हते त्यांचे विवाह ठरतील. शुभ दिनांक ११–१२

**महिलांना :** अपेक्षेप्रमाणे राहत्या घराचा प्रश्न सुटेल.

**विद्यार्थ्यांना :** परिक्षेत घवघवीत यश मिळणार आहे.

## मीन : यश व प्रगती

राशीत गेल्या आठवड्यात केतू आला आहे. तो मंगळाबरोबर सहयोगात आहे. हा योग तेवढा वाईट नाही. यावेळी तुम्ही जर विशेष कामासाठी कुणाच्या गाठीभेटी घेणार असाल तर त्यांत मोठे यश येणार आहे. विशेषत: धंद्यासाठी मदत व नोकरीत वरिष्ठांबरोबरच्या हालचाली करणार असाल तर हरकत नाही तुम्हाला नोकरीत अपेक्षित असेच घडणार आहे. बेकारांना यावेळी नोकरी मिळू शकेल. लेखक व पत्रकार यांना प्रतिष्ठा मिळवून देणारा हा आठवडा आहे. उच्च क्षेत्रांतील व्यक्तीबरोबर संबंध येणार आहे. प्रकाशन व्यवसाय सुधारणा आहे. जुन्या कामाना मागणी येणार आहे. तुम्ही लेखक असाल तर तुमचे लेखन लोकप्रिय होणार आहे. व्यापारी बाजू साधारणच राहील. जुने येणे वसूल होणे कठीण होईल. तुम्ही विवाहाला उत्सुक असाल तर तसे घडून येईल. पुत्रजन्माचा आनंद तुमच्यापैकी अनेक भाग्यवंतांच्या वाट्यास येणार आहे. रेसमध्ये भाग घेऊ नका. तसेच श्रमाशिवाय पैसा मिळण्याची शक्यता कमी. शुभ दिनांक ११–१२

**महिलांना :** नोकरीचा प्रयत्न यशस्वी होईल.

**विद्यार्थ्यांना :** सारे समाधान देणारा काल आहे.

□

# ' गँग '

गँग कशी जमते ?
आपले उद्योग कसे करते ?
केव्हा करते ?
एखादे चांगले काम करायला चार माणसे मिळणे कठीण.
खून पाडायला, गळे घोटायला माणसे कशी एकत्र येतात ?
आपल्या ' बॉस 'चे या बाबतीत कसे ऐकतात ?
का ऐकतात ?
मध्यमवर्गाच्या पांढरपेशा घरामध्ये शिरून
सर्व कुटुंबाची सामूहिक हत्या का करतात ?
केवळ पैशांसाठी ?
पैसे मिळवण्याचे अधिक सोपे मार्ग नसतात ?
आणि पैसा हे कारण नसेल तर, दुसरे काय असू शकेल ?
अशी कोणती शक्ती आहे की, जी चार तरुण मुलांना एकत्र धरून ठेवील ?
पापाला उद्युक्त करील ?
प्रश्न – प्रश्न – प्रश्न ?
या प्रश्नांची उत्तरे कोण देऊ शकेल ?
खुद्द ती तरुण मुले तरी देऊ शकतील का ?
उत्तरे सापडायला अवघड अशा आजच्या समस्येचे नाव आहे

## गँग